# ख्रिस्तायन

नाताळ ई-अंक  २५ डिसेंबर २०१५



# ख्रिस्तायन

## नाताळ ई-अंक वर्ष पाचवे

## २५ डिसेंबर २०१५

### संपादक : ख्रिस्तोफर रिबेलो


**संपादन साहाय्य**

स्वप्निल रिबेलो
स्मिता ख्रिस्तोफर रिबेलो

अंक सजावट
**राजन जेरोम डिमेलो**

अंक मांडणी व तांत्रिक सहकार्य
**वनवसई टिम**



© सर्व हक्क लेखक व कवींच्या स्वाधीन


**संपर्क / अभिप्राय**

आमच्याशी संपर्क साधावयाचा असल्यास आणि आपल्याला काय आवडलं, काय नाही ते आम्हाला कळवण्यासाठी खालील पत्त्यांवर ई-मेल करा वा फोन करा


ख्रिस्तोफर रिबेलो :- chrisrebello25@gmail.com
(9819436078)

१वसई :- admin@onevasai.com



**आभार**

आमचे सर्व लेखक, कवी, हितचिंतक व प्रसिद्धी देणारे सर्व प्रसार माध्यमे यांचे “ ख्रिस्तायन” तर्फे मन:पूर्वक आभार व नाताळ आणि नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.



**या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही**


## अंतरंग


संपादकाच्या लेखणीतून...

**कथा / ललित लेख :-**

ख्रिसमस बाबाची वेगवेगळी रुपे - ललित – जोसेफ तुस्कानो
बदलते नातेसंबंध – ललित – फा. असिस रॉड्रिग्ज
तुमच्या करीअरविषयी बोलू या काही - प्रकाश आल्मेडा
नवा नाताळ – कथा - बेर्नादित रुमाव
गॉस्पल इन ब्रीफ - ललित – फ्रान्सिस आल्मेडा
रिटायर्डमेंट २०२५ – ललित - सायमन रॉड्रिग्ज
ऑनलाईन "विकास " कधी - ललित - चिन्मय गवाणकर
तो देवाच्या उजवीकडे बसला आहे – ललित - सॅबी परेरा
भूमिका आणि एक कविता – ललित - फेलिक्स डिसोजा
नाताळ - कथा - राकेश परेरा
लहान मुलांची निरीक्षणशक्ती – ललित – डॅनिअल मस्करणीस
ब्लॅकमेल - ललित - सिमसन रॉड्रिग्ज
पेरणी – कथा - ॲलेक्स मच्याडो
तणाव-मंद मारक - डॉ. सिबल डिब्रीटो
शोध, हरवलेल्या हाकेचा - फ्रँक मिरांडा
ऋणानुबंध - कथा - ख्रिस्तोफर रिबेलो.

**कविता / चारोळया :-**

| | |
|---|---|
| ख्रि .सी. बी. दोडती | सायमन मार्टिन |
| सबिना फोस | एडवर्ड डिसोजा |
| सचिन मेंडिस | एमेल आल्मेडा |
| सुनिल बावतीस डिमेलो | सुनिल सोकाळकर |

**कलाकुसर :-**

| | |
|---|---|
| ऑस्टिन डाबरे | राजेश शिंदे |
| रॉयल बॅप्टिस्ट रॉड्रिग्ज | |

# संपादकाच्या लेखणीतून...

आपल्या वसईतील ख्रिस्ती समाजाला एवढा मोठा साहित्यिक वारसा असताना आपण मात्र तसे या साहित्यिक मेजवानीपासून दूरच आहोत. आतापर्यंत आपल्या परिसरात प्रसिद्ध होत असलेल्या मासिक-पाक्षिक यांचे नाताळ सणानिमित्ताने फक्त विशेषांक प्रकाशित होत असतात परंतु पुर्णपणे नाताळ सणानिमित्ताने प्रकाशित होणारा “ख्रिस्तायन” हा पहिला प्रिंट व एकमेव ऑनलाइन नाताळ अंक आहे. नाताळ सणाचा आनंद, हौस आणि मजा काही औरच असते.. प्रत्येक जण आपआपल्या परीने नाताळ सणाची मजा लुटतोच.. आम्हीही ह्याच आनंदात हौसेने मजा लुटण्यासाठी गेली पाच वर्षे “ख्रिस्तायन” ऑनलाइन नाताळ अंकाद्वारे सामील होत आहोत..

वसई परिसरातील नव लेखक-कवींना आणि चित्रकारांना आपल्या साहित्य कृतीद्वारे आणि कलेद्वारे लोकांसमोर आणण्यासाठी एक चांगला “प्लॅटफॉर्म” म्हणून हा अंक आहे आणि असणार आहे, पण त्याच बरोबर प्रथितयश लेखक-कवींना सुद्धा आम्ही या चळवळीत सामावून घेतले आहे. ही चळवळ अधिक फोफावी अशी आमची इच्छा आहे किंबहुना असे अधिकाधिक नाताळ अंक प्रकाशित व्हावेत.

मराठीत जवळपास शतकांपासूनची दिवाळी अंकांची मोठी परंपरा लाभली आहे. १९०९ सालापासून दिवाळी अंकांची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि दिवाळी अंकांचा हा झेंडा आजही मानाने फडकत आहे. मराठीत जवळपास ४५० दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. दिवाळी सुरु झाली की सगळ्यांनाच वेध लागतात ते दिवाळी अंकांचे. दिवाळीच्या फराळाबरोबरच साहित्याचाही फराळ चवीनं चाखला जातो. असेच वेध नाताळ सण जवळ आला की लागावेत म्हणून या दिवाळी अंकांच्या धर्तीवर नाताळ अंक काढण्याचे धाडस आम्ही केले आहे. आजच्या परिस्थितीत वाचनसंस्कृतीची बिकट वाट सुरू आहे. त्याला उत्तर देण्याचे सामर्थ्य अशा अंकातून आम्हाला निर्माण करायचे आहे कारण वाचनसंस्कृती वाढली तरच आपल्या जगण्याला नवा अर्थ आहे; वाङ्मयाची निर्मिती केवळ विचारातून नव्हे, तर अनुभवातून होते आणि हे अनुभव आपल्याला जीवन जगण्यास दिशा देणारे असतात. कला आणि साहित्य निर्मितीमध्ये अनुभूतीला पर्याय नाही.

या वर्षी आम्ही हा अंक ‘पीडीएफ’ स्वरुपात सुद्धा देत आहोत, त्यामुळे आपणास अंक वाचण्यासाठी पूर्ण वेळ ऑनलाइन असण्याची गरज नाही. आपण हा अंक डाऊनलोड करून नंतर आपल्या सोयीप्रमाणे अगदी मोबाईलवरही वाचू शकता. आपण हा अंक वाचल्यानंतर इतरांनाही कळवा.. आणि आपल्या सूचना आणि अभिप्रायांची देखील आम्ही वाट पाहत आहोत..

**नाताळ सणाच्या व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!!**

**Merry Christmas & Happy New Year.**

# ख्रिसमस बाबाची वेगवेगळी रुपे

**--- जोसेफ तुस्कानो, बोरीवली (प)**

नाताळ सण जवळ आला की मुलेबाळेच नव्हे तर मोठी माणसेसुद्धा सांताक्लॉजच्या वाटेत डोळे घालून बसतात. संत निकोलस,फादर ख्रिसमस,क्रिस क्रिंगेल किंवा साधासुध्या सांता ह्या नावांनी त्यास पुकारले जाते. सांताक्लॉजबाबा हे काल्पनिक तरीही अद्भुत व्यक्तिमत्व आहे. पाश्चिमात्य देशातील आख्यायिकांतून निर्माण झालेले हे मजेशीर पात्र आता जगभर लोकप्रिय आहे. नाताळ सणाच्या आदल्या रात्री म्हणजेच २४ डिसेंबरला हा सांताबाबा घराघरातून फिरत लहाणग्यांना भेटी वाटीत आला आहे. लहान मुले त्यांची एखादी इच्छा घरातल्या वडीलधाऱ्याकडे व्यक्त करतात किंवा पत्रे लिहून सांताला कळवितात. लाल पायघोळ झगा घातलेला, पिसांची टोपी ल्यालेला, कमरेला काळा पट्टा घातलेला पांढऱ्या दाढी-मिशांचा सांताक्लॉजबाबा लोकांच्या आवडत्या वस्तू घेऊन येत असतो. कधी तो उघडपणे दारोदारी फिरतो तर कधी मुले झोपलेली असताना तो हलक्या पावलांनी येतो. मुलांच्या पायमोज्यात बक्षीस ठेवून, गुपचुप निघून जातो. ती एक मोठी गंमतच असते, बुवा !

काही युरोपियन देशात, त्याची ही फेरी संत निकोलसच्या सणाला म्हणजेच ६ डिसेंबरला होत असते. संत निकोलस हे एक ग्रीक-ख्रिस्ती धर्मगुरू होऊन गेले. आताच्या तुर्कस्थानमध्ये असलेल्या ॲनाटोलिया या धर्मप्रांताचे ते महाधर्मगुरू होते. चौथ्या शतकात होऊन गेलेले हे धर्मगुरू खूप उदार अंत:करणाचे होते. ते गरीबांना सढळ हस्ते मदत करीत. त्यांच्या औदार्याची आठवण म्हणून ‘ख्रिसमस-बाबा’ ही संकल्पना पुढे आली. विविध देशांनी आपली संस्कृती आणि परंपरा यानुसार या सांताक्लॉजचे रूप सजविले. रेनडियरच्या घसरगाडीतून येणारा सांता तर खूपच गाजला.

१९व्या शतकातील ते १८२३चे साल होते, त्यावेळी अमेरिका आणि कॅनडा या देशात ‘ए विजिट फ्रॉम सेंट निकोलस’ हे गाणे खूपच गाजले होते. त्या कवितेवरूनच सांताक्लॉजचे मजेशीर व्यक्तिमत्व रंगविले गेले होते. थॉमस नास्ट या व्यंगचित्रकाराचा तो नाविन्यपूर्ण आविष्कार होता. पुढे २०व्या शतकात ही संकल्पना उत्क्रांत होत गेली. १९३४ साली ‘सांताक्लॉज इज कमिंग टू टाउन’ हे गीत लोकप्रिय झाले. त्या गाण्यानुसार सांताक्लॉज जगभरच्या सद्गुणी मुलांची यादी घेऊन फिरतो, त्या मुलांना चॉकलेट-खेळणी भेट देतो, असा समज रूढ झाला. होऽ होऽऽ होऽऽऽ असा आवाज करत आपल्या सोबत बुटक्यांना घेऊन ही स्वारी रेनडियरच्या घसरगाडीतून उत्तर ध्रुवावरील बर्फावरून घसरत घसरत येते. बाळगोपाळांच्या पायमोज्यात गुपचुप भेटी ठेवले की निघून जाते. कॅनडा देशाने तर आपल्या हद्दीत HOH OHO हा पिनकोड असलेले स्थान सांताक्लॉजचे वास्तव्यासाठी नेमून टकले आहे. त्याच्या आगमनाच्या वेळी होणाऱ्या HO HO HO या आवाजावरून सदर गुप्त कोड तयार करण्यात आला आहे.

१८८९ मध्ये अमेरिकन कवयित्री कॅथरिन बॅट्स हिने सांताक्लॉजच्या सौभाग्यवतीविषयी एक कविता प्रसिद्ध केली होती. ‘गुडी सांताक्लॉज ऑन ए स्लेई राईड’ ही तिची कविता गाजली होती. पुढे, १९५६ साली जॉर्ज मेलाक्रीनो यांनी लिहिलेले ‘मिसेस सांताक्लॉज’ हे गाणे तसेच १९६३ ला फिलिस मॅकगिन्लेचे मुलांसाठी लिहिलेले ‘हाऊ मिसेस सांताक्लॉज सेव्हड ख्रिसमस’हे पुस्तक लोकप्रिय ठरले. सांताक्लॉज व त्याच्या जादुई बुटक्यांविषयी जगभरात खुपसे

साहित्य निर्माण झाले. तत्संबंधी, टेलिविजनवर कार्यक्रम,मालिका गाजल्या आहेत. काही खोडसाळ विनोददेखील निर्माण केले गेले आहेत. ‘लेटर टू सांताक्लॉज’ हा असाच एक मुलांच्या इच्छापूर्तीचा कार्यक्रम अमेरिकेत राबविला जातो.

विसाव्या शतकात, सांताक्लॉजविषयी अनेक दंतकथा पसरल्या होत्या. त्यापैकी एक म्हणजे सांता स्वत:च्या हातांनी मुलांसाठी खेळणी तयार करीत असतो. त्याचे बुटके त्यासाठी त्याला सहाय्य करीत असतात. ते स्वत:च्या हस्तकलेने ही खेळणी तयार करतात. तसेच  सांताक्लॉज घरावरच्या धुराड्यातून आत प्रवेश करतो. निरनिराळ्या देशांतील मुले त्या त्या ठिकाणचे खाद्यपदार्थ घरात तयार ठेवून सांताबाबाचा पाहुणचार करतात. सांताबाबा उत्तर ध्रुवावर राहतो असा समज द्रुढ झाल्याने तिथे आता पर्यटकांना आकर्षित करणारे घर देखील बांधण्यात आले आहे.

सांता हे अद्भुत असे पौरुषीय व्यक्तिमत्व आहे. ते मर्दानी नसले व त्याच्यात धमक नाही असे वाटत असले तरी ते आगळेवेगळे पुरुषपात्र आहे. शांती,आनंद, दानशूरता आणि कणव या सदभावनांचा दूत आहे. ते भूतकाळाइतकेच माणसाच्या भविष्याशी निगडीत एक जादुई पात्र आहे. अर्थातच, घरातली एखादी वडीलधारी व्यक्ती सांताची भूमिका करतात हे ही सर्वश्रुत आहे.

थोडक्यात काय, तर हा ख्रिसमस बाबा प्रेमळ असतो. मुलांबाळांच्या इच्छा पूर्ण करतो,त्यांच्यावर चांगले संस्कार करतो. मात्र अलिकडे या संकल्पनेचे बाजारीकरण झाले आहे. दुकानदार मंडळी आपला माल खपविण्यासाठी त्याचा चपखल वापर करतात. काही मालविक्रेते नाताळसणाच्या दरम्यान आपल्या दुकानाबाहेर सांताक्लॉज उभा करतात. तो मुलांना गोंजारतो, हॅन्डशेक करतो, गिफ्ट देतो. त्याद्वारे मुलांना खरेदीसाठी प्रवृत्त करतो. अशाप्रकारचा पहिला सांताक्लॉज १९३७ साली चार्ल्स डब्ल्यू. हॉवर्ड यांनी एका डिपार्टमेंट स्टोअरसाठी भूषविला होता.

या आशाळभूत प्रकारात, मुलांची फसवणूक होते असे काही मानसशास्त्रज्ञांना वाटते. म्हणून ते या संकल्पनेवर टीका करतात.

तरीही असंख्य आख्यायिकांनी व्यापलेले हे काल्पनिक व्यक्तिमत्व सकलांना हवहवेसे वाटते, यात नवल ते काय?

# बदलते नातेसंबंध

**--- फा. आसिस रॉड्रिग्ज, शिरपूर**

ख्रिसमस हा कुटुंबाचा सण आहे. येशुचे पवित्र कुटुंब अनेक अडचणी व दिव्यातून गेले. परंतु त्यांनी कुटुंबाची शांती भंग होऊ दिली नाही. जोसेफ व मरियेने एकमेकांचा त्यांच्या उणिवेसकट स्वीकार केला. आज समाजात कुटुंबातील आपापसातील मतभेद शांती भंग करत आहेत . नवरा बायकोतील, मुलांतील मतभेद टोकाला जात आहेत. अशाने कुटुंबात गढूळ वातावरण निर्माण झाले आहे. पालकातील भांडण आणि मतभेदामुळे मुलांचा स्वभाव चिडचिडा होऊन मुल वाम मार्गाकडे जात आहेत. आजच्या आधुनिक युगात ज्ञान प्राप्त करण्यासाठी अनेक साधने उपलब्ध आहेत ज्याचा वापर आपण करायला हवा. ख्रिसमस शांतीचा उत्सव आहे. आपल्या कुटुंबातील शांती अबाधित राहावी म्हणून आतल्या अंतरंगात उडी घेऊन आपल्या स्वभावाचा शोध घेऊया.... सत्य हे आहे की जेथे दोन जण एकत्र येतात तेथे वाद होणारच, विचार भिन्नता असणारच. जर पती-पत्नी मध्ये एखादा निर्णय घेण्याकरिता मतभेद होत असतील तर त्यातून मार्ग कसा काढावा हे आपण पाहू. पाच प्रकाराद्वारे पती-पत्नी त्यांच्यात होणाऱ्या मतभेदाच्या समस्येशी झगडतात.

१. मी माझ्या मार्गाने, तु तुझ्या मार्गाने - पती पत्नी दोघे विचार करणार की वादविवाद करून काही फायदा नाही कारण तो त्याच्या मार्गाने जाणार आणि मी माझ्या. खरे तर ह्या प्रकारे वादविवाद करून प्रकरण मिटणार नाही. वादविवाद संपवण्याकरिता हा उपाय योग्य नाही. यामधून आपण पळवाट काढतो. प्रत्येक नातेसंबंधात मतभेद - वादविवाद होणारच परंतू त्यातून पळवाट काढणे हा खरा उपाय नाही
२. मी जिंकले, तु हरलास - दोघांपैकी एकजण अगदी प्रखरपणे स्वत:चा मुद्दा मांडतो आणि दुसऱ्याचा पुसून काढतो, दुसऱ्याचा मुद्दा ऐकून घेत नाही, मी खरी आहे हे सिद्ध करणे हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. मी हट्टी माझे तेच खरे आणि तुझे खोटे ह्या अंगाने जर वादविवाद झाले तर ते एकतर्फी ठरतात. प्रेमापेक्षा ‘‘मी’’पणाला जास्त महत्व दिले जाते.
३. मी हरले, तु जिंकला - मी जर बोलली तर दुसरी व्यक्ति माझ्यापासून दूर जाईल, आमचे संबंध तुटतील, आमच्यातील नाते संपुष्टात येईल या भितीपोटी दोघांपैकी एकजण त्याग करतो. आतल्या आत कितीही त्रास झाला तरी नाते तुटण्याचा धोका वाटतो म्हणून एक जण त्याग करतो. माझे मत कितीही खरे असले तरी भितीपोटी वादविवाद केले जात नाहीत हे सुद्धा ‘‘एकतर्फी नाते" झाले. आज जगात असे अनेक लोक आहेत ज्यांना ‘‘शांततेचे नोबेल" द्यायलाच हवे कारण आज जगात जी काही शांती आहे ती त्यांच्यामुळेच, त्यांनी खुप काही त्याग केला. इतक्या वर्षापासून त्यांनी आपला राग थप्पी मारून कोठीच्या खोलीत ठेवला आहे. हे म्हणजे फुग्यात हवा भरून ठेवण्यासारखे आहे. जेव्हा एखादी गोष्ट मर्यादा पार करते तेव्हा मात्र राग उफाळून बाहेर येतो.
४. माझा मार्ग, तुझा मार्ग - आपला मार्ग माझ्याकडे अर्धसत्य आहे आणि तुझ्याकडे अर्धसत्य आहे. दोघे मिळून पुर्णसत्य आहे. हा मार्ग एखाद वेळेस म्हणून ठीक आहे ह्यामध्ये दोघे एकमेकांना सहाय्य करतात, तरी पण हा मार्ग म्हणजे अंतिम मार्ग नव्हे.
५. तु माझे ऐक, मी तुझे ऐकते - हाच खरा मार्ग आम्हा दोघांना एकमेकांच्या भावना न दुखावता योग्य तो निर्णय घ्यायचा आहे. (मला दुसऱ्या व्यक्तिला न दुखावता योग्य तो निर्णय घ्यायचा आहे) दोघेजण एकत्र बसून शांत अन् प्रसन्न मनाने चर्चा करा. मी तुझी बाजू ऐकणार, तु माझी ऐकून घे आणि मग जे योग्य आणि ज्यामुळे कुटुंबाचे भले होईल असा मार्ग स्वीकारू .

* चर्चे साठी प्रश्न:-
वरील पाच प्रकारांपैकी मी कोणत्या प्रकारात मोडते ?
कुटुंबातील तणाव कमी करण्यासाठी वरील पैकी कोणता उपाय योग्य वाटतो?
पवित्र कुटुंबाकडून तणावावर उपाय म्हणून आपण काय शिकतो ?

# तुमच्या करीअरविषयी बोलू या काही ...

**--- प्रकाश आल्मेडा, संस्थापक संचालक, करीअर डेव्हलपमेंट सेंटर**, वसई स्टे. (प.) मो. 8600178825 www.careerdevelopmentcentre.in (करीअर गुरू प्रकाश आल्मेडा हे सायकोमेट्रीक टेस्टस घेतात व करीअर विषयक मार्गदर्शन करतात.)

करीअरची काही महावाक्ये!

गोल भोकात चौकोनी खुंटी मारायचा प्रयत्न केला तर काय होईल? दोन्ही डॅमेज होतील. सोप्या शब्दात सांगायचं तर तुम्ही सचिन तेंडुलकरला सीए आणि लता मंगेशकरांना अर्थशास्त्राच्या प्राध्यापक वा डॉक्टर करायला गेलात तर काय होईल बरे? मुळातच ते चुकीचे आहे हे तुमच्या सहज लक्षात आलंच असेल.

करीअर म्हणजे तुमच्या व्यक्तिमत्वाची एकूण अभिव्यक्ती (ए होलीस्टीक एक्स्प्रेशन ऑफ युवर पर्सनॅलिटी) म्हणजेच तुमच्या आवडी निवडी, सर्जनशीलता, नितीमुल्ये, विचारसरणी, कार्यक्षमता, ध्येये, उद्दिष्टे यांचा सुफल मिलाफ होणारी अशी ही सुनियोजीत, स्वयंप्रेरीत अभिव्यक्ती असते व याचा मुळ आधार हा स्वत:चा घेतलेला शोध असतो. अर्थात स्वत:चा शोध हा न संपणारा असल्याने करीअरची क्षेत्रे काळाच्या ओघात बदलत असतात. आज ज्या क्षेत्रात सगळं पणाला लावून झोकून देऊन काम करताय ते क्षेत्र सोडून तुम्ही दुसऱ्याच, अगदी भलत्याच अकल्पित क्षेत्रातही जाल. अपार कष्टाने डॉक्टर झालेले नट, गायक होताना आपण पहातो. यामागची प्रेरणा अर्थातच आत्मिक समाधान, कामाचा आनंद आणि पैसा म्हणजे आर्थिक सुरक्षा असते. अनेक जण तर कसलाही व्यवहारी विचार न करता एखादा उद्योग सुरू करतो, जोखीम घेतो आणि पुढे जातो. अर्थात नियोजनाशिवाय काही यशस्वी होत नसल्याने डोके ठिकाणावर ठेवून काय करायचय, नक्की काय करायचय, नक्की कोठे जायचय, तेथेच का जायचय हे आधी स्पष्टपणे ठरवायचं असतं. आणि मग जेथे जायचय तेथे कसे जायचे याची नियोजनबद्ध, कालबद्ध आखणी करूनच प्रवास सुरू करायचा. जेथे जायचेय तेथे जायला किती, कोणते व कसले मार्ग आहेत (देश विदेशातील) याचा वेध घ्यायचा. जोखीम समजून घ्यायची व त्यानुसार तरतूद करीत करीअरचा प्लान बनवून (शॉर्ट टर्म व लॉन्ग टर्म) वाटचाल सुरू करायची. आपल्याला समाजाला, देशाला योगदान देत आपली जडणघडण करायची आहे याचे भान ठेवावे. सतत शिकण्याला पर्याय नाही, ज्ञानतंत्रज्ञानातील नवे बदल वेळोवेळी आत्मसात करावे लागणार आहेत हे लक्षात ठेवूनच करीअरचे नियोजन करावे.

करीअर म्हणजे केवळ नऊ ते पाच अशी ठराविक तासांची महिन्यासाठी पगार देणार नोकरी नसून बदलत्या वास्तवाची जाण ठेवून ती एक जाणिवपूर्वक केलेली श्रम, वेळ, पैसा, भावना यांची गुंतवणूक निवड आहे. गुंतवणूक म्हटल्यानंतर परतावा हवाच. एव्हरी इन्व्हेस्टमेंट मस्ट जनरेट रिटन्स हे खरेच आहे. मग अविवेकी फसवी गुंतवणूक करायची नसते हे ओघाने आलेच. सतत अभ्यास करण्याची मोठी क्षमता नसताना ‘खूप स्कोप आहे’ म्हणून सायन्सला जाणे, मोठे पॅकेज वगैरे मिळते म्हणून एमबीए वगैरे करण, सहज ॲडमिशन मिळाली म्हणून कोणत्याही कोर्सला जाणे, प्रवेश घेतलेले कॉलेज व तो कोर्स आवश्यक संस्थांनी मान्यता दिलेला आहे की नाही हे न पाहाता प्रवेश घेणे या गोष्टी टाळायला हव्यात.

गोंधळ असतो तो स्वत:ला आणि बाहेरच्या जगाला समजून घेण्यात. परीक्षेत कमी जास्त गुण मिळण्यावर आपण स्वत:ला जोखतो, स्वत:ची वर्गवारी करतो व स्वत:विषयीचा दृष्टिकोन तयार करतो आणि आयुष्यभर त्या प्रभावाखाली राहतो. परीक्षार्थी विद्यार्थी, पोटार्थी शिक्षक आणि गुणार्थी- (मार्क्सिस्ट) पालक असे आजचे एकूण स्वरूप झाले

असल्याने फार थोडे यशस्वी म्हणावे असे करीअर करताना दिसत आहेत. कोठे चुकते हे समजून घेण्यासाठी या लेखात आपण विचार करू या.

या लेखात आपण काही प्रसिद्ध वाक्ये विचारात घेऊ या व त्यांचा करीअरसाठी काय उपयोग होईल ते पाहू या. ही वाक्ये जगातील थोर व्यक्तींनी म्हटलेली आहेत. ही ‘करीअरची महावाक्ये’ समजता येतील.

**१. “उद्या त्यांचाच असतो जे आज त्याची तयारी करतात आणि तो आज म्हणजे आताची वेळ आहे.”**

या वाक्यावर क्षणभर विचार करा. जर तुम्ही यावर्षी दहावीला असाल तर २०२२ला तुम्ही जॉब मार्केटमध्ये याल. पुढली तीन वर्षे तुमच्या आयुष्याची करीअरची ६० वर्षे ठरविणार आहेत. दहावी हा भाग एक आहे. म्हणजेच तुमच्या करीअरला सुरूवात झाली आहे. दहावी त्याची एक  पूर्वतयारी आहे, नियोजनाला सुरूवात केलीय का? जे आयुष्यात करायचंय त्यासाठी आज, आता काय केलंत बरं? तुम्ही काय करणार आहात त्याने तुम्ही मोठे होत नसून तुम्ही आत काय केलं व करताय, त्याने मोठे होता. बायबलमध्ये “तयारीचा काळ’ म्हटले आहे. संधीसाठी सज्ज होण्याचा हा उमेदीचा, तयारीचा काळ पदवीचे विद्यार्थी वाया तर घालवित नाहीत ना? दहा वाजता कॉलेज संपते ना दोस्त?) पदवीचा लॅमिनेटेड कागद फक्त किमान पात्रता आहे. पदवीने नव्हे तर तुमच्या ज्ञानकौशल्य व एकूण व्यक्तिमत्वाने संधी मिळते. बाय द वे, मुंबई विद्यापीठाचे तब्बल ७०टक्के विद्यार्थी अनएम्पलॉयबल आहेत असा एक अभ्यास अहवाल सांगतो. एमबीएचे चारातले तीन अनएम्पलॉयबल आहेत. पदवीच्या वर्षात काही दुसरे शिकताय की नाही? – एखादा पर्सनॅलिटी विकसनाचा कोर्स, विदेशी भाषा, नवे कौशल्य, स्पर्धा परीक्षांची (बँक, युपीएससी, एमपीएससी, स्टाफ सिलेक्शन, रेल्वे, एलआयसी, इत्यादी. या परीक्षांचा ८० टक्के अभ्यासक्रम एकसारखा असतो व एमबीएच्या प्रवेश परीक्षांनाही फायदा होतो.) रोजचे दोन पेपर तरी वाचताय का? पुन्हा सांगतो, उद्या हमखास येतोच. खरेतर उद्या वगैरे काही नसतोच दोस्त! असतो तो फक्त आज. त्याचा पूरेपूर वापर करा आणि ध्येयाकडे पुढे जा. टूमॉरो बिलॉग्जस टू दोझ हु प्रिपेअर फॉर इट टुडे. विचार कर. स्पर्धेला सज्ज हो. दॅट टुडे इज नाउ.

**२. “इफ यू फेल टू प्लान यू प्लान टू फेल”**

देशाला, कंपनीला विकासासाठी प्लानींग करावे लागते. कारण सोपे आहे  साधनसामुग्री (वेळ पकडून) नेहमीच कमी असते आणि खूप काही साध्य करायचे असते. म्हणूनच जे हाताशी आहे त्याचा जास्तीत जास्त उत्पादक उपयोग करण्यासाठी जोखीम कमी करण्यासाठी नियोजन हवेच. करीअरचा प्लान तयार केलायस का? “पदवीनंतर बघू पुढे, आताच एवढं टेन्शन कशाला घ्यायच?” हा विचार धोकादायक आहे. तुम्ही जे काही (पदवी वगैरे) ते कशासाठी करता? तुमचा ‘व्हाय तुम्हाला सापडलाय का? कारण तुमचा ‘व्हाय’ तुम्हाला सापडला की तुम्हाला तुमचा ‘हाउ’ सहज सापडेल. आयुष्य म्हणजे आपण करीत असलेल्या निवडींची गोळाबेरीज असते ना! एवढं सगळं करताय ते आपल्याला (आपल्या मुलांना) कोठे घेऊन जाणारंय ते समजून घ्यायला नको. जायचंय कोठे हे न ठरविता कधी प्रवासाला निघतो का बरं आपण? मग करीअरचं काय? पुढची किमान पाच, सात आणि दहा वर्षे तरी नजरेसमोर ठेवून अर्थव्यवस्थेत काय बदल घडतील याचा विचार करून नियोजन करा. पुढल्या पाच वर्षात आपल्या कार्यक्षेत्रात तंत्रज्ञानामुळे काय बदल घडतील, कोणत्या नोकऱ्या राहतील व जातील, कोणती स्पर्धा आहे, यांचा आज वेध घ्यायला हवा. आज जागतिक स्तरावरच्या बलाढ्य कंपन्याही रातोरात खलास होताना दिसतात. अशावेळी कोणत्याही परिस्थितीत टिकून राहण्यासाठी काही महत्त्वाची कोअर कॉम्पीटन्सीज (उदा. उत्तम व्यक्तिमत्व, प्रभावी संभाषण व सादरीकरण कौशल्य, एकूण कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी लागणारी सॉफ्ट स्किल्स इत्यादी) आत्मसात करायला हवीत. अमेरिकेतील

कार्नेगी मेलन या जगप्रसिद्ध संस्थेच्या अभ्यासानुसार प्रोफेशनल्सचे ८५ टक्के यश हे सॉफ्ट स्किल्स व पर्सनेलिटीवर तर केवळ १५ टक्के डोमेन नॉलेज म्हणजे कार्यक्षेत्राच्या ज्ञानावर अवलंबून असते. म्हणूनच तुमची स्वत:विषयीची जिवनदृष्टी, व्हिजन काय आहे असे प्रश्न महत्त्वाचे ठरतात.

### ३. "राइट गायडन्स एट राइट टाइम फ्रॉम राइट पिपल मेक्स ऑल द डिफ्रन्स" .

योग्य वेळी योग्य लोकांकडून योग्य मार्गदर्शन घेण्याने मोठा लाभ होतो. सध्याच्या युगात पाच हजाराहून अधिक करीअरची क्षेत्रे असून त्यात भर पडत आहे. इव्हंट मॅनेजमेंट, सोशल मिडिया मार्केटिंग वगैरे क्षेत्रे पाचसात वर्षापूर्वी नव्हती. मात्र जेवढी माहिती जास्त तेवढाच गोंधळही जास्त. त्यात कोणीतरी सांगतो म्हणून करीअरची निवड करणे मोठे धोक्याचे असते. पाच काय दोन वर्षापूर्वी ज्याला स्कोप वगैरे होता त्याला पुढल्या दोन वर्षापत स्कोप असेल की नाही ते सांगता येत नाही अशी स्थिती आहे एवढ्या झपाट्याने बदल होत आहेत. मुंबईत काय झाले पाहा. मॅन्यूफॅक्चरिंगचे जॉब्स कमी झाले आणि सर्विस सेन्टर वाढला. आयटीवाल्यांनी जपानी भाषा का शिकावी ते यातून लक्षात येते. कोणताही पूर्वग्रह न ठेवता तुमच्या अभिवृत्ती (ॲटीटयुड) व अभिक्षमता (ॲप्टीटयुड) समजून घेऊन तुम्हाला करीअरचे योग्य क्षेत्र शोधण्यासाठी एखादा अनुभवी, जाणकार करीअर काउन्सेलर कळीची भूमिका बजावू शकतो.

पालकांनी नववी ते पदवीपर्यंतच्या मुलांची एक शास्त्रीय सायकोमेट्रीक टेस्ट करावी. यात किमान पाच तासांच्या टेस्टस् असतात व त्यांच्या निकालातून कोणत्या क्षेत्रात जावे याचे चित्र स्पष्ट होते. अर्थात या चाचण्या जाणकार, प्रशिक्षितांकडेच घ्याव्यात. बोर्डाच्या व विद्यापीठाच्या परीक्षांची वाट न पाहता या चाचण्या कराव्यात कारण ध्येय कळले की मुले प्रेरित होऊन अभ्यास करतात असा अनुभव आहे. अभ्यास कशासाठी करायचा हे लक्षात येते. पालकांनी वेळात वेळ काढून दिवाळी, नाताळ व उन्हाळी सुट्टीचा लाभ घेत या सायकोमेट्रीक चाचण्या कराव्यात. "किप एण्ड इन माइंड ॲण्ड स्टार्ट" असे आपण म्हणतो. तो 'एण्ड' या चाचण्यांतून सापडत असल्याने, करीअरची दिशा गवसत असल्याने या चाचण्या आवश्यक गुंतवणूक समजावी. लाखो रूपये फी क्लासेसना देणारे पालक या चाचण्यांविषयी उदासीन असल्याचे खेदजनक चित्र दिसून येते. चुकीच्या माहितीने करीअर निवडण्याची मोठी किंमत द्यावी लागते. करीअर काउन्सेलरकडे जाऊन अधिक उशिर होण्यापूर्वी तुम्ही करीअरच्या चुका सुधारू शकता. कमी गुण वगैरे मिळाले तरीही असंख्य संधी असतात हे लक्षात आले की सर्वांचाच ताण कमी होतो. आज पंच्याण्णव टक्के गुण मिळविणारेही आर्ट्सला जातात ते का ते पालकांच्या लक्षात येईल. खूप गुण मिळाले म्हणजे सायन्सलाच गेले पाहिजे असे नव्हे. येत्या काळात गणित सांख्यिकी भौतिकशास्त्र, इंग्रजी भाषा, चिनी जपानी भाषा, भूगोल, मानसशास्त्र अशा विषयांना मोठा स्कोप राहील. या विषयांच्या पदव्या दूरस्थ पद्धतीने म्हणजे डिस्टन्स एज्युकेशननेही करता येतात.

### ४. "द ग्रेटेस्ट ऑल टाइम डिस्कव्हरी ऑफ मॅन इज दॅट वुई कॅन चेंज अवर फ्युचर बाय चेंजींग अवर ॲटीटयुड"

हे ऑप्रा विन्फ्रेचे प्रसिद्ध वाक्य आहे. खरेच आहे की आपली मनोवृत्ती बदलून आपण माणसे आपले आयुष्यच बदलू शकतो हा जगातला सर्वात मोठा शोध आहे. ॲटिटयुड इज एव्हरीथींग. पालकांनी मुलांना वेठीस न धरता त्यांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून समजून घेऊन, त्यांच्या क्षमता व मर्यादांचे भान ठेवून, त्यांना रेसचा घोडा न करता पुढे नेणे महत्त्वाचे आहे. शेवटी आपली मुले आनंदी असणे महत्त्वाचे आहे. आज अनेकजण केवळ गुण कमी मिळाले तर नाराज होतात, न्यूनगंडाने पछाडली जातात. परीक्षेचे गुण म्हणजे संपूर्ण पात्रता वा गुणवत्ता नव्हे. आयएएस होण्यासाठी विद्यापीठात पहिले यावे लागत नाही. परीक्षेतील गुण म्हणजे सर्वस्व नव्हे. वकिल, मॅनेजर, उद्योजक व्हायला लागणारी गुणवत्ता शाळा कॉलेजच्या सहा आठ विषयात असते का? पालकांनी मुलांची तुलना करणे साफ बंद केले पाहिजे. मुलांना काही

अध्ययन अक्षमता असल्यासही त्यांना संधी असतात याची माहिती घ्यावी. तुमचा मुलगा वा मुलगी कोणापेक्षा श्रेष्ठही नाही वा हीनही नाही. तो वेगळा आहे आणि दुसरे वेगळे आहेत. प्रत्येक जण आगळा वेगळा व काहीतरी गुणवत्ता असणारा असतोच. सहा आठ विषयांच्या अभ्यासक्रमात (घोका ओका) ही बहुविध बुद्धिमत्ता लक्षात येतेच असे नव्हे. बोर्डाने मेरीट लीस्ट रद्द केली कारण मेरीटमध्ये आलेले पुढे फारसे काही भव्य दिव्य करताना दिसले नाहीत. आमच्याकडे मुलांविषयी तक्रारी घेऊन येणाऱ्या पालकांना आम्ही जेव्हा त्यांचे काही चांगले गुण सांगायला सांगतो तेव्हा ते मुले तशी चांगली आहेत, त्यांच्यात क्षमता आहेत असे कबूल करतात. करीअर व परीक्षा, गुण स्पर्धा या सगळ्या प्रकाराने घराघरातील वातावरण ढवळून निघत असल्याचे दिसते. त्यातून मुलांच्याच नव्हे तर पालकांच्याही भावनिक बुद्धिमत्तेवर परिणाम झाल्याचे दिसते.

पालकांनी मुलांना भविष्यासाठी सज्ज करावे, शंभर मिटरच्या रेससाठी नाही, मॅरेथॉनचा दीर्घकालीन दृष्टीकोन ठेवावा. एका परीक्षेने मुलांना जोखू नये. कोणतेही अपयश (व यशही) तात्पुरते असते. आजची मुले अतिसंवेदनशील असल्याचे दिसून येते. अनेक जण टोकाला जातात, मुलांच्या मार्कलिस्टपेक्षा मुले महत्त्वाची नाहीत काय? मुलांशी करीअरविषयी मोकळेपणे बोलावे. काउन्सेलरकडून सायकोमेट्रीक चाचण्या करून एकत्र बसून बोलणे अधिक उपयुक्त व शहाणपणाचे ठरते. पालकांनी आपल्या मुलांना स्वत:विषयीचा व जगाविषयीचा एक सकारात्मक, आश्वासक दृष्टीकोन द्यायला हवा. ज्यांच्याकडे आत्मविश्वास आहे त्यांना स्पर्धेची भीती नसते. मात्र खरा आत्मविश्वास हा ज्ञानकौशल्यांतून व सततच्या शिकण्यातूनच येतो हे लक्षात ठेवावे. म्हणूनच तर ज्ञानाचे अवमूल्यन (नॉलेज टू डेप्रीशएिटस्) होण्याच्या काळात सतत शिकून नवनवे ज्ञान मिळवित राहावे लागेल. कालच्या ज्ञानाने आज काम करणे शक्य नाही. पदवीच्या विद्यार्थ्यांनी दुसरी पदवी घ्यावी. आता विद्यापीठांनी तशी सुविधा दिली आहे. स्वत:चे भविष्य सुरक्षित करण्याचा सर्वोत्तम उपाय म्हणजे स्वत:च्या संधी निर्माण करणे. यासाठी जरा खोल पाण्यात उतरावे. कारण चांगले पोहोण्यासाठी खोल पाण्यातच उतरावे लागते. मात्र यासाठी सकारात्मक दृष्टीकोन हवा.

### ५. “एव्हरी टाइम नो वन हिटस् ए सेंच्युरी.”

अगदी सचिनलाही हे जमत नाही. चांगल्या गोष्टीसाठी वाट पाहावी लागते, वेळ लागतो. दारूची बाटली पटकन उघडते; औषधाची नाही असे मी गंमतीने म्हणतो. आपल्या मुलांनी प्रत्येक वेळी, प्रत्येक स्पर्धेत व परीक्षेत जिंकलेच पाहिजे, टॉपर असलेच पाहिजे ही खचितच अवास्तव म्हणूनच अविवेकी अपेक्षा आहे. खरेतर अपयश वारंवार येणार आहे व यश कधीतरी येणार आहे. प्रश्न पडल्यावर उठत वाटचाल करीत राहाण्याचा आहे, समोरच्यांशी नव्हे तर स्वत:शी स्पर्धा करण्याचा आहे. कोणाला दाखवून देण्यासाठी, स्वत:ला सिद्ध करण्यासाठी वगैरे नव्हे तर पालकांनी मुलांना अपयशाला तोंड देण्यासाठी सज्ज करायला हवे. अपयशात त्यांना धिर द्यायला हवा. करीअर हे पालक व मुलांचे ‘जॉइंट वेंन्चर आहे असे मला प्रामाणिकपणे वाटते. ‘फन इज इन ट्रॅव्हलींग ॲण्ड नॉट जस्ट अराइव्हींग’ असे म्हटले जाते. लेट  देम एन्जॉय देअर करीअर जर्नी. काही झाले तरीही पालक व मुलांमधला संवाद तुटता कामा नये. अपयश आले तर ‘गॉड हॅज बेटर प्लान्स फॉर यू’ असे समजा व पुढचे वळण घ्या. ठेच लागली म्हणून कोणी तेथेच पडून राहात नाही. करीअरचा ‘प्लान बी’ रेडी असला तर उत्तमच.

थोडक्यात काय तर करीअर करणे ही एक सतत चालणारी प्रक्रिया असून एकदाच घडणारी घटना नाही. तुमचा स्वत:वर, स्वत:च्या ध्येयावर विश्वासच नव्हे तर श्रद्धा हवी. मन स्थिर हवे व झोकून देऊन कष्ट करायला हवेत. बदलांचा वेध घ्यायला व त्यातून संधी शोधायला जागरूक हवे. योग्य मार्गदर्शन घ्यायला हवे. करीअर इज इन्डीड दी आर्ट ऑफ द पॉसीबल. ऑल द बेस्ट. करीअरविषयी मार्गदर्शनासाठी तुमचे स्वागत आहे.

# नवा नाताळ

**--- बेर्नादेत रूमाव, बोरीवली**

जॉन अंकलने त्या कोपऱ्यावर नजर फिरवली, नेहमीच्या त्या जागेवर रोझा नव्हती. थरथरत्या हाताने आणि अधू नजरेने त्याने किचनमध्ये डोकावून पाहीले तर किचनच्या ओट्याजवळ ऊभी राहून रोझा दूध गरम करत होती. ते पाहून जॉन अंकलला बरं वाटलं. ' येतेस का?' हा रोजचा प्रश्न त्याने मग विचारला नाही.

रोझाची ती ठरलेली. तिची आवडती जागा होती. नाहीतरी घराचा एखादा कोपरा आपला विशेष आवडीचा असतोच ना! रोझाने हॉलजवळच्या या खिडकीची निवड केली होती. दिवसाच्या कोणत्याही प्रहरी ती तिथे बसलेली असायची. तिची तेथे बसण्याचीही एक पध्दत होती. खिडकीच्या त्या कोपऱ्यात तिचा हक्काचा एक स्टूल होता. त्यावर खिडकीशी लघुकोन करून ती बसायची त्यामुळे दोन गोष्टी साध्य होत असत. अधूनमधून घरभर तिची नजर फिरत राहायची व त्याचबरोबर खिडकीबाहेरील छोट्या जगातील सारं काही तिला दिसायचं.

आताही खिडकीशेजारच्या त्या छोट्या स्टुलवर रोझाचा भला थोरला देह विसावला होता. ती जागा म्हणजे तिच्या विरंगुळ्याचे साधन होते. अख्खा दिवस ती तिथे बसून राहायची व रस्त्यावरून जाणारी येणारी वाहनांची, माणसांची वर्दळ निरखत राहायची. शाळा कॉलेजला जाणाऱ्या मुलांमुलींची दंगामस्ती, किंचाळणे-ओरडणे, आकाशातून ऊडणारी पाखरं केबलवायरच्या झुल्यात बसून झोके घेणारे रावे, बुलबुल, शेजारच्या गुलमोहरावरून बदामीवर सतत ऊड्या मारत पाठशिवणीचा खेळ खेळत तुरूतुरू पळणाऱ्या खारूताई हे सारे तिच्या जगण्याचे भाग होते. तिच्या दिवसभराच्या विरंगुळ्याची ती साधने होती.

' येतेस का? जरा बाहेर पडू. बिल्डिंगभोवती दोन चकरा मारू. तेवढेच पाय जरा मोकळे होतील.' असं सारखं बोलून जॉन आता कंटाळला होता. सुरूवाती सुरूवातीला जॉन रोझाला जाता येता म्हणायचा. तसे त्यालाही ठाऊक झाले होते की रोझा काही तिची मुळ हक्काची जागा सोडणार नाही. बाहेर पडणार नाही. तीस-बत्तीस वर्षाच्या सहजीवनानंतर आता तर जॉनची खात्री पटली होती. तिचे वाढते वजन हे त्यांच्या चिंतेचे एक कारण बनले होते.

...रोझा वर्षातून केवळ दोनदाच घराबाहेर पडायची. एकदा ईस्टरच्या व एकदा ख्रिस्मसच्या मिस्सासाठी... तेही रिक्षांतून. रोझाच्या या कमी हालचालीमुळे तिचा देह असा अस्ताव्यस्त पसरला होता की स्थूल देहामुळे ती बाहेर पडत नव्हती हा जर तरचा प्रश्न आता ऊरला नव्हता.

आखाती देशात उमेदीची वर्षे घालवून जॉन मायदेशी आला. तोही रोझाच्या आग्रहाखातर. येथे परत आल्यावर त्याने एका गॅरेजमध्ये नोकरी धरली. ऊतार वयात त्यांच्यावर देवाची कृपा झाली. दोन मुलं झाली. हाडाची काडं करून त्यांनी मुलामुलीला निगुतीने वाढवले. पण अर्धवट शिक्षण, यथातथा नोकरीमुळे दोघांची लग्ने ऊरकता ऊरकता जॉन रोझाच्या नाकी नऊ आले. लग्न होईपर्यंत चाळीशी ठेपली.

जॉन अंकल आता वयानुरूप थकले व हळूहळू ओणवे होऊ लागले. आता तर काय जॉनच्या शरीरावर पार्किंसनचा विळखा पडला होता. एक अवयवाचा ताबा पार्किंसन्सने घेतला होता. हालचाली मंदावल्या होत्या. तरी होता होईस्तोवर जॉन शरीर हलतं ठेवण्याचा प्रयत्न करत होते. घरातल्या घरात वॉकरच्या आधाराने ते फिरत राहत. संध्याकाळी झाली की इमारतीभोवती एक दोन फेऱ्या मारत. कितीही वेळ लागला तरी जॉन अंकल काठीचा, जिन्याचा आधार घेत खाली ऊतरत असत. जाणाऱ्या येणाऱ्या हात हलवत. प्रत्येकाकडे त्यांची एकच मागणी असे. 'please Pray for me.' देवाकडे त्याचे फक्त एकच मागणं होते, 'देवा, सगळं काही तुझ्या इच्छेनुसार होऊ दे. पण मला शेवटपर्यंत चालतं बोलतं ठेव. बाकी काही नको.'

जॉन अंकलच्या दोन्ही मुलामुलींची लग्नं आपल्या ऐपतीप्रमाणे लावून दिली. सुरुवातीची काही वर्षे म्हातारी म्हाताऱ्याची आशेने वाट पाहण्यात गेली. आणि मग जस जशी वर्षे सरू लागली तशा दोघांच्या आशा मावळून गेल्या. ना

मुलीच्या पदरात काही पडलं ना मुलाच्या. दोन्हीकडे पाळणा हलला नाही. क्वचित घराबाहेर पडणारी रोझा मग अधिकच घुमी झाली. अवतीभवतीच्या स्त्रियांची सुखं पाहून खंतावू लागली. खिडकीत जास्त वेळ बसून दिवस घालवू लागली. रोझा-जॉनची म्हातारपणी नातवंडांना मांडीवर खेळवण्याची हौस राहून गेली. तरीही जॉन अंकलने आशा सोडली नाही. त्याने कधी देवावर राग धरला नाही. मरियेवरचा विश्वास ढळू दिला नाही. दरवर्षी बाळ येशूचा गोठा तयार करण्याचे आपले व्रत सोडले नाही. ख्रिस्मस काळात लोकांना, पै-पाहुण्या घरी बोलावून प्रार्थना, कॅँरल, आराधना करण्याची रीत सोडली नाही.

' काय दिलंय देवाने आपल्याला ? ना धड नोकरी दिली... ना वेळेत मुलं दिली...कसलं सुख दिलं देवाने ? म्हातारपणात मुलं दिली...तीही कुचकामी निघाली...मुलांनी तरी काय दिलं आपल्याला...आणि म्हणे देव...'गप्प गप्प राहणाऱ्या रोझाच्या तोंडाचा पट्टा एकदा का सुटला की ती देवाला दुषणे देत राहायची.
' रोझा, असं बोलू नये. देवाने जे जे दिलंय त्याबद्दल आनंद मान. देवाच्या योजना माणसाच्या योजनाहून भिन्न असतात. यावर तू का विश्वास ठेवत नाहीस.'अधनं मधनं दोघा म्हाताऱ्यात देवावरून असे खटके ऊडत पण प्रेमळ जॉन रोझाची अशी समजूत काढी.मग तीही शांत होऊन खिडकी बाहेर डोकावत राही.पण पुर्वी ऊत्साहाने गोठा बनवायला मदत करणाऱ्या रोझाने मागील काही वर्षापासून सोडून दिले होते.

आताही इमारती भोवती फेरफटका मारून वर जॉन अंकल वर आले होते.साऱ्या कॉलनीभर ख्रिस्मसचा माहौल होता. पण जॉन अंकलच्या घर नेहमी प्रमाणे जैसे थे होते. मह लहान मुलाच्या उत्साहाने जॉन अंकल जमेल तसा गोठा तयार करण्यात गुंतले. सकाळी घराबाहेर पडलेला त्याचा मुलगा जेसन व सून मरिया अजूनही आले नव्हते. जॉनचे कान त्याच्या येण्याचे वेध घेत होते.

निर्विकार मनाने रोझा रस्त्यावरील रहदारी निरखत होती. मध्येच नवऱ्याच्या मर्यादीत हालचाली पाहत होती. जॉनमधील बालसुलभ उत्साहाचे तिला भारी कौतुक वाटत होते. एवढ्यात इमारतीच्या गेटवर रिक्षा थांबली. त्यातून आधी जेसन खाली ऊतरला .त्याच्या हातात बरचं सामान होते. त्याच्या पाठोपाठ मरिया खाली ऊतरली. तिच्या हातात छोटं बांधलेले मुटकुळं होते. ते पाहून रोझाला नवल वाटलं. धडपडत ती स्टुलवरून ऊठली व जॉनला म्हणाली.' अरे जॉन, जॉन इकडे ये. ते बघ खाली जेसन मरिया आले आहेत. आणि मरियेच्या हातात बघ ना, काय आहे?... त्याच्या हातात बाळ आहे... कुणाचं आहे रे...! तुला काही माहित आहे का? ते दोघे काही बोलले नाहीत आपल्याला... की ते असं बाळ आणणार आहेत म्हणून... आंनद व दुःखाच्या संमिश्र भावनांनी रोझा फार गोंधळून गेली. पण जॉन अंकल नेहमी प्रमाणे शांत, स्थिर होते.
'त्या दोघांना तुला सरप्राईज द्यायचे होते. माझ्याशी या विषयावर जेसन बोलला होता.'
'मग तुम्ही का नाही सांगितले मला?'
'वा... मग ते सरप्राईज कसे राहिले असते. ते बाळ मरियेच्या एका मैत्रिणीचे आहे.... अचानक राहिलेले... गडबड झालेलं... तिसरे बाळ... तिला नको असलेले.... आणि आपल्या मरिया जेसनला हवं असलेलं.....'
' आणि आपल्या दोघांना सुध्दा हवं असलेले... खरं ना जॉन....'
'हो. अगदी खरं...'
' मग त्याच्यात काही बोलणं झालं.' आणि...आज नाताळच्या शुभमुहूर्तावर बाळ आपल्या घरी येत आहे.' जॉन अंकलचे बोलणं संपेपर्यत दारावरची बेल वाजली. आणि लगबगीने रोझा दारापर्यंत धावत गेली. आपल्या आत नवा उत्साह संचारल्याची रोझाला नव्याने जाणीव झाली. सुहास्य वदनाने तिने जेसन मरियाचे स्वागत केले व बाळाला आपल्या कवेत ओढून घेतले

'परमेश्वराच्या योजना खरंच भिन्न असतात. जॉन, तू बरोबर म्हणाला होतास. यंदाचा नाताळ खरंच सुंदर व वेगळा आहे.' बाळाचा गालगुच्चा घेत रोझा म्हणाली. जॉन अंकल आपल्या थरथरत्या हातांनी गोठा तयार करण्यात गढून गेले.

# गॉस्पल इन ब्रीफ

टॉलस्टॉय लिखित 'गॉस्पल इन ब्रीफ' या पुस्तकातील टॉलस्टॉयनेच लिहिलेला सर्व प्रकरणांचा सारांश ...........

**--- भाषांतर - फ्रान्सिस आल्मेडा, निर्मळ.**

येशू त्याच्या बालपणात देवाला त्याचा पिता म्हणत असे, ज्युडेयामध्ये एक जॉन नावाचा प्रेषित त्या काळात होता, जो देवाच्या पृथ्वीवर येण्याविषयी प्रवचन देत असे. तो म्हणायचा की लोकांनी त्यांच्या जगण्याचा मार्ग बदलला, सर्व माणसांना समान लेखले आणि अपाय करण्याऐवजी, एकमेकांना मदत केली तर देव अवतरेल आणि त्याचे राज्य पृथ्वीवर स्थापन होईल. हे प्रवचन ऐकून मानवाच्या जीवनाचा आणि सर्वांचा उगम असलेल्या अनंताशी, ज्याला देव म्हणतात त्याच्याशी त्याचे नाते यावर विचार करण्यासाठी येशू अज्ञात स्थळी गेला.येशूने ओळखले की त्याचा पिता अस्तित्वाचा अनंत उगम ज्याला जॉन देव म्हणतो तो आहे. अज्ञात स्थळी काही दिवस अन्नाशिवाय राहिल्यानंतर येशूने भुकेचा अनुभव घेतला आणि स्वतःशी विचार केला.
सर्वसमर्थ देवाचा पुत्र म्हणून तो आहे तसाच मी सर्वसमर्थ असलो पाहिजे, पण आता मला खावेसे वाटते आणि माझी भूक भागवण्यासाठी भाकरी तयार करू शकत नाही,मला दिसते की मी सर्वसमर्थ नाही. मी दगडांतून भाकरी तयार करू शकत नाही पण मी खाण्यापासून परावृत्त होऊ शकतो आणि म्हणून जरी मी शरीराने नसलो तरी आत्म्याने सर्वसमर्थ आहे व शरीराला दाबू शकतो म्हणून मी शरीराने नव्हे तर आत्म्याने देवाचा पुत्र आहे.
नंतर तो स्वतःशी म्हणाला: मी एक आत्म्याचा पुत्र आहे. म्हणून मला शरीराला नाकारून ते नाहीसे करू दे. परंतु त्यावर त्याने उत्तर दिले: मी शरीरात वसलेल्या आत्म्याने जन्म घेतला आहे. तशी माझ्या पित्याची इच्छा आहे आणि मी त्याच्या इच्छेला विरोध करूच नये. पण तो विचार करीत गेला. जर मी माझ्या शरीराच्या गरजा पूर्ण करू शकत नाही किंवा मला स्वत:ला त्यापासून मुक्तही करू शकत नाही, तर मी स्वत:ला शरीराला वाहून घेतलेच पाहिजे आणि त्याकडून मिळू शकणारी सर्व सुखे उपभोगली पाहिजेत. परंतु त्यावर त्याने उत्तर दिले: मी माझ्या शरीराच्या गरजांचे समाधान करू शकत नाही आणि त्याच्या पासून स्वत:ची सुटकाही करून घेऊ शकत नाही; पण माझे जीवन त्यामध्ये माझ्या पित्याचा आत्मा असल्याने सर्व समर्थ आहे. म्हणून माझ्या शरीरात मी माझ्या आत्म्याची, माझ्या पित्याची सेवा केली पाहिजे आणि फक्त त्याच्यासाठीच काम केले पाहिजे.
आणि माणसाचे खरे जीवन पित्याच्या आत्म्यामध्ये असल्याची त्याची खात्री झाल्यावर, येशूने एकांतस्थळ सोडले आणि लोकांना ही शिकवण जाहीर कण्यास सुरुवात केली. तो म्हणाला की त्याच्यामध्ये आत्मा राहतो, यापुढे स्वर्ग खुले झाले आहेत आणि स्वर्गाच्या शक्ती माणसाकडे आणल्या आहेत आणि एक मुक्त आणि अमर्याद जीवन माणसासाठी सुरू झाले आहे आणि शरीराने कितीही दुर्दैवी असलेली सर्व माणसे सुखी होतील.

२. ज्यू जे स्वत:ला सनातनी समजत होते एका बाहेरच्या देवाची पूजा करीत होते, ज्याला ते विश्वाचा निर्माता आणि शास्ता समजत होते त्यांच्या शिकवणीप्रमाणे ह्या बाहेरच्या देवाने त्यांच्याशी एक करार केला आहे. ज्यानुसार त्यांनी त्याची पूजा केली तर त्यांना मदत करण्याचे त्याने वचन दिले आहे. शनिवार, साब्बाथ पाळणे ही या कराराची मुख्य अट होती.
पण येशू म्हणाला: साब्बाथ ही मानवी प्रथा आहे. माणूस आत्म्याने जगला तर ते सर्व बाह्य विधीपेक्षा जास्त आहे. धर्माच्या सर्व बाह्य प्रकाराप्रमाणेच साब्बाथ पाळणे ह्यात एक भ्रम आहे. तुम्हाला साब्बथच्या दिवशी काहीही करायला मनाई केली आहे, परंतु चांगली कामे नेहमीच करायला पाहिजेत आणि साब्बथ पाळण्याने चांगल्या कामात अडथळा येत असेल तर साब्बाथ पाळणे ही एक चूक आहे.
सनातनी ज्यूंच्यामते देवा बरोबरच्या या कराराची दुसरी अट म्हणजे अविश्वासू लोकांशी परस्पर संबंध टाळणे. या विषयी

येशू म्हणाला की देव त्याच्या स्वतः साठी बळीची नव्हे तर माणसांनी एकमेकांशी प्रेम करावे अशी इच्छा करतो. कराराच्या आणखी दुस-या अटी धुलाई आणि शुद्धिकरणा संबंधी आहेत, त्यांच्यासाठी येशू म्हणाला की देवाला बाहेरची स्वच्छता नव्हे, तर माणसावरील दया आणि प्रेम पाहिजे आहे. तो आणखी म्हणाला की बाह्य नियम हे हानिकारक आहेत आणि चर्चची परंपरा ही स्वत:च वाईट आहे. त्यांची चर्च परंपरा स्वत:च्या आई आणि वडिलावरील प्रेमासारख्या सर्वात महत्त्वाच्या गोष्टींना बाजूला ठेवते आणि परंपरांच्या कुंपणात त्याचे समर्थन करते.
जुन्या कायद्याच्या सर्व बाह्य नियमाने ठरवून दिलेल्या बाबी ज्यामुळे माणूस स्वतः अपवित्र होतो असे तो समजत होता, येशू म्हणाला: तुम्ही सगळे जाणून घ्या की, माणूस बाहेरच्या कोणत्याही गोष्टीने नाही, तर फक्त तो काय विचार करतो आणि काय करतो ते त्याला अपवित्र करू शकते.
त्यानंतर येशू जेरुसलेमात गेला,जे शहर पवित्र समजले जात असे आणि त्याने मंदिरात प्रवेश केला जेथे सनातन्यांच्या मते देव स्वत: राहतो, तेथे तो म्हणाला की देवाला बळी देणे हे निरुपयोगी आहे, एखाद्या देवळांपेक्षा माणूस अधिक महत्त्वाचा आहे आणि आपले फक्त कर्तव्य आपल्या शेजा-यांवर प्रेम करणे व त्याला मदत करणे आहे. पुढे जाऊन येशूने असे शिकविले की देवाची पूजा एखाद्या विशिष्ट ठिकाणी करण्याची गरज नाही, तर पित्याची सेवा आत्म्याने व कृतीने करावी. आत्मा दिसत नाही किंवा दाखवता येत नाही. आत्मा म्हणजे अनंत आत्म्याचे पुत्रत्व असल्याची माणसाची जाणीव होय. मंदिराची गरज नाही. खरे मंदिर म्हणजे प्रेमाने एकत्र राहणा-या माणसांचा समाज होय. तो म्हणाला देवाची सर्व बाह्य पूजा फक्त खोटी आणि अपायकारक नाही तर ती वाईट कृत्ये करण्यास प्रवृत्त करते जशी ज्यूंच्या पूजेमध्ये शिक्षा म्हणून हत्त्या सांगितली आहे आणि पालकांकडे दुर्लक्ष करण्याची परवानगीसुद्धा कारण एखादा माणूस बाहेरचे विधी पूर्ण करून स्वत:ला सदाचरणी समजतो आणि प्रेमाने करायच्या ज्या गोष्टी आहेत त्यांच्या गरजेपासून मुक्त समजतो. तो म्हणाला की जो आपले स्वत:चे दोष जाणतो, तो फक्त जे चांगले आहे त्याचा शोध घेतो आणि चांगली कृत्ये करतो. चांगली कामे करण्यासाठी माणसाला आपल्या स्वत: च्या दोषांची जाणीव असली पाहिजे, पण बाह्य पूजा खोटे स्वयंसमाधान देते. सर्व बाह्य पूजा अनावश्यक आहे आणि बाजूला फेकून दिली जाहिजे.
प्रेमाची कामे ही सोहळयाच्या समारंभाशी विसंवादी आहेत,आणि चांगले त्या मार्गाने करता येणे शक्य नाही. माणूस हा देवाचा आत्मिक पुत्र आहे आणि म्हणून पित्याची सेवा आत्म्यानेच केली पाहिजे.

३ जॉनच्या शिष्यांनी येशूला विचारले की त्याच्या स्वर्गाच्या राज्याचा काय अर्थ करतो आणि त्याने त्यांना उत्तर दिले: मी ज्या स्वर्गाचे प्रवचन देतो ते आणि जॉन सांगतो ते एकच आहे असे की सर्व माणसे,कितीही गरीब असली,तरीही सुखी होतील.
आणि येशू लोकांना म्हणाला: जॉन हा पहिला प्रेषित आहे ज्याने हे प्रतिपादन केले की स्वर्गाचे राज्य बाहेरच्या जगाचे नाही, तर माणसाच्या आत्म्यात आहे. सनातनी जॉनचे ऐकायला गेले पण त्यांना काही समजले नाही कारण त्यानी स्वत: शोधलेले बाह्य देवासंबंधीच फक्त त्यांना माहीत होते; ते त्यांचा शोध शिकवीत आणि त्यांना आश्चर्य वाटत होते की त्यांच्यावर कोणीही लक्ष देत नव्हते. परंतु जॉनने आपल्यामधील देवाच्या राज्याच्या सत्याचा उपदेश केला, आणि म्हणून त्याने त्याच्या पूर्वीच्या कोणाही पेक्षा जास्त काम केले आहे. त्याच्या शिकवणीने कायदे आणि प्रेषित, आणि सर्व बाह्य पूजाअर्चा यांची जागा घेतली आहे. त्याने शिकवल्यापासून हे स्पष्ट झाले आहे की स्वर्गाचे राज्य माणसाच्या आत्म्यात आहे.
सर्व गोष्टींचा आरंभ व अंत माणसाचा आत्मा आहे. जरी प्रत्येक माणसाला वाटते की त्याला त्याच्या शारीरिक पित्याने त्याच्या आईच्या उदरात जन्म दिला आहे,तरी त्याला जाणीव सुद्धा असते की एक स्वतंत्र,बुद्धिमान,आणि शरीरावर अवलंबून नसलेला आत्मा त्याच्यामध्ये आहे.
तो अनंताकडून येणारा शाश्वत आत्मा, आणि ज्याला आम्ही देव म्हणतो तो सर्वांचा उगम आहे. आम्हाला तो माहित आहे जसा आम्ही त्याला फक्त आमच्यामध्ये असलेला ओळखतो. तो आत्मा आपल्या जीवनाचा उगम आहे;त्याला आपण सर्व गोष्टींच्या वर दर्जा दिला पाहिजे आणि आम्ही त्याच्यातच जगले पाहिजे. त्याला आपल्या जीवनाचा पाया करून आम्ही खरे आणि शाश्वत जीवन प्राप्त करतो. पिता-आत्मा ज्याने माणसाला तो आत्मा दिलेला आहे तो माणसाला,

ज्याला शाश्वत जीवनाची जाणीव त्यांच्या स्वत: मध्ये असतांना ती तो घालवून टाकून फसवण्यासाठी पाठवला असणे शक्य नाही. हा माणसातील अनंत आत्मा माणसाला अशासाठीच दिलेला असला पाहिजे की त्याच्या मधून माणसाला अनंत काळचे जीवन प्राप्त व्हावे. म्हणून जो माणूस आपला आत्मा हाच आपले जीवन मानतो तो सार्वकालिक जीवन जगतो, तर जो तसा विचार करीत नाही त्याला खरे जीवन नसते. माणसे जीवन किंवा मृत्यू ते स्वत: निवडू शकतात: आत्म्यामध्ये जीवन किंवा शरीरात मृत्यू. आत्म्यातील जीवन म्हणजे भलेपणा आणि प्रकाश: शरीरातील जीवन म्हणजे बुरेपणा आणि अंधार. आत्म्यात विश्वास ठेवणे म्हणजे चांगली कामे करणे; अविश्वास ठेवणे म्हणजे वाईट कामे करणे. भलेपणा म्हणजे जीवन,बुरेपणा म्हणजे मृत्यू. देव-एक बाह्य निर्माता,सर्वांच्या सुरुवातीची सुरुवात-आम्हाला माहीत नाही. आमची त्याच्याविषयी कल्पना फक्त अशी शक्य आहे: की त्याने माणसात आत्मा पेरलेला आहे जसा एखादा पेरणी करणारा सर्वत्र,शेताच्या कोणत्याही भागात भेदभाव न करता बी पेरतो; आणि जे बी चांगल्या जमिनीवर पडते ते वाढते,पण जे वाईट जमिनीवर पडते ते नष्ट होते. आत्माच फक्त माणसाला जीवन देऊ शकतो,आणि ते टिकवायचे की घालवायचे हे त्यांच्यावर अवलंबून आहे. आत्म्यासाठी वाईट आस्तित्वात नसते. वाईट हा जीवनाचा भ्रम आहे. येथे फक्त जे जिवंत राहणारे आणि जे जिवंत न राहणारे असतात.

अशाप्रकारे जग स्वत:ला सर्व माणसांपुढे सादर करते,आणि प्रत्येक माणसाला त्याच्या आत्म्यात स्वर्गाच्या राज्याची जाणीव असते. प्रत्येकजण आपल्या स्वत:च्या स्वतंत्र इच्छेने त्या राज्यात प्रवेश करावा किंवा नाही हे ठरवू शकतो. तेथे प्रवेश करण्यासाठी त्याने आत्म्याच्या जीवनावर विश्वास ठेवला पाहिजे,कारण जो त्या जीवनावर विश्वास ठेवतो त्यालाच शाश्वत जीवन मिळते.

४ येशूला लोकांसाठी दुख वाटत होते कारण त्यांना खरे सुख माहीत नव्हते,म्हणून तो त्यांना शिकवित होता. तो म्हणाला: ज्यांच्याकडे संपत्ती किंवा कीर्ती नाही आणि त्यांची त्यांना  काळजीही नाही ते सुखी होत,आणि जे कीर्ती आणि संपत्ती मिळवितात ते दु:खी;कारण अनाथ आणि पिळवणूक झालेले पित्याच्या इच्छेत असतात,पण श्रीमंत आणि प्रसिद्ध या क्षणभंगुर जीवनात फक्त माणसांकडून बक्षिसे मिळवित असतात.

पित्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी गरीब आणि तिरस्कृत व्हायला घाबरू नका,पण आनंदी व्हा कारण तुम्ही लोकांना दाखवू शकता खरे सुख काय आहे.

पित्याची इच्छा जी सर्व मानवाला जीवन आणि स्वास्थ्य देते ती अमलात आणण्या साठी,पाच आज्ञा पाळल्याच पाहिजेत:

पहिली आज्ञा आहे कोणाचे काही वाईट करू नका ज्यामुळे राग येईल,कारण वाईटाने वाईट निर्माण होते.

दुसरी आज्ञा आहे बायकांच्या मागे लागू नका आणि जिच्याशी एकदा लग्न केले असेल तिला सोडू नका;कारण बायकांना सोडून देणे आणि बायका बदलणे यातून जागातील सर्व दुराचार  आलेला आहे.

तिसरी आज्ञा आहे कोणत्याही प्रकारची शपथ घेऊ नका. एखादा माणूस कोणतेही वचन देऊ शकत नाही कारण तो पूर्णपणे पित्याच्या अधिकारात असतो;आणि शपथा वाईट उद्देशाने घेतल्या जातात.

चवथी आज्ञा आहे वाईटाचा विरोध करू नका,निषेध करू नका,आणि कोर्टात जाऊ नका;परंतु अन्याय सहन करा आणि लोक मागतात त्यापेक्षा जास्त करा,कारण प्रत्येक माणूस दोषांनी भरलेला आहे आणि दुस-याला मार्गदर्शन करायला असमर्थ आहे. सूड घेऊन आम्ही दुस-यांना तसेच करायला शिकवतो.

पाचवी आज्ञा आहे आपले देशावासी बांधव आणि परदेशी यामध्ये भेदभाव करू नका,कारण सर्व एकाच पित्याची मुले आहोत.

या पाच आज्ञा लोकांनी स्तुती करावी म्हणून नाही तर,तुमच्या स्वत:च्या भल्यासाठी पाळाव्यात;म्हणून लोकासमक्ष प्रार्थना,किंवा उपवास करू नका.

लोकांना काय पाहिजे ते पित्याला माहीत आहे,आणि कशासाठीही प्रार्थना करण्याची गरज नाही;जे सर्व मिळवणे गरजेचे आहे ते पित्याच्या इच्छेने होते. आणि त्याची इच्छा आहे की आम्ही कोणाशी शत्रुत्व भाव ठेवू नये. उपवास करणे अनावश्यक आहे,कारण माणसे लोकांकडून केवळ स्तुती मिळवण्यासाठी उपवास करतात आणि त्यांची स्तुती टाळली

पाहिजे. फक्त पित्याच्या इच्छेत जगण्याची काळजी घेणे आवश्यक आहे,आणि बाकीचे सर्व स्वत:हून घडून येईल. एखादा माणूस शारीरिक गोष्टींची चिंता करीत असेल तर तो स्वर्गाच्या राज्यात लक्ष घालू शकणार नाही. एखाद्या माणसाने अन्न आणि वस्त्र यांची देखील काळजी केली नाही,तरी तो जिवंत राहू शकेल: पिता जीवन देईल.याक्षणाला जे आवश्यक ते सर्व पित्याच्या इच्छेत आहे,कारण पिता त्याच्या मुलांना कशाची गरज आहे ते देतो. जे पिता देतो त्या आत्म्याच्या सामर्थ्याची इच्छा करा. पाच आज्ञा स्वर्गाच्या राज्याचा मार्ग दाखवतात,आणि ही अरुंद वाटच फक्त शाश्वत जीवणाकडे नेते. मेंढ्या असल्याचे दाखवून खोटे शिक्षक-लांडगे नेहमीच लोकांना या मार्गा पासून भलतीकडे नेतात. त्यांच्यापासून सावध रहा! चांगल्याच्या नावाखाली वाईट शिकवण्यावरून खोटे शिक्षक नेहमीच ओळखले जातात. जर ते हिंसा आणि जुलूम शिकवीत असतील तर ते खोटे शिक्षक आहेत. ते जे शिकवतात त्यावरून ते ओळखले जातात. जो देवाचे नाव घेतो तो नाही तर,जो चांगले ते करतो तो देवाची इच्छा पूर्ण करतो. जो या पाच आज्ञा पूर्ण करतो त्याला सुरक्षित आणि खरे जीवन प्राप्त होते,त्यांच्यापैकी काहीही त्याच्याकडून हिरावून घेतले जाणार नाही: पण जो त्या पूर्ण करीत नाही त्याला एक असुरक्षित जीवन मिळते जे त्याच्यासाठी काहीही न सोडता त्याच्याकडून घेतले जाते.
सर्व मानवाला मुक्ततेला मान्यता देणा-या येशूच्या शिकवणीच्या वस्तुस्थितीने लोक आश्चर्यचकित आणि आकर्षित होतात. ती इसाऐहाच्या भविष्यवाणीची पूर्तता होती की,देवाचे निवडलेले मानवासाठी प्रकाश आणतील,जुलुमाने नव्हे, तर सभ्यता,नम्रता,आणि दयाळूपणाने वाईटावर विजय मिळवतील आणि सत्याची पुनर्स्थापना करतील.

५ पित्याच्या आत्म्याचे अपत्य म्हणजे जीवन आहे हे ओळखण्यात शहाणपणा आहे. लोक आपल्या स्वत:पुढे शारीरिक जीवनाची ध्येये ठेवतात,आणि ती ध्येये साध्य करण्यासाठी स्वत:चा आणि दुस-यांचा छळ करतात.पण त्यांच्या जीवनात जर त्यांनी आत्मिक जीवनाची शिकवण स्वीकारली आणि शरीर ताब्यात आणि नियंत्रणात ठेवले तर त्यांच्यासाठी असलेल्या जीवनात त्यांना पूर्ण समाधान मिळेल.
एकदा असे घडले की येशुने दुस-या धर्माच्या एका स्त्रीकडे पिण्यासाठी थोडे पाणी मागितले. आपण वेगळ्या धर्माचे आहोत या सबाबीने त्या विनंतीला तिने नकार दिला. तेव्हा येशू तिला म्हणाला: जर तुला समजले असते की जो तुझ्याकडे पिण्यासाठी पाणी मागत आहे तो जिवंत माणूस असून ज्याच्यामध्ये पित्याचा आत्मा जिवंत आहे,तर तू त्याला नाकारले नसतेस,पण दयाळूपणा करून तू स्वत: पित्याशी आत्म्याने एकरूप होण्याचा प्रयत्न केला असतास,आणि त्या आत्म्याने तुला या पाण्यासारखे नव्हे-जे प्याल्यावर माणसाला पुन्हा तहान लागते-पण जे पाणी शाश्वत जीवन देते असे पाणी दिले असते. एखाद्याने विशेष जागी,देवाची प्रार्थना करायची गरज नाही,पण ज्यांच्या मध्ये त्याचा आत्मा वास करतो त्यांची प्रेमाच्या कृत्यांनी सेवा करून, त्याची सेवा करावी.
येशू त्याच्या शिष्यांना म्हणाला: माणसाचे खरे अन्न हे पिताआत्म्याची इच्छा पूर्ण करणे आहे,आणि हे पूर्ण करणे नेहमीच संभवनीय आहे. आमचे सर्व आयुष्य म्हणजे पित्याने आमच्यामध्ये पेरलेल्या आत्म्याला आलेली फळे जमा करणे होय. ती फळे म्हणजे आम्ही माणसा साठी केलेले चांगले काम होय. आम्ही माणसांचे अविरत आणि बक्षिसाची अपेक्षा न करता चांगले केले पाहिजे.
त्यानंतर येशू जेरुशालेमात असताना तो स्नानगृहाच्या जागी आला ज्याच्या बाजूला एक आजारी माणूस त्याला बरे करणा-या चमत्काराची वाट पहात पडला होता. येशू त्याला असे म्हणाला: चमत्काराने बरे होण्याची अपेक्षा करू नको,परंतु तुझ्या शक्तीने जिवंत रहा आणि जीवनाचा चुकीचा अर्थ घेऊ नको. त्या विकलांगाने येशूची आज्ञा पाळली,तो उठला,आणि दूर निघून गेला. हे पाहून,त्याने साब्बाथच्या दिवशी विकलांगाला बरे केले म्हणून,सनातनी येशूची निर्भर्त्सना करायला लागले. येशू त्यांना म्हणाला: मी काहीही नवीन केलेले नाही. आपला सामाईक पिताआत्मा जे करतो तेच मी केलेले आहे. तो जगतो आणि माणसाला जीवन देतो,मी तसेच केले आहे. हे असे करणे प्रत्येक माणसाचे काम आहे. प्रत्येकाला जीवन निवडण्याचे किंवा नाकारण्याचे स्वातंत्र्य आहे. जीवन निवडणे म्हणजे दुस-यांचे भले करून पित्याची इच्छा पूर्ण करणे;ते नाकारणे म्हणजे दुस-याचे भले नकरता एखाद्याने आपल्या स्वत:च्या इच्छे प्रमाने करणे होय. हे कारावे की ते: जीवन मिळवायचे की नष्ट करायचे हा प्रत्येकाचा अधिकार आहे.
माणसाच्या ख-या जीवनाची तुलना अशी करणे शक्य आहे: एका मालकाने आपल्या गुलामांकडे मौल्यवान संपत्तीचा

भाग दिला आणि जे त्याला दिलेले आहे त्यावर कमाई करायला सांगितले.काहींनी कमाई केली,दुस-यांनी त्याना दिलेले तसेच ठेवून दिले. मालकाने जेव्हा त्यांनी काय केले आहे त्याचा हिशोब मागितला,आणि ज्यांनी कमाई केली होती त्यांना अजून अधिक आपल्या संपत्तीतून दिले,तर ज्यांनी काहीच केले नाही त्यांच्याकडून त्यांच्याजवळ असलेले काढून घेतले.

मालकाच्या मौल्यवान संपत्तीचा भाग म्हणजे माणसात असलेल्या जीवनाचा आत्मा,जो पिता आत्म्याचा पुत्र आहे. जो ह्या जीवनात आत्म्याच्या जीवनासाठी काम करतो तो अनंत जीवन प्राप्त करतो,जो त्यासाठी काम करीत नाही त्याला जे दिलेले आहे तेही घालवतो.

फक्त खरे जीवन हे सर्वांचे सामाईक जीवन आहे,आणि वैयक्तिक जीवन नाही. प्रत्येकाने दुस-याच्या जीवनासाठी काम केले पाहिजे.

त्यानंतर येशू अज्ञात स्थळी गेला आणि पुष्कळ लोक त्याच्या मागे गेले. संध्याकाळच्या सुमारास त्याचे शिष्य आले आणि म्हणाले: आम्ही एवढ्या सर्व लोकांना जेवायला कसे देऊ?

जमावातील काही जणांकडे अन्न नव्हते,आणि काही जणांकडे भाकरी आणि मासे होते. येशू त्याच्या शिष्यांना म्हणाला: तुमच्याकडे असलेली जी असेल ती भाकरी मला द्या. आणि त्याने भाकरीचे तुकडे घेतले आणि त्याने ते भाकरतुकडे आपल्या शिष्यांना दिले,आणि त्यांनी ते दुस-यांना दिले,ज्यांनी तसेच करायला सुरुवात केली.अशाप्रकारे जे वाटले गेले त्याने प्रत्येकाने खाल्ले,आणि तेथे असलेले सर्व अन्न खाऊन न संपता त्याना पुरेसे झाले. आणि येशू म्हणाला: अशा प्रकारे तुम्ही नेहमी वागा. प्रत्येकाने स्वत:साठी अन्न मिळविणे आवश्यक नाही परंतु माणसातील आत्म्याला पाहिजे ते करणे गरजेचे आहे,म्हणजे जे काही असेल ते दुस-या बरोबर वाटणे.

माणसाचे खरे अन्न पित्याचा आत्मा आहे. माणूस फक्त आत्म्याने जगतो. आम्ही ज्याच्यात जीवन आहे त्या सर्वांची सेवा केली पाहिजे,कारण जीवन एखाद्याची स्वत:ची इच्छा पूर्ण करण्यात नसून जीवनाच्या पित्याची इच्छा पूर्ण करण्यात आहे. आणि ती इच्छा जी आत्म्याचे जीवन आहे,जे प्रत्येकाकडे आहे, ते त्याच्याकडे राहिले पाहिजे आणि मृत्युच्या घटके पर्यंत जीवनाच्या आत्म्याची प्रेमाने काळजी घेतली पाहिजे. पिता,सर्व जीवनाचा उगम,आत्मा आहे. जीवन हे पित्याच्या इच्छा पूर्तीत सामावले आहे,आणि ती आत्म्याची इच्छापूर्ती करण्यासाठी शरीराचा त्याग केला पाहिजे. शरीर हे आत्म्याच्या जीवनाकरता अन्न आहे. फक्त शरीराचा त्याग करूनच आत्मा जिवंत राहतो.

त्यानंतर येशूने काही शिष्य निवडले आणि त्यांना आत्म्याच्या जीवनाची शिकवण देण्यासाठी पाठवले. त्यांना पाठवताना तो म्हणाला: तुम्ही आत्म्याच्या जीवनाचा उपदेश करायला जात आहात,म्हणून सर्व शारीरिक इच्छांचा त्याग करा आणि तुमचे स्वत:चे असे काही ठेवू नका. छळ,उपासमार आणि दुख सहन करण्याची तयारी ठेवा. जे शरीराच्या जीवनावर प्रेम करतात ते तुमचा द्वेष करतील,तुम्हाला छळतील,आणि तुम्हाला ठार मारतील;पण घाबरू नका. जर तुम्ही पित्याची इच्छा पूर्ण केलीत तर तुमच्या जवळ आत्म्याचे जीवन असेल,जे कोणीही तुमच्या कडून हिरावून घेऊ शकत नाही.

शिष्य बाहेर पडले आणि जेव्हा ते परत आले तेव्हा त्यांनी जाहीर केले की त्यांनी सर्वत्र वाईटाच्या शिकवणीवर विजय मिळवला आहे.

तेव्हा सनातनी येशूला म्हणाले की त्याची शिकवण,जरी ती वाईटावर विजय मिळविते,तरी ती स्वत: एक वाईट गोष्ट आहे,कारण ज्यांना ती अमलात आणावी लागते त्यांना दुख भोगावेच लागते. त्यावर येशू म्हणाला: वाईट वाईटावर विजय मिळवू शकत नाही. वाईटावर भलेपणाने फक्त प्रभुत्व मिळवता येते,आणि तो भलेपणा ही सर्वानां सामाईक असलेली पिता आत्म्याची इच्छा आहे. प्रत्येक माणसाला स्वत:साठी चांगले काय आहे ते कळते,आणि ते त्याने दुस-यासाठी केले-जर त्याने ते केले जी पित्याची इच्छा आहे-तर तो चांगले करतो. आणि म्हणून जरी सुद्धा त्याच्या बरोबर ती इच्छा पाळणा-यावर दुख भोगणे आणि मृत्यू येतो तरी पिता आत्म्याची इच्छा पाळणे हे चांगले आहे.

६ येशू म्हणाला की,फक्त जे त्याचे कधीच नव्हते पण ज्यांनी त्यांच्या सामाईक पित्याची इच्छा पूर्ण केली आहे त्यांच्यापेक्षा,त्याची आई आणि भाऊ यांचा त्याच्यावर असा काही पहिला अधिकार नाही. एखाद्या माणसाचे जीवन आणि सौख्य त्याच्या कौटुंबिक नात्यांवर नव्हे,तर आत्म्याच्या जीवनावर अवलंबून असते. येशू म्हणाला: जे पित्याचे

आकलन टिकवून ठेवतात ते धन्य होत. आत्म्यात राहणा-या माणसाचे घर नसते-आत्म्याच्या मालकीचे घर असू शकत नाही. तो म्हणाला की त्याचे स्वत:चे असे निश्चित निवास्थान नाही. पित्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी विशेष जागेची गरज नसते,कारण ते नेहमी आणि प्रत्येक ठिकाणी शक्य आहे. पित्याच्या इच्छेला शरण गेलेल्या माणसाला शरीराचा मृत्यूची भीती नसते,कारण आत्म्याचे जीवन शरीरावर अवलंबून  नसते. येशू म्हणतो की जो आत्म्याच्या जीवनावर विश्वास ठेवतो तो कशालाही भिऊ शकत नाही.

कोणतीही खबरदारी घेतली नाही तर माणसाला आत्म्यामध्ये जीवन जगणे असंभव  आहे. एकजण जो म्हणाला की तो प्रथम त्याच्या वडिलांना मुठमाती देऊनच,नंतर येशूची शिकवण पाळील,त्याला येशूने उत्तर दिले: फक्त मरणारे आहेत ते मेलेल्यांना गाडण्याची चिंता करतात, जिवंत नेहमीच पित्याची इच्छा पूर्ण करीत जगतात. कुटुंब आणि घरगुती चिंतामुळे आत्म्याचे जीवन अडवलेच जाऊ नये. पित्याची इच्छा पूर्ण केल्याने आपल्या शारीरिक जीवनावर काय परिणाम होईल याची चिंता जो करतो तो,एका नांगरणी करणा-या माणसा प्रमाणे असतो जो नांगर चालवताना त्याच्या पुढे बघण्या ऐवजी मागे बघतो.

शारीरिक जीवनाच्या सुखाच्या चिंता,ज्या माणसांना खूप महत्त्वाच्या वाटतात,त्या भ्रम आहेत. फक्त खरे जीवनाचे काम हे पित्याची इच्छा जाहीर करणे,तिच्याकडे लक्ष देणे,आणि ती  पूर्ण करणे हे आहे. जेव्हा मार्थाने तक्रार केली की रात्रीच्या जेवणाची तयारी करण्यासाठी तिला एकटीला काम करावे लागत आहे,त्यावेळी तिची बहीण मेरी तिला मदत करण्या ऐवजी त्याची शिकवण ऐकत आहे,येशूने उत्तर दिले: तू तिला अन्यायाने दोष देत आहेस. तुला तुझ्या कामात फळ पाहिजे असेल तर तू स्वत: त्यात व्यस्त रहा,पण ज्यांना शारीरिक सुखाची गरज नसेल त्यांना जीवनासाठी एका अत्यावश्यक असलेल्या गोष्टीकडे लक्ष देऊ दे.

येशू म्हणाला: जो पित्याच्या इच्छा पूर्तीचे खरे जीवन मिळवायची इच्छा करतो,त्याने सर्वात प्रथम त्याच्या स्वत:च्या वैयक्तिक इच्छा सोडूनच दिल्या पाहिजेत. त्याने त्याच्या जीवनाच्या योजना त्याच्या स्वत:च्या इच्छेनुसार ठरवू नयेत,तर त्याने कोणत्याही क्षणी उपासमार आणि दुख सहन करण्याची तयारी ठेवली पाहिजे.

जो आपल्या शारीरिक जीवनाची व्यवस्था आपल्या स्वत:च्या इच्छेनुसार करतो तो पित्याच्या इच्छापूर्तिच्या ख-या जीवनाचा नाश करतो. आणि जर आत्मिक जीवनाचा नाश करणारे  शारीरिक जीवनासाठी मिळवले तर त्यात फायदा नाही.

आत्म्याच्या वाईटासाठी सर्वांत अधिक विनाशकारी,श्रीमंत होण्यासाठी मिळवण्याची लालसा आहे. माणसे विसरतात की कितीही संपत्ती किंवा मालमत्ता त्यांनी मिळवली तरी ते कोणत्याही क्षणी मरणार आहेत,आणि ती संपदा जीवनासाठी आवश्यक नाही. मृत्यू आपल्या प्रत्येकावर टांगता आहे. आजार,खून किंवा अपघात कोणत्याही क्षणी आपल्या जीवनाचा अंत करील.आमच्या जीवनाच्या प्रत्येक सेकंदाला शारीरिक मृत्यू ही अटळ स्थिती आहे. एखाद्या माणसाने जिवंत असताना समजले पाहिजे की आपल्या जीवनाचा प्रत्येक तास म्हणजे कोणाच्या तरी दयेच्या दानाने आपल्या मृत्युला मिळालेली तहकुबी असते. आम्ही हे लक्षात ठेवले पाहिजे,आणि आम्हाला ते माहीत नव्हते असे म्हणू नये. आम्हाला पृथ्वीवर आणि आकाशात जे घडते ते ठाऊक असते आणि आगाऊ कळते,पण मृत्यूला विसरतो,जो आपल्यासाठी कोणत्याही क्षणी थांबलेला असतो. जर आम्ही मृत्युला विसरलो नाही तर आमच्या स्वत:च्या शारीरिक जीवनाला बळी पडणार नाही; कारण आम्ही त्याच्यावर अवलंबून राहू शकत नाही.ख्रिस्ताची शिकवण अनुसरण्यासाठी आम्ही आमच्या शारीरिक जीवनाच्या सेवेचे आणि आमच्या स्वत:च्या इच्छेच्या अनुसरणाचे फायदे,आणि पित्याच्या इच्छा पूर्तीचे फायदे यांचा हिशोब केला पाहिजे. ज्याने स्पष्टपणे याचा हिशोब केलेला आहे तोच फक्त ख्रिस्ताचा शिष्य असू शकतो. परंतु ज्याने हे गणित केले आहे त्याला चांगले आणि खरे जीवन मिळवण्यासाठी खोटे सुख आणि खोटे जीवन सोडून दिल्याचा पश्चाताप वाटणार नाही. खरे जीवन माणसांना देण्यात आले आहे आणि ते त्यांना ठाऊक आहे आणि त्याची हाक ऐकू येते,पण क्षणाच्या चिंतेने सतत विचलित होऊन ते स्वत:ला त्यापासून वंचित ठेवतात. खरे जीवन हे एका श्रीमंत माणसाने ठेवलेल्या मेजवानी सारखे आहे,आणि ज्यांना त्याने पाहुणे म्हणून आमंत्रण केले होते. त्याने त्यांना बोलावले–जसा पिता-आत्म्याचा आवाज सर्व माणसांना त्याच्याकडे बोलावीत असतो. परंतु आमंत्रण दिलेल्यांपैकी काही व्यापारात,दुसरे त्यांच्या शेतीत,दुसरे पुन्हा त्यांच्या कौटुंबिक कामात व्यस्त होते. आणि ते मेजवानीला

गेले नाहीत. फक्त गरीब ज्यांना सांसारिक चिंता नव्हत्या ते मेजवानीला गेले आणि त्यांना सुख मिळाले. म्हणून शारीरिक जीवनाच्या चिंतेमुळे विचलित झालेली माणसे स्वत:ला ख-या जीवनापासून वंचित ठेवतात. जो शारीरिक जीवनाच्या चिंता आणि मिळकत पूर्णपणे नाकारत नाही तो पित्याची इच्छा पूर्ण करू शकत नाही,कारण कोणीही माणूस थोडी स्वत:ची आणि थोडी पित्याची सेवा करू शकत नाही: त्याने हा विचार केला पाहिजे की आपल्या शरीराची सेवा करणे चांगले आहे का आणि स्वत:च्या इच्छे प्रमाने आपल्या जीवनाची व्यवस्था लावणे संभव आहे का. एखाद्या माणसाला घर बांधायची इच्छा असेल, किंवा युद्धाची तयारी करायची असेल तो जे करील तसेच त्याने केले पाहिजे. तो माणूस प्रथम विचार करतो की घर पूर्ण करणे,किंवा शत्रूला जिंकण्या इतकी साधने त्याच्याकडे आहेत का. आणि त्याला असे दिसले की त्याच्याकडे नाहीत,तर तो त्याचे श्रम किंवा सैन्य विनाकारण वाया घालवणार आणि आपल्या शेजा-यांपुढे स्वत:ला हास्यास्पद ठरवणार नाही. जर एखादा माणूस त्याच्या शारीरिक जीवनाची व्यवस्था त्याच्या स्वत:च्या इच्छे प्रमाणे करू शकत असेल,तर शारीरिक जीवनाची सेवा करणे ठीक आहे,पण ते असंभव आहे,शारीरिक गोष्टींचा त्याग करणे आणि आत्म्याची सेवा करणे अधिक चांगले आहे. नाही तर तुम्हाला ही गोष्ट मिळणार नाही आणि तीही मिळणार नाही. तुम्ही शारीरिक जीवनाची व्यवस्था सामाधानकारकपणे करणार नाही,आणि आत्म्याचे जीवन घालवून बसाल. म्हणून पित्याची इच्छा पूर्ण करण्या साठी शारीरिक जीवनाचा त्याग करण्याची गरज आहे. शारीरिक जीवन ही आपल्यावर दुस-याने सोपवलेली संपत्ती आहे,जी आम्ही आपले खरे  धन मिळवण्यासाठी वापरली पाहिजे.

जर एका श्रीमंत माणसाकडे एक कारभारी आहे ज्याला ठाऊक आहे की त्याने त्याच्या मालकाची कितीही चांगली सेवा केली,तरी तो मालक त्याला त्याच्यासाठी काहीही न ठेवता कामावरून काढून टाकील,जर तो कारभारी शहाणा असेल तर आपल्या मालकाचे काम करीत असताना तो इतर लोकांचा फायदा करून देईल. मग जेव्हा मालक त्याला काढून टाकील तेव्हा,ज्यांना त्याने मदत केली होती ते त्याचे स्वागत करतील आणि त्याला आधार देतील. अशा प्रकारे माणसाने त्याच्या शारीरिक जीवनात वागले पाहिजे. शारीरिक जीवन ही अशी संपत्ती आहे,ती आपली स्वत:ची नाही,जी आपल्याकडे काही काळापुरता सोपवलेली आहे. जर आम्ही त्या संपत्तीचा चांगला उपयोग केला जी संपत्ती आपली स्वत:ची नाही,तर मग आम्हाला खरी संपत्ती मिळेल जी आमची स्वत:ची असेल.

जर आम्ही आपली स्वत:ची नसलेली संपत्ती सोडून दिली नाही,तर आम्हाला आमची  खरी संपत्ती मिळणार नाही. आम्ही शरीराचे भ्रामक जीवन आणि आत्म्याचे जीवन दोघांची सेवा करू शकत नाही;आम्ही दोघांपैकी कोणत्यातरी एकाचीच सेवा केली पाहिजे. माणूस मालमत्ता आणि देव यांची सेवा करू शकत नाही. जे मानवामध्ये आदरणीय असते ते देवासमोर निंद्य असते. देवाच्या दृष्टीने संपत्ती वाईट आहे. श्रीमंत माणूस हा अशा साठी अपराधी आहे की तो भरपूर आणि विलासात खातो,जेव्हा त्याच्या दरवाजात गरीब भुकेलेले असतात. आणि प्रत्येकाला माहीत आहे की जी मालमत्ता दुस-या बरोबर वाटली जात नाही ती पित्याची इच्छा पूर्ण न केल्याने राखून ठेवली जाते.

एक श्रीमंत,सनातनी शासक एकादा येशूकडे आला आणि बढाया मारू लागला की त्याने कायद्यातील सर्व आज्ञा पाळल्या आहेत. येशूने त्याला आठवण करून दिली,अशी एक आज्ञा आहे की तुम्ही दुस-यावर स्वत: प्रमाणे प्रेम करावे आणि ती पित्याची इच्छा आहे. शासक म्हणाला तो ती आज्ञाही पाळतो. तेव्हा येशू त्याला म्हणाला: ते खरे नाही;जर तुला खरोखर पित्याची इच्छा पूर्ण करायची इच्छा असती तर तुझ्याकडे मालमत्ता नसती. जर तुमची स्वत:ची संपत्ती तुम्ही दुस-यांना दिली नाही तर तुम्ही पित्याची इच्छा पूर्ण करू शकत नाही. आणि येशू आपल्या शिष्यांना म्हणाला: माणसांना संपत्ती शिवाय जगणे अशक्य वाटते,पण मी तुम्हाला सांगतो आपल्या जवळ असलेले दुस-यांना देण्यात खरे जीवन आहे.

झाकाएस नावाच्या एका माणसाने येशूची शिकवण ऐकली आणि तिच्यावर विश्वास ठेवला,आणि येशूला त्याच्या घरी आमंत्रण देऊन तो म्हणाला: मी माझी निम्मे संपत्ती गरीबांना देत आहे आणि ज्यांचे नुकसान केलेले आहे त्यांना चारपट भरपाई देईन. आणि येशू म्हणाला: हाच एक माणूस आहे जो पित्याची इच्छा पूर्ण करतो,कारण माणसाचे सारे जीवनच ती इच्छा पूर्ण करण्यात गेले पाहिजे,आणि त्यासाठी दुसरी कोणतीही परिस्थिती नाही जिच्यात तो म्हणू शकेल: ‘मी पित्याची इच्छा पूर्ण केली आहे.’

चांगले काम मोजता येत नाही;कोणी जास्त किंवा कमी केले हे सांगणे असंभव आहे. एक विधवा जी आपल्या जवळचा शेवटचा पैसा देते ती हजारो देणा-या एका श्रीमंत माणसापेक्षा जास्त देते.चांगलेपणा त्याच्या उपयोगीते वरूनही

मोजता येणार नाही.
त्या स्त्रीची बाब जिला येशूची द्या आली तिने येऊन कित्येक पौंड किमतीचे तेल बेपर्वाईने त्याच्या पायावर ओतले ते एक उदाहरण आहे.ज्युदास म्हणाला ती मूर्खपणाने वागली कारण त्या तेलाच्या किमतीत अनेक लोकांना जेवण देता आले असते.पण ज्युदास हा एक चोर आणि खोटारडा होता,आणि जेव्हा तो भौतिक फायद्या विषयी बोलला तेव्हा तो गरिबांचा विचार करीत नव्हता. अत्यावश्यक गोष्ट एखाद्या कृतीच्या उपयोगात किंवा देणगीच्या मोठेपणात असत नाही, तर आवश्यक हे आहे की नेहमी,प्रत्येक क्षणाला, दुस-यांवर प्रेम करणे आणि आपल्या जवळ असलेले त्यांना देणे.

७ त्याच्या शिकवणीच्या सत्यतेच्या पुराव्यांच्या ज्यूंच्या मागणीला उत्तर देताना येशू म्हणाला: माझ्या शिकवणीची सत्यता या वस्तुस्थित आहे की माझ्या स्वत:चे काही नाही,तर जे आपल्या सर्वांच्या सामाईक पित्याकडून येते ते मी शिकवतो. जे सर्वांच्या पित्यासाठी चांगले आहे आणि म्हणून सर्व मानवांसाठी चांगले आहे ते मी शिकवतो.

मी सांगतो ते करा,पाच आज्ञा पाळा,आणि तुम्हाला दिसेल की मी जे सांगतो ते सत्य आहे. या पाच आज्ञाचे पालन जगातून सर्व वाईट दूर घालवून देईल,आणि म्हणून त्या निश्चितपणे सत्य आहेत. हे स्पष्ट आहे की जो त्याला ज्याने पाठवले त्याची इच्छा शिकवतो,आणि त्याची स्वत:ची इच्छा नव्हे,तो सत्य शिकवतो.मोजेसचा कायदा मानवी इच्छांची पूर्तता शिकवतो आणि म्हणून तो विरोधाभासाने भरलेला आहे;माझी शिकवण पित्याच्या इच्छेच्या पूर्णतेची आहे आणि म्हणून ती सुसंगत आहे.

ज्यूंना त्याची शिकवण समजली नाही आणि भाकितांमधून उल्लेख केलेला ख्रिस्त तो तोच आहे का याचे बाह्य पुरावे ते शोधू लागले. यावर तो त्यांना म्हणाला: मी कोण आहे आणि माझ्याविषयीच तुमची भाकिते सांगतात का म्हणून प्रश्न विचारू नका, पण माझ्या शिकवणीकडे आणि मी आपल्या सामाईक पित्याविषयी काय सांगतो त्यावर लक्ष द्या. तुम्ही माणूस म्हणून माझ्यावर विश्वास ठेवण्याची गरज नाही,पण मी तुम्हाला आपल्या सर्वांच्या सामाईक पित्याच्या नावाने जे सांगतो त्यावर तुम्ही विश्वास ठेवावा. मी कोठून आलो या बाह्य गोष्टींविषयी चौकशी करणे आवश्यक नाही,तर माझी शिकवण अनुसरणे आवश्यक आहे. जो ती अनुसरेल त्याला खरे जीवन प्राप्त होईल. माझ्या शिकवणीच्या सत्यतेचे पुरावे असू शकत नाहीत. ती स्वत: प्रकाश आहे,आणि जसा प्रकाश प्रकाशित करता येऊ शकत नाही,तसेच सत्याची सत्यता सिद्ध करता येऊ शकत नाही. माझी शिकवण हा प्रकाश आहे. जो ती पाहतो त्याला प्रकाश आणि जीवन प्राप्त होते आणि पुराव्याची गरज लागत नाही,परंतु जो अंधारात आहे त्याने प्रकाशात आलेच पाहिजे.

परंतु ज्यूंनी त्याला पुन्हा तो त्याच्या शारीरिक व्यक्तिमत्वात कोण आहे म्हणून विचारले. तो त्यांना म्हणाला: जसे मी तुम्हाला पहिल्या पासून सांगतो, मी एक माणूस,जीवनाच्या पित्याचा पुत्र आहे. फक्त जो स्वत:ला तसे मानतो (हेच सत्य मी शिकवतो) तो सामाईक पित्याची इच्छा पूर्ण करील;फक्त तो गुलाम असणे संपवील आणि मुक्त मानव होईल. आम्ही चुकीने शरीराचे जीवन खरे मानल्यामुळे गुलाम बनले आहोत. जो सत्य समजून घेतो-की पित्याच्या इच्छेच्या पूर्ततेतच फक्त जीवन आहे-तो मुक्त आणि अमर होतो. जसा गुलाम त्याच्या मालकाच्या घरात नेहमी राहात नाही,परंतु मुलगा राहतो; म्हणून तसेच एखादा माणूस जो शरीराचा गुलाम होऊन राहतो तो कायमचा जिवंत राहू शकत नाही,तर जो आपला आत्मा पित्याच्या इच्छेने भरून घेतो त्याला शाश्वत जीवन प्राप्त होईल. मला समजून घेण्यासाठी तुम्हाला हे समजले पाहिजे की माझा पिता आणि तुमचा पिता ज्याला तुम्ही देव म्हणता तो एकच नाही. तुमचा पिता हा शरीराचा देव आहे,पण माझा पिता हा जीवनाचा आत्मा आहे. तुमचा पिता,तुमाचा देव,हा मत्सरी देव आहे,मानवी हत्त्या करणारा,जो माणसांना शिक्षा करतो. माझा पिता जीवन देतो,आणि म्हणून आम्ही वेगळया पित्यांची मुले आहोत. मी सत्याचा शोध घेतो,आणि तुम्ही मला त्यासाठी,तुमच्या देवाला प्रसन्न करण्यासाठी ठार मारू इच्छिता.तुमचा देव सैतान आहे,वाईटांचा उगम,आणि त्याची सेवा करतांना तुम्ही सैतानाची सेवा करता. माझी शिकवण ही आहे की आम्ही जीवनाच्या पित्याचे पुत्र आहोत,आणि जो माझ्या शिकवणीवर विश्वास ठेवतो तो मृत्यू पहात नाही. ज्यूंनी विचारले: हे कसे शक्य आहे की माणूस मरणार नाही,ज्या सर्वांनी देवाला सर्वाधिक प्रसन्न केले–आब्राहम सुद्धा-ते मरण पावले?मग तू असे कसे म्हणू शकतो की,तू आणि तुझ्या शिकवणीवर विश्वास ठेवणारे,मरणार नाहीत?

त्यावर येशूने उत्तर दिले: मी माझ्या स्वत:च्या अधिकाराने बोलत नाही. मी माणसात राहणा-या जीवनाच्या एकाच

उगमाविषयी ज्याला तुम्ही देव म्हणता त्याच्याविषयी बोलतो. तो उगम मला ठाऊक आहे आणि त्याला जाणून घेणे टाळू शकत नाही,आणि मी त्याची इच्छा जाणतो आणि ती पूर्ण करतो,आणि तो जीवनाचा उगम ज्याच्याविषयी मी बोलतो तो होता,आहे आणि असेल आणि त्याला मृत्यू नाही. माझ्या शिकवणीच्या सत्यतेचे पुरावे मागणे म्हणजे जणू काही एखाद्या जन्मांधाला,दृष्टी मिळाल्यावर विचारण्यासारखे आहे की तो का आणि कसे पाहू शकतो त्याचे पुरावे द्यावेत.

आंधळा माणूस ज्याची दृष्टी परत मिळालेली आहे,तो तोच माणूस असला तरी,फक्त एवढेच म्हणू शकतो की तो आंधळा होता पण आता पाहतो. आणि ज्याला पूर्वी जीवनाचा अर्थ कळत नव्हता पण आता त्याला तो समजतो,तो फक्त तसेच म्हणू शकेल,आणि दुसरे काही नाही.

असा माणूस फक्त एवढेच म्हणू शकेल की पूर्वी त्याला जीवनातील खरे चांगले माहीत नव्हते पण आता त्याला ते माहीत आहे. एखादा आंधळा माणूस ज्याला दृष्टी परत मिळाली आहे,जर त्याला सांगीतले की त्याला योग्य रीतीने बरे केलेले नाही आणि तो ज्याने त्याची दृष्टी परत दिली तो एक दुष्कृत्ये करणारा आहे,आणि त्याला वेगळ्या प्रकारे बरे करायला पाहिजे होते,तर फक्त उत्तर देऊ शकेल: मला माझ्या बरे होण्याच्या अचूकते बद्दल किंवा ज्याने मला बरे केले आहे त्याच्या पापीपणाबद्दल,किंवा बरे करण्याच्या अधिक चांगल्या पद्धतीबद्दल काहीच माहीत नाही;मी फक्त जाणतो की जेथे मी आंधळा होतो,आता पाहतो. आणि अशाच पद्धतीने एखादा ज्याला ख-या कल्याणाची आणि पित्याच्या इच्छेच्या पूर्ततेची शिकवण समजली आहे,तो त्या शिकवणीच्या नियमितपणा विषयी किंवा ज्याने ती उघड केली तो पापी होता,किंवा अधिक मोठ्या सुखाची संभाव्यता होती,परंतु तो फक्त एवढेच म्हणेल: पूर्वी मला जीवनाचा अर्थ दिसत नव्हता,पण आता तो दिसतो आणि एवढेच सर्व मला माहीत आहे.

आणि येशू म्हणाला: माझी शिकवण आतापार्यंत झोपेत असणा-यांना जीवनाला जागे करण्याची आहे: जो माझ्या शिकवणीवर विश्वास ठेवतो तो शाश्वत जीवनासाठी जागा होतो आणि मृत्युनंतर जिवंत राहतो. माझी शिकवण कोणत्याही पद्धतीने सिद्ध करता येणार नाही: माणसे तिला शरण जातात कारण त्या एकीतच सर्व माणसांसाठी जीवनाचे वचन आहे.

ज्या प्रमाणे मेंढ्या मेंढपाळाच्या मागे जातात जो त्यांना अन्न देतो आणि त्यांच्या जीवाचे रक्षण करतो,त्याप्रमाणे माणसे माझी शिकवण स्वीकारतात कारण ती सर्वांना जीवन देते. आणि ज्या प्रमाणे मेंढ्या चोराच्या मागे जात नाहीत जो मेंढवाड्यात बाहेरून चढून येतो,पण त्याच्या पासून बुजून दूर जातात,म्हणून हिंसा आणि देहदंड शिकवणा-या तत्वप्रणालीवर माणसे विश्वास ठेवू शकत नाहीत. माझी शिकवण ही मेंढ्यासाठी असलेल्या एका दरवाजा सारखी आहे,आणि जे माझ्या मागे येतील त्यांना खरे जीवन सापडेल. जसे फक्त ते मेंढपाळ चांगले असतात जे मेंढ्यांचे मालक असतात आणि त्यांच्यावर प्रेम करतात आणि आपले जीवन त्यांच्यासाठी देतात,तर भाडोत्री जे मेंढ्यांवर प्रेम करीत नाहीत ते वाईट मेंढपाळ असतात,म्हणूनच फक्त तो शिक्षक सुद्धा खरा असतो जो स्वत:ला वाचवीत नाही,आणि जो फक्त स्वतःचीच काळजी घेतो तो नालायक असतो. माझी शिकवण ही आहे की एखाद्या माणसाने स्वत:ला वाचवू नये,तर आत्म्याच्या जीवनासाठी शरीराच्या जीवनाचा त्याग करावा. हे मी शिकवतो आणि पूर्ण करतो.

तरीही ज्यूंना समजले नाही आणि अजूनही येशू हा ख्रिस्त(अभिषिक्त) आहे की नाही,आणि म्हणून त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवावा की नाही याचा त्यांना पुरावा पाहिजे होता. ते म्हणाले: आम्हाला सतावू नको,पण आम्हाला सोप्या पद्धतीने सांग,तू ख्रिस्त आहेस की नाहीस?आणि त्यावर येशूने उत्तर दिले: विश्वास शब्दांवर नाही तर कृतींवर ठेवावाच लागतो. मी जे आदर्श घालून दिले आहेत,त्यावरून तुम्हाला कळेल की मी सत्य शिकवतो की नाही. मी जे करतो ते करा,आणि शब्दांची चर्चा करू नका. पित्याची इच्छा पूर्ण करा,आणि मग तुम्ही सर्व माझ्यासह आणि पित्यासह जोडले जाल;कारण मी,मानवाचा पुत्र,पित्याशी एक आहे आणि तुम्ही ज्याला देव म्हणता आणि मी ज्याला पिता म्हणतो त्याच्याशी एक आहे. तुमच्या स्वत:च्या धर्मग्रंथात देखील म्हटले आहे की देव माणसांना म्हणाला: ‘तुम्ही देव आहात’.प्रत्येक माणूस त्याच्या आत्म्याने ह्या पित्याचा पुत्र आहे. आणि जर एखादा माणूस पित्याची इच्छा पूर्ण करीत जगला तर तो पित्याशी एक होतो. जर मी त्याची इच्छा पूर्ण करीन तर,पिता माझ्यात असेल आणि मी पित्यात असेन.

त्यानंतर येशूने त्याच्या शिष्यांना विचारले माणसाच्या पुत्रा विषयी त्याची शिकवण त्यांना कशी समजली आहे. सायमन पिटरने त्याला उत्तर दिले: तुझी शिकवण अशी आहे की तू जीवनाच्या देवाचा पुत्र आहेस,आणि देव म्हणजे माणसात असलेला आत्म्याचे जीवन आहे. आणि येशू त्याला म्हणाला: सायमन,ते समजल्याने,तू सुखी आहेस. माणूस हे

तुला उघड करू शकला नसता,पण तुला ते समजले आहे कारण तुझ्यामधील देवाने तुला ते प्रकट केले आहे. या समजण्यावर मानवाचे खरे जीवन आधारलेले आहे. त्या जीवना करता मृत्यू नाही.

८ त्याच्या शिष्यांनी व्यक्त केलेल्या शारीरिक जीवनाचा त्याग करण्यामुळे मिळणाऱ्या बक्षिसाच्या शंकांना उत्तर देताना,येशू म्हणाला: ज्याला माझ्या शिकवणीचा अर्थ समजतो त्याच्यासाठी बक्षिसाचा प्रश्न नसतो,कारण प्रथम एखादा माणूस जो तिच्यासाठी आपले कुटुंब,मित्र,आणि मालमत्ता सोडून देतो तो शंभरपट जास्त मित्र आणि जास्त मालमत्ता मिळवतो,आणि दुसरे,कारण एखादा माणूस जो बक्षीस मिळवण्याचा प्रयत्न करतो त्याला दुस-यांकडे आहे त्यापेक्षा जास्त पाहिजे असते,आणि ते पित्याच्या इच्छेच्या पूर्ततेच्या बरोबर विरुद्ध आहे. स्वर्गाच्या राज्यात कोणी मोठा किंवा लहान नाही,सगळे सारखे आहेत. जे भलेपणासाठी बक्षिसाची अपेक्षा करतात ते त्या मजुरांप्रमाने आहेत,कारण त्यांच्या मताने ते इतरांपेक्षा जास्त योग्यतेचे होते,त्यांच्या काम देणा-यांकडून त्यांनी ठरलेल्यापेक्षा जास्त पागाराची मागणी केली. येशूच्या शिकवणी प्रमाणे कोणीही दुस-यांपेक्षा जास्त उच्च किंवा जास्त महत्त्वाचा नाही.

सर्वजण पित्याची इच्छा पूर्ण करू शकतात,परंतु ते करतांना कोणीही दुस-यापेक्षा अधिक उच्च किंवा अधिक महत्त्वाचा किंवा अधिक चांगला होत नाही. फक्त राजे आणि त्यांची जे सेवा करतात ते त्या पद्धतीने मानले जातात. माझ्या शिकवणी प्रमाणे,येशू म्हणाला,उच्च दर्जा असू शकत नाही. ज्याला अधिक चांगले व्हायचे आहे त्याने सर्वांचे सेवक झाले पाहिजे. माझी शिकवण ही आहे की, दुस-यांनी त्याची सेवा करावी म्हणून नव्हे तर त्याने आपले सर्व जीवन दुस-यांची सेवा करावी म्हणून माणसाला जीवन देण्यात आले आहे. असे करण्याऐवजी जो स्वत:ला उंचावतो, तो होता त्या पेक्षा खालच्या पातळीवर जाईल.

माणसाने स्वत:ला मोठे करण्याच्या विचाराना सोडून देणे शक्य व्हावे म्हणून जीवनाचा अर्थ आणि उद्देश समजून घेतलाच पाहिजे. जीवनाचा अर्थ पित्याची इच्छा पूर्ण करण्यात आहे,आणि त्याची इच्छा ही आहे की त्याने जे आपल्याला दिले आहे ते त्याला परत द्यावे. जसा मेंढपाळ आपला सर्व कळप सोडून हरवलेली मेंढी शोधायला जातो,आणि एखादी स्त्री तिची हरवलेली पेनी(पैसा) मिळवण्यासाठी सगळीकडे शोधते,म्हणून पित्याचे सातत्यपूर्ण कार्य आपल्याला खरोखर यावरून कळते की तो त्याच्याशी संबंधित गोष्टी त्याच्यास्वतःकडे ओढून घेतो.

आम्ही हे समजून घेतली पाहिजे की खरे जीवन कशात आहे. हरवलेल्यांना त्यांच्या योग्य जागी परत आणण्यात खरे जीवन आहे,आणि जे झोपलेले आहेत त्यांना जागे करण्यात आहे. ज्या लोकांकडे खरे जीवन आहे आणि त्यांच्या असण्याच्या उगमाशी परत आलेले आहेत,ते सांसारिक माणसांप्रमाणे दुस-याना चांगले किंवा वाईट समजणार नाहीत,तर पित्याच्या जीवनात भागीदार होतील आणि पित्यापासून हरवलेले परत आले म्हणून आनंदी होतील. जर एखादा बहकलेला मुलगा त्याला पश्चाताप होतो आणि ज्या पित्याला त्याने सोडले होते त्याचाकडे परत येतो, तर त्याच पित्याच्या इतर पुत्रांना पित्याचा आनंदाचा मत्सर कसा वाटेल,किंवा त्यांच्या भावाच्या परतण्याने आनंदी होणार नाहीत का?

शिकवणीवर विश्वास ठेवण्यासाठी आणि आमच्या जीवनाचा मार्ग बदलण्यासाठी आणि शिकवण पूर्ण करण्यासाठी,ज्याची गरज आहे ते बाह्य पुरावे किंवा बक्षिसांची वचने नाही तर,खरे जीवन काय आहे याची स्पष्ट समज होय. जर आपण आपल्या जीवनाचे पूर्णपणे मालक आहोत आणि शारीरिक आनंदासाठी त्यांना जीवन मिळालेले आहे,असा विचार माणसे स्वत:शी करतील तर मग स्पष्टपणे त्यांनी दुस-यासाठी केलेल्या प्रत्येक त्यागाचे कृत्य त्याना बक्षीस पात्र वाटेल,आणि अशा बक्षिसाशिवाय ते काहीही देणार नाहीत. जर कुळ हे विसरले की बाग त्यांच्याकडे या अटीवर दिलेली आहे की त्यांनी फळे मालकाला परत करावीत,आणि त्यांच्याकडून पुन्हा पुन्हा सारा मागितला जाईल,ते वसूली करणा-याला ठार मारतील. म्हणून जे त्यांच्या स्वत:च्या जीवनाचे मालक समजतात आणि हे समजत नाहीत की जीवन त्यांना एका करारानुसार देण्यात आले आहे ज्यामध्ये त्याच्या इच्छा पूर्तीची मागणी आहे. विश्वास ठेवण्यासाठी आणि कृती करण्यासाठी,हे समजणे आवश्यक आहे की माणूस स्वत: काही करू शकत नाही,आणि जर तो आपले शारीरिक जीवन चांगल्याच्या सेवेसाठी देतो तर तो त्यासाठी आभार किंवा बक्षिसास पात्र नसतो. आम्ही हे समजले पाहिजे की चांगले करण्यात माणूस आपले कर्तव्य करतो आणि जे त्याने करणे आवश्यकच असते. फक्त जेव्हा तो जीवन

अशा प्रकारे समजून घेईल तेव्हा त्याच्यामध्ये चांगली कामे करण्यासाठी सक्षम करणारा विश्वास असेल.

जीवनाच्या त्या समजून घेण्यातच स्वर्गाचे राज्य सामावलेले आहे. ते दृश्य राज्य नाही की जे ह्या किंवा त्या जागी दाखवता येऊ शकेल.स्वार्गाचे राज्य माणसाच्या आकलन शक्ती मध्ये आहे. सर्व जग जुन्या पद्धतीने जगत आहे: माणसे खातात आणि पितात,लग्न करतात,व्यापार करतात आणि मरतात,आणि या बरोबरच माणसांच्या आत्म्यात वसणारे स्वर्गाचे राज्य-जीवनाचे आकलन एखाद्या वृक्षाप्रमाणे वाढते जो वसंतात स्वत:मधून पालवी बाहेर काढतो.

खरे जीवन हे पित्याची इच्छा पूर्ती आहे,ते भूतकाळात नाही किंवा भविष्यकाळात नाही,तर आता आहे;जे या वर्तमान क्षणाला आपल्या पैकी प्रत्येक जणाने करायलाच पाहिजे. आणि म्हणून खरे जीवन जगण्यासाठी आम्ही कधीच आराम करता कामा नये. माणसे जीवनाचे रक्षण करण्यासाठी आहेत,भूतकाळात किंवा भविष्यकाळात नाही, तर आता जगत असलेले जीवन,आणि त्यामध्ये सर्व माणसांच्या पित्याची इच्छा पूर्ण करणे होय. जर त्यांनी हे जीवन पित्याची इच्छा पूर्ण नकरता त्यांच्याकडून निसटू दिले तर,त्यांना ते पुन्हा परत मिळणार नाही. एखादा पहारेकरी सर्व रात्रभर पहारा करायला नेमला असेल त्याने जर क्षणभर झोप घेतली तरीही त्याने त्याचे कर्तव्य पार पाडले नाही,कारण चोर त्या क्षणालाच येईल. म्हणून माणसाने आपली सारी शक्ती चालू घटकेला लावली पाहिजे,कारण फक्त तरच तो पित्याची इच्छा पूर्ण करू शकतो;आणि ती इच्छा हीच सर्व माणसांचे जीवन आणि सुख आहे. जे चांगले करतात तेच फक्त जगतात. आता चालू काळात माणसाचे चांगले करणे,हेच जीवन जे आपल्याला सामायिक पित्याशी जोडते.

९ माणूस ख-या जीवनाचे ज्ञान घेऊन जन्माला येतो जे पित्याची इच्छा पूर्ण करण्याचे आहे. मुले त्या ज्ञानाने जगतात: त्यांच्यामध्ये पित्याची इच्छा दिसते. येशूची शिकवण समजण्यासाठी एखाद्याने मुलांचे जीवन समजूनच घेतले पाहिजे आणि त्यांच्याप्रमाणे झाले पाहिजे.

मुले पाच आज्ञांचा भंग न करता,पित्याच्या इच्छेत जगतात, आणि त्यांना मोठ्या माणसांनी चुकीचा मार्ग दाखवला नाही तर ती कधीच त्यांचा भंग करणार नाहीत. ह्या आज्ञा मोडायला लावून माणसे मुलांना बिघडवतात. आणि हे करीत असताना ते अशी कृती करतात की जणू काही एखाद्या माणसाच्या गळयात जात्याचा दगड बांधून त्याला नदीत फेकावे. जग दु:खी आहे कारण फक्त लोक मोहाला बळी पडतात,पण त्याच्या शिवाय जग सुखी असते. त्यांच्या क्षणभंगुर जीवनात काल्पनिक फायद्यासाठी वाईट वागण्यासाठी लोकांना मोह आकर्षित करतो. मोहाला बळी पडल्याने माणसांचा नाश होतो,आणि म्हणून मोहात पडण्या पेक्षा सर्वकाही सोडून देणे अधिक चांगले. ते स्वत: दुस-यासाठी बरोबर,आणि दुसरे त्यांच्यासाठी चुकीचे आहेत असे मानण्यातून पहिली आज्ञा मोडण्याचा मोह माणसांना होतो. त्या मोहात पडणे टाळण्यासाठी आपण लक्षात ठेवले पाहिजे की माणसे नेहमीच पित्याच्या अनंत ऋणात असतात आणि त्यांच्या मानव भावाला क्षमा करून त्या ऋणातून ते स्वत:ला मुक्त करू
शकतात.

म्हणून माणसांनी जखमांची क्षमाच केली पाहिजे,आणि गुन्हेगाराने त्यांना पुन्हा पुन्हा जखमी केले तरी नाउमेद होऊ नये. कसेही कितीही वेळा एखाद्या माणसाने चूक केली तरी चुका लक्षात न घेता त्याला क्षमाच केली पाहिजे,कारण फक्त क्षमेनेच स्वर्गाचे राज्य मिळवणे शक्य आहे. जर आम्ही दुस-यांना क्षमा केली नाही,तर आम्ही त्या ठराविक ऋणको सारखे वागतो,जेव्हा तो माठ्या कर्जात असतो,तेव्हा त्याच्या धनको कडे जातो आणि दया करण्यासाठी विनवितो.त्याचा धनको त्याला सर्व गोष्टींची क्षमा करतो,परंतु तो ऋणको दूर जातो आणि ज्या माणसाने त्याच्या कडून थोडी रक्कम घेतलेली असते तो भेटल्यावर,त्याचा गळा दाबायला सुरुवात करतो. जीवन मिळवण्यासाठी आपण पित्याची इच्छा पूर्ण केली पाहिजे. आम्ही त्याची इच्छा पूर्ण करण्यात अयशस्वी होतो म्हणून त्याच्या कडे क्षमा मागतो,आणि क्षमा मिळण्याची आशा करतो. मग जर आम्ही स्वत: दुस-यांना क्षमा करीत नाही तेव्हा आम्ही काय करतो?ज्याची आम्हाला स्वत:ला भीती आहे तेच आम्ही त्यांच्यासाठी करतो.

पित्याची इच्छा म्हणजे कल्याण;आणि वाईट आपल्याला पित्यापासून वेगळे करते. मग शक्य तेवढ्या लवकर वाईटाचा,जे आमच्या जीवनाचा नाश करते आणि लुटते त्याचा नाश करणे आम्हाला कसे संभवनीय होत नाही?वाईट आम्हाला शारीरिक नाशाच्या जाळयात अडकवते. आम्ही जेवढे त्या जाळयातून निसटू तेवढे आम्हाला जीवन प्राप्त

होईल आणि आम्ही इच्छा करू ते आम्हाला मिळेल. आम्ही वाईटामुळे एकमेकांपासून वेगळे नाही तर प्रेमामुळे एक आहोत.

स्त्री ही शारीरिक सुखासाठी निर्माण केली आहे असा विचार केल्याने माणसांना दुस-या आज्ञेचा भंग करण्याचा मोह होतो,आणि एक पत्नी सोडली आणि दुसरी घेतली तर त्यांना जास्त सुख मिळेल असा त्यांचा समज असतो. या मोहात पडायचे टाळण्यासाठी आम्ही लक्षात ठेवले पाहिजे की पित्याची इच्छा अशी आहे की,माणसाने स्त्रीच्या सौंदर्याने स्वत: आनंदी होऊ नये,तर प्रत्येक माणसाने एक स्त्री निवडली आहे तिच्याशी एक व्हावे. पित्याची इच्छा आहे की प्रत्येक माणसाला एक पत्नी आणि प्रत्येक पत्नीला एक पती असावा. जर प्रत्येक माणूस एक पत्नीसह राहतो,तर प्रत्येकाला एक पत्नी आणि प्रत्येक स्त्रीला एक पती असेल. जो आपली पत्नी बदलतो तिला तिच्या पती पासून वंचित करतो आणि दुस-या माणसाला आपली पत्नी सोडणे  आणि या सोडून दिलेलीला घेण्याची संधी देतो. माणसाला विवाह करण्याची अजिबात गरजच नाही,पण एकापेक्षा जास्त बायका असूच नयेत,कारण जर तो तसे करतो तर ते पित्याच्या इच्छे विरुद्ध करतो जी अशी आहे की एका पुरुषाने एका स्त्री बरोबर एक व्हावे.

माणसांना त्यांच्या ऐहिक जीवनाच्या फायद्यासाठी निर्माण कलेल्या, अधिकारांची स्थापना, आणि त्या अधिकाराची मागणी पूर्ण करण्यासाठी त्यांच्या शपथा घेऊन एकमेकाशी बांधून घेतात त्यातून तिसरी आज्ञा मोडण्याचा मोह होतो. ह्या मोहाला बळी पडणे टाळण्यासाठी माणसांनी लक्षात ठेवले पाहिजे की त्यांच्या जीवनासाठी कोणत्याही सत्तेचे नाही तर ते देवाचे ऋणी आहेत. अधिका-यांची मागणी म्हणजे हिंसा समजली पाहिजे पण वाईटाचा प्रतिकार न करण्याच्या आज्ञेनुसार, सत्तेने मागितलेली मालमत्ता आणि श्रम माणसानी घेऊ द्यावेपण त्यांनी त्यांच्या वागण्याविषयी प्रतिज्ञा करून शपथ घेऊनये कारण लादलेली शपथ वाईटाकडे नेते. जो आपले जीवन पित्याच्या इच्छेतच असण्यात आहे हे ओळखतो तो आपले वागणे प्रतिज्ञामध्ये बांधून टाकणे शक्य नाही कारण असा माणूस आपले जीवन सर्वात जास्त पवित्र मानतो.

माणसांना चवथी आज्ञा मोडण्याचा मोह होतो असा विचार करून की ते स्वत: राग आणि सूड उगवून दुस-यांना सुधारू शकतील. जर एखादा माणूस दुस-याचा अपराध करतो,तर लोकांना वाटते की त्याला शिक्षा केली पाहिजे आणि मानवी न्याय निःपक्षपाती असतो.

या मोहात पडण्याचे टाळण्यासाठी आम्ही लक्षात ठेवले पाहिजे की माणसांना एकमेकांचा न्याय करण्यासाठी नव्हे तर एकमेकांना वाचवण्यासाठी निर्माण केले आहे,आणि ते एकमेकांच्या अपराधांचा न्याय करू शकत नाहीत कारण ते स्वत: दुष्टपणाने भरलेले आहेत. ते एक गोष्ट करू शकतात ती म्हणजे आपल्या शुद्धता,क्षमाशीलता,आणि प्रेमाच्या उदाहरणाने दुस-यांना शिकवू शकतात.

माणसांना पाचवी आज्ञा मोडण्याचा मोह असा विचार करून होतो की आपले स्वत:चे देशवासी आणि दुस-या देशाचे लोक यामध्ये फरक आहे,आणि म्हणून हे आवश्यक आहे की त्यांनी स्वत:चे दुस-या राष्ट्रा विरुद्ध संरक्षण केले पाहिजे आणि त्यांची हानी केली पाहिजे. या मोहात पडण्यापासून वाचण्यासाठी हे कळणे आवश्यक आहे की सर्व आज्ञांचा सारांश असा आहे: कोणताही भेदभाव न करता सर्व माणसाचे भले करणे,आणि अशा प्रकारे ज्याने जीवन आणि सर्वांना सुख दिले आहे त्या पित्याची इच्छा पूर्ण करणे. जरी दुसरे सुद्धा असा भेदभाव करीत असतील,आणि जरी राष्ट्रे,एकमेकांना परकीय समजून,युद्धावर जात असतील,तरीही पित्याची इच्छा पूर्ण करण्या साठी,प्रत्येक माणसाने सर्वांचे आपल्या देशाशी युध्द करीत असलेल्या देशातील लोकांचे देखील भले केले पाहिजे.

मानवी भ्रमात सापडू नये म्हणून आम्ही भौतिक नव्हे तर आत्मिक जीवनाचा विचार केला पाहिजे. जर माणसाला समजले की जीवन फक्त आता पित्याच्या इच्छेतच असण्यात आहे,तर उपासमार,किंवा दुख सोसणे,किंवा मरण,त्याला भीतीदायक वाटणे शक्य नाही. फक्त तो माणूसच खरे जीवन प्राप्त करतो जो प्रत्येक क्षणाला पित्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी आपले भौतिक जीवन सोडून द्यायला तयार असतो. आणि प्रत्येकाला हे समजून येईल की खरे जीवन असे आहे की त्यात मृत्यू नाही,येशू म्हणाला: शाश्वत जीवन आताच्या जीवना प्रमाणे आहे असे समजू नये. कारण पित्याच्या इच्छेमधील ख-या जीवनाला स्थळ नाही किंवा काळ नाही.

जे पित्याच्या इच्छे मधील जगण्याच्या ख-या जीवनासाठी जागे झालेले आहेत त्यांच्यासाठी स्थळ नाही किंवा काळ नाही. ते पित्यासह राहतात. जर आपल्यासाठी ते मेले असतील,तर पित्यासाठी जिवंत आहेत. म्हणून एक आज्ञा

तिच्यामध्ये सर्व सामावते: ज्या प्रत्येकामध्ये जीवनाचा उगम आहे त्या सर्व माणसांवर प्रेम करा.

आणि येशू म्हणाला: ज्याची तुम्ही वाट बघता आहात तो जीवनाचा उगम ख्रिस्त आहे. त्या जीवनाच्या उगमाचे आकलन,ज्याच्यासाठी माणसात फरक नाही आणि काळ नाही किंवा स्थळ नाही,तो मानवाचा पुत्र आहे ज्याला मी शिकवतो. जो माणसांपासून त्या जीवनाच्या उगामाला सर्व झाकून टाकतो तो मोह आहे. तो मोह-लेख लिहिणा-यांचा,पुस्तकी माणसांचा,आणि भौतिकतावाद्याचा-त्याला बळी पडू नका. सत्तेचा मोह असतो, त्याला बळी पडू नका, आणि सर्वात जास्त भयानक मोह,स्वत:ला सनातनी म्हणविणा-या धार्मिक गुरुंचा असतो. या शेवटच्या मोहापासून इतर सर्वांपेक्षा जास्त सावध रहा. कारण हे स्वअभिषिक्त गुरु,तेच फक्त,खोट्या देवाची पूजा रचून तुम्हाला ख-या देवासून आमिष दाखवून जाळयात ओढतात. जीवनाच्या पित्याची कृतीने सेवा करण्या ऐवजी,ते शब्दांचा वापर करतात,आणि आपण स्वत: काहीही न करता शब्द शिकवतात. तुम्ही त्यांच्याकडून फक्त शब्दांशिवाय काही शिकू शकत नाही,आणि पित्याला कृती पाहिजे असते. ते काहीही शिकवू शकत नाहीत कारण त्यांना स्वत:लाच काही माहीत नाही,आणि फक्त स्वत:च्या फायद्या साठी स्वत:ला गुरु म्हणून स्थापण्याची इच्छा ठेवतात. परंतु तुम्हाला ठाऊक आहे की कोणीही माणूस दुस-याचा गुरु असू शकत नाही. सर्व मानवाचा एकच गुरु आहे-जीवनाचा प्रभू ती आकलनशक्ती. परंतु हे स्वयंशैलीचे गुरु,दुस-यांना शिकवतात असे समजून,स्वत:ला ख-या जीवनापासून वंचित ठेवतात आणि दुस=यांना ते समजून घेण्यापासून अडवतात. ते लोकांना शिकवतात की त्यांचा देव बाह्य विधींनी प्रसन्न होईल,आणि त्यांना वाटते की ते लोकांना व्रत-वैकल्याने देवाकडे आणू शकतील. त्यांना बाह्य गोष्टींची चिंता आहे. धर्माचा बाह्य अंगीकार त्याना समाधान देतो,पण लोकांच्या हृदयात काय चालले आहे याचा ते विचार करीत नाहीत. आणि म्हणून ते बाहेरून सुंदर पण आतून किळसवाण्या, सुशोभित थडग्यांसारखे आहेत. शब्दात ते संतांचा आणि हुतात्म्यांचा आदर करतात, पण अगदी तेच लोक आहेत ज्यांनी संतांना पूर्वी छळले आणि ठार मारले आणि आताही संतांना छळतात आणि ठार करतात. त्यांच्याकडूनच जगाचे सर्व मोह येतात कारण चांगल्याच्या मिषाने ते वाईट शिकवतात.

त्यांनी निर्माण केलेले वाईट हे दुस-या सर्वांचे मूळ आहे,कारण ते जगातील सर्वात पवित्र गोष्टीचे विडंबन करतात. ते त्यांची लबाडी करीत राहतील आणि जगातील वाईट वाढवतील,आणि ते बदलण्यासाठी पुष्कळ काळ जावा लागेल. परंतु अशी वेळ येईल की जेव्हा सर्व चर्चेस आणि देवाची बाह्य पूजा नष्ट होईल,आणि जीवनाच्या एकाच देवाची सेवा करण्यासाठी आणि त्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी माणसे जाणतील,आणि प्रेमाने एक होतील.

१० ज्यूंनी पाहिले की येशूची शिकवण त्यांचा राष्ट्रीय धर्म आणि त्यांचे राष्ट्रीयत्व नष्ट करील,आणि त्याच वेळी दिसले की ते तिचे खंडन करू शकत नव्हते,म्हणून त्यांनी त्याला ठार मारायचे ठरवले. त्याचा निष्पापपणा आणि प्रामाणिकपणा त्यांना आडवा येत होता पण येशू कोणत्याही प्रकारे दोषी नसताना त्याला ठार मारण्यासाठी उच्च याजक कैफासाने एक देखावा तयार केला.कैफास म्हणाला: हा माणूस निष्पाप किंवा दोषी आहे की नाही याची चर्चा करण्याची आम्हाला गरज नाही;आम्ही आपले लोक वेगळे ज्यू राष्ट्र म्हणून राहावे की तुटून जावे आणि विखरून जावे अशी आमची इच्छा आहे याचा विचार करायला पाहिजे. जर आम्ही या माणसाला एकटे सोडले आणि त्याला ठार मारले नाही तर राष्ट्र नाश पावेल आणि लोकांची पांगापांग होईल. या युक्तिवादाने निर्णय ठरला,आणि येशूला ठार मारावेच यासाठी सनातनी सहमत झाले;आणि तो जेरुसालेमात दिसताच त्याला पकडण्याचा हुकूम त्यांनी लोकांना दिला.

जरी त्याला हे माहीत होते तरी सुद्धा,येशू पासोव्हरच्या सणासाठी जेरुसालेमात गेला. त्याच्या शिष्यांनी त्याला न जाण्यासाठी विनविले,पण तो म्हणाला: सनातन्यांना माझे जे करायची इच्छा आहे,आणि कोणीही माणूस जे सर्वकाही करील,त्यामुळे माझ्यासाठी सत्य बदलू शकणार नाही. जर मला प्रकाश दिसतो तर मी कोठे आहे व कोठे चाललो हे मला माहीत आहे. फक्त ज्याला सत्य कळलेले नसते त्याला कशाची तरी भीती किंवा कशाचीतरी शंका वाटू शकते. फक्त ज्याला दिसत नाही,तो अडखळतो. आणि तो जेरुसालेमात गेला,रस्त्यात बेथानीला थांबला. तेथे मेरीने मौल्यवान तेलाचा बुन्दला त्याच्यावर रिकामी केला,आणि जेव्हा एवढे मौल्यवान तेल वाया घालवल्या बद्दल,शिष्य तिला दोष देऊ लागले,तेव्हा येशू,त्याचा शारीरिक मृत्यू जवळ आलेला आहे हे जाणून,म्हणाला की तिने जे केलेले आहे ती त्याच्या दफनाची तयारी आहे. जेव्हा त्याने बेथानी सोडले आणि जेरुसलेमला गेला तेव्हा जमाव त्याला भेटला आणि त्याच्या

सोबत निघाला,आणि ह्यामुळे त्याला ठार मारण्याच्या गरजेची सनातनी लोकांची अजून अधिकच खात्री पटली. त्यांना त्याला पकडण्याची एक संधी फक्त पाहिजे होती. त्याला माहिती होते की, आता कायद्या विरुद्ध, त्याच्याकडून आलेला किमान अविचारी शब्द त्याच्या देहदंडासाठी वापरला जाणार होता;परंतु असे असूनही तो देवळात गेला आणि पुन्हा त्याने ज्यूंची बळी देण्याची आणि मद्याचा नैवेद्य दाखवण्याची देवपूजा खोटी आहे असे जाहीर केले,आणि त्याने पुन्हा त्याच्या शिकवणीची घोषणा केली. परंतु त्याची शिकवण,प्रेषितांच्यावर आधारीत,अशी होती की सनातनी त्याला मृत्युदंड देण्यासाठी,विशेष म्हणजे पुष्कळ सामान्य लोक त्याच्या बाजूला असताना उघड त्याने कायदा मोडल्याचा शोध घेऊ शकले नाहीत. परंतु सणाला तेथे काही परधर्मी लोक आले होते ज्यांनी येशूच्या शिकवणी विषयी ऐकले होते,त्याच्या बरोबर त्यावर चर्चा करायची त्यांची इच्छा होती. हे ऐकून शिष्य भयभीत झाले. त्यांना भीती वाटली की येशू परधर्मियांशी बोलून स्वत:चा घात करील आणि लोकांना भडकावील.प्रथम त्यांना परधर्मियांना येशूच्या संपर्कात येऊ द्यायचे नव्हते,पण नंतर त्यांनी ठरवले की हे त्याला सांगावे या माणसांना त्याच्याशी बोलायचे आहे. हे ऐकल्यावर, येशू अस्वस्थ झाला. त्याला समजले की त्याचे परधर्मीयांशी बोलणे त्याने संपूर्ण ज्यू कायदा नकाराल्याचे स्पष्ट करील,जे जमावाला त्याच्यापासून दूर नेईल,आणि तिरस्करणीय परधर्मीयांशी संबंध ठेवल्याने तो सनातन्यांना त्याला दोष देण्याची संधी देईल;आणि हे जाणून तो क्षुब्ध झाला. परंतु त्याला हेही माहीत होते की त्याचे जीवित कार्य माणसांना एकाच पित्याचे पुत्र,त्यांची श्रद्धेच्या फरकांशिवाय एकी हे स्पष्ट करण्यासाठी होते. त्याला माहित होते की असे करण्याची किमंत म्हणून त्याला त्याचे शारीरिक जीवन द्यावे लागेल परंतु तो तोटा माणसांना जीवनाची खरी समज देईल,आणि म्हणून तो म्हणाला: जसा गव्हाचा दाणा फळ येण्यासाठी नाश पावतो तसा मी,आत्मिक फळ मिळवण्यासाठी माझे शारीरिक जीवन दिलेच पाहिजे. जो आपले शारीरिक जीवन घट्ट धरून ठेवतो तो त्याचे खरे जीवन गमावतो,परंतु जो आपले शारीरिक जीवन देण्यास नाखुश असत नाही तो खरे जीवन प्राप्त करतो. माझ्यापुढे जे वाट बघते आहे त्यामुळे मी क्षुब्ध झालो आहे,पण आता पर्यंत या घटकेची तयारी करण्याकरता मी जिवंत राहिलो,मग जे करायलाच पाहिजे ते मी करण्याचे कसे टाळू? म्हणून आता पित्याची इच्छा माझ्यामधून व्यक्त होऊ दे.

आणि परधर्मीय आणि ज्यू,लोकांकडे वळून,येशूने उघडपणे जाहीर केले जे त्याने खाजगीमध्ये फक्त निकोदेमसला सांगीतले होते. तो म्हणाला: माणसाची जीवने त्यांचे वेगवेगळे पंथ आणि सरकारे यांच्यासह सर्व बदललीच पाहिजेत. सर्व मानवी सत्ताधारी नाहीसेच झाले पाहिजेत. जीवनाच्या पित्याचा पुत्र म्हणून माणसाचा (गुणधर्म)स्वभाव समजने फक्त गरजेचे आहे,आणि ही समज माणसांची सर्व विभागणी आणि सत्ताधारी नष्ट करते आणि सर्व माणसांना एक करते. ज्यू म्हणाले: तू आमचा संपूर्ण पंथ नष्ट करीत आहेस. आमचा कायदा एका ख्रिस्ताविषयी सांगतो,पण तू फक्त माणसाच्या पुत्राविषयी बोलतोस आणि म्हणतोस की त्याला उंचावले जाईल. त्याचा अर्थ काय?त्याने उत्तर दिले: माणसाच्या पुत्राला उंचावणे म्हणजे जे माणसात अस्तित्वात असते त्या आकलनाच्या प्रकाशाने जगणे,आणि जोपर्यंत प्रकाश आहे,त्या प्रकाशात जगणे. मी नवीन श्रद्धा शिकवीत नाही तर फक्त जे प्रत्येक माणसात त्याच्या स्वत: मध्ये आहे ते त्याला माहीत असते. प्रत्येक माणूस त्याच्या स्वत: मधील जीवन जाणून असतो,आणि प्रत्येक माणसाला माहीत असते की जीवनाच्या पित्याने त्याला आणि सर्व माणसांना जीवन दिले आहे. माझी शिकवण फक्त एवढीच आहे पिता आम्हाला सर्वांना देत असलेल्या जीवनावर माणसाने प्रेम करावे. पुष्कळ अनधिकृत लोक येशूवर विश्वास ठेवीत होते;पण प्रसिद्ध आणि अधिकृत वर्गातील लोक त्याच्यावर विश्वास ठेवीत नव्हते,कारण त्यांना जे त्याने सांगीतले त्याचा वैश्विक आशय मानायची इच्छा नव्हती,आणि त्याची तात्पुरती वर्तणूक काय आहे याचा विचार ते करीत होते. त्यांना दिसले की त्याने लोकांना त्यांच्यापासून वळवले आणि त्याला ठार मारायची त्यांची इच्छा होती; परंतु त्याला उघडपणे पकडायची त्यांना भीती वाटत होती,आणि ते त्यांना गुप्तपणे करायचे होते-पण जेरुसलेमात आणि दिवसा नाही. आणि त्याच्या बारा शिष्यांपैकी एक,जुदास इस्कारीअत,त्यांच्याकडे आला,आणि जेव्हा तो लोकांपासून लांब असेल तेव्हा त्यांच्या गुप्तहेरांना येशूकडे नेण्यासाठी त्यांनी त्याला लाच दिली.जुदासाने ते करण्याचे वचन दिले,आणि परत येशूकडे गेला,त्याचा विश्वासघात करण्याच्या योग्य संधीची वाट बघत राहिला. सणाच्या पहिल्या दिवशी येशूने त्याच्या शिष्यांसह पासोव्हर पाळला,आणि असा विचार करीत की येशूला त्याच्या दागाबाजीची जाणीव नाही, त्याचा विश्वासघात करण्याच्या संधीची वाट पहात ज्युदास त्यांच्या सोबत राहिला. परंतु येशूला माहीत होते की ज्युदासाने त्याला विकले होते,आणि जसे

ते सर्व मेजावर बसले त्याने भाकर घेतली,ती बारा तुकड्यात मोडली,आणि प्रत्येक शिष्याला एक तुकडा दिला,इतरांप्रमाणे ज्युदासालाही दिला,आणि कोणाचे नाव न घेता,म्हणाला: घ्या,खा माझे शरीर.नंतर त्याने वाईनने भरलेला पेला घेतला,ज्युदासासह, तो त्याने,पिण्यासाठी सर्वांना दिला. आणि म्हणाला: तुमच्या पैकी एकजण माझे रक्त सांडील.माझे रक्त प्राशन करा.नंतर तो उठला आणि सर्व शिष्यांचे पाय धुतले,आणि जेव्हा त्याने हे केले तेव्हा तो म्हणाला: मला ठाऊक आहे की तुमच्यापैकी एकजण  ठार मारण्यासाठी माझा विश्वासघात करणार आहे आणि माझे रक्त सांडणार आहे,तरी मी त्याला खाऊ घातले आणि त्याला प्यायला दिले आणि त्याचे पाय धुतले. जे तुम्हाला इजा करतात त्यांच्याशी  कसे वागावे हे दाखवण्यासाठी मी हे केले. जर तुम्ही असे वागलात तर तुम्ही सुखी व्हाल. आणि त्यांच्या पैकी विश्वास घातकी कोण आहे हे सर्व शिष्य विचारायला लागले.पण येशूने त्याचे नाव सांगीतले नाही,यासाठी की  ते त्याच्या विरुद्ध जाऊ नयेत. तथापि जेव्हा अंधार वाढला,येशूने ज्युदासकडे निर्देश केला आणि त्याचवेळी त्याला दूर जायाला सांगीतले,आणि ज्युदास मेजावरून उठला आणि दूर गेला आणि कोणीही त्याला थांबवले नाही. नंतर येशू म्हणाला: मी मानवाच्या पुत्राला उंचावणे असे म्हणतो त्याचा हाच अर्थ आहे. माणसाच्या पुत्राला उंचावणे म्हणजे त्याच्यावर पित्यासारखी द्या करणे जे आपल्यावर प्रेम करतात त्यांच्यावरच नाही तर सर्व माणसांवर,जे आपल्याला इजा करतात त्यांच्यावर सुद्धा. म्हणून माझ्या शिकवणीवर वाद करू नका,सनातनी करतात तसे त्यातील तुकडे उचलू नका,तर मी करतो तसे करा आणि आता मी तुमच्या डोळ्यासमोर केले तसे करा.ही एक आज्ञा मी तुम्हाला देतो: माणसांवर प्रेम करा. माझी सर्व शिकवण ही आहे की माणसांवर नेहमी प्रेम करा आणि शेवट पर्यंत करा. त्यानंतर,येशूला भीती वाटली,आणि तो त्याच्या शिष्यांसह अंधारात असलेल्या बागेत आडरस्त्याला गेला. आणि रस्त्यात तो त्यांना म्हणाला: तुम्ही सर्व चंचल आणि भित्रे आहात;जर ते मला पकडण्यासाठी आले तर तुम्ही सर्व दूर पळून जाल. त्यावर पीटरने उत्तर दिले: नाही,मी तुम्हाला कधीच सोडणार नाही आणि मृत्यूपर्यंत सुद्धा तुमचे रक्षण करीन. आणि दुसरे शिष्यही सर्व तसेच म्हणाले.

तेव्हा येशू म्हणाला: जर तसे आहे,तर मग रक्षणाची तयारी करा,तुमचे स्वत:चे रक्षण करायला शस्त्र घ्या आणि अन्न पुरवठा जमा करा,कारण आम्हाला भूमिगत व्हायचे आहे. शिष्यांनी उत्तर दिले की त्यांच्याजवळ दोन सुरे आहेत. जेव्हा येशूने सु-यांचा उल्लेख ऐकला,तेव्हा त्याला अतिशय दुख झाले. आणि एकांत जागी जाऊन त्याने प्रार्थना करायला सुरुवात केली आणि शिष्यांनी तसेच करावे अशी तीव्र इच्छा व्यक्त केली,परंतु त्यांना त्याचे समजले  नाही. येशू म्हणाला: माझ्या पित्या-आत्म्या! माझ्यामधील हा मोहाबरोबरचा झगडा संपव. तुझी इछा पूर्ण करण्यासाठी मला दृढ कर. माझ्या शारीरिक जीवनाचे रक्षण करण्याच्या माझ्या स्वत:च्या इच्छेवर मात,आणि वाईटाचा विरोध न करण्याच्या-तुझ्या इच्छे प्रमाण मला केले पाहिजे. शिष्यांना तरीही समजले नाही. आणि तो त्यांना म्हणाला: शरीराचा विचार करू नका,तर तुमच्यामधील आत्म्याला उंचावा;आत्म्यामध्ये शक्ती आहे,पण शरीर दुर्बल आहे. आणि पुन्हा तो म्हणाला: माझ्या पित्या! जर दुख सहन करायचेच आहे,तर ते येऊ दे:  पण दुख सहन करण्यात मला एकच गोष्ट फक्त पाहिजे, ती म्हणजे माझ्या मध्ये माझी नव्हे,तर तुझी इच्छा पूर्ण व्हावी. शिष्यांना समजले नाही. आणि पुन्हा तो मोहाशी झगडला आणि शेवटी त्याच्यावर मात केली;आणि त्याच्या शिष्यांजवळ येत तो म्हणाला: आता हे ठरले आहे,तुम्ही विश्रांती घेऊ शकता. मी लढणार नाही,तर या जगातील लोकांच्या हवाली मला स्वत:ला करणार आहे.

११ आणि येशू,स्वत: मृत्यूसाठी तयार आहोत असे वाटल्यावर,स्वत:चा त्याग करण्यास निघाला,परंतु पीटरने त्याला थांबवले आणि तो कोठे जात आहे म्हणून विचारले. येशूने उत्तर दिले: मी जेथे जात आहे तेथे तू जाऊ शकत नाहीस. मी मृत्यूसाठी तयार झालो आहे,परंतु तू त्यासाठी अजून तयार नाहीस. पीटर म्हणाला: मी तुमच्या साठी आता माझा जीव द्यायला तयार आहे. येशूने उत्तर दिले: एखादा माणूस कोणतीही प्रतिज्ञा करू शकत नाही. आणि तो त्याच्या सर्व शिष्यांना म्हणाला: मला माहीत आहे की मृत्यू माझी वाट बघत आहे,परंतु मी पित्याच्या जीवानात विश्वास ठेवतो आणि त्यामुळे त्याची मला भीती वाटत नाही. माझ्या मृत्यूने विचलित होऊ नका,पण ख-या देवावर आणि जीवनाच्या पित्यावर विश्वास ठेवा,आणि मग माझा मृत्यू तुम्हाला भीतीदायक वाटणार नाही. जर मी जीवनाच्या पित्याशी एकरूप असेन,तर मग मला  जीवनापासून वंचित केले जाऊ शकणार नाही. हे खरे आहे की मृत्यू नंतर माझे जीवन कोठे आणि काय असेल ते

तुम्हाला मी सांगणार नाही,परंतु मी तुम्हाला ख-या जीवनाचा मार्ग दाखवतो. माझी शिकवण ते जीवन काय असेल ते तुम्हाला सांगणार नाही,पण ती त्या जीवनाची फक्त खरी वाट उघड करते,जी पित्याशी एकरूपते मध्ये आहे. पिता हा जीवनाचा उगम आहे. माझी शिकवण ही आहे की माणसाने पित्याच्या इच्छेत जगावे आणि सर्व लोकांच्या भल्यासाठी आणि जीवनासाठी त्याची इच्छा पूर्ण करावी. जेव्हा मी निघून जाईन तेव्हा तुमचे सत्याचे ज्ञान हाच तुमचा गुरु असेल. माझी शिकवण आचरणात आणतांना तुम्ही पित्यामध्ये आणि तुम्ही सत्यामध्ये आहात असे नेहमी वाटेल. जो पिता तुमच्यामध्ये आहे. आणि जीवनाचा पिता तुमच्या स्वत:मध्ये आहे हे कळल्यावर,तुमच्यापासून काहीही हिरावून घेऊ शकणार नाही अशा शांतीचा तुम्हाला अनुभव येईल. आणि म्हणून तुम्हाला जर सत्य माहीत असेल आणि त्याप्रमाणे जगत असाल,तर माझा मृत्यू किंवा तुमचा स्वत:चा मृत्यू तुम्हाला भीतीदायक वाटणार नाही.

माणसे त्यांना स्वत:ला वेगवेगळे मानव,प्रत्येक जण त्याची स्वत:ची जगण्याची वेगळी इच्छा असलेले समजतात,पण तो फक्त एक भ्रम आहे. फक्त खरे जीवन हे आहे की जे पित्याची इच्छा हा जीवनाचा उगम आहे हे जाणते. माझी शिकवण ही जीवनाची एकरूपता उघड करते,आणि जीवन वेगवेगळे वाढलेले नव्हे तर एकच झाड ज्याच्यावर सर्व फांद्या वाढतात असे जीवन सादर करते. जो पित्याच्या इच्छेप्रमाणे मुख्य झाडाच्या फांदी प्रमाणे जगतो तो फक्त जिवंत राहतो; जो स्वत:च्या इच्छे प्रमाणे जगण्याची इच्छा धरतो तो झाडापासून तुटलेल्या फांदी प्रमाणे मरून जाईल. पित्याने मला चांगले करण्यासाठी जीवन दिले आहे,आणि मी तुम्हाला चांगले करण्यासाठी जगायला शिकवले आहे. जर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल तर तुम्ही सुखी व्हाल,आणि माझ्या सर्व शिकवणीचे सार जी सांगते ती साधी आज्ञा म्हणजे सर्व माणसानी एकमेकांवर प्रेम करावे. आणि प्रेम म्हणजे शारीरिक जीवनाचा दुस-यासाठी त्याग करणे: दुसरी वेगळी व्याख्या नाही. आणि माझा प्रेमाचा कायदा पाळतांना तो तुम्ही काही न समजता मालकाच्या आज्ञा पाळणा-या गुलामा सारखा पाळणार नाही; तर तुम्ही माझ्या सारखी स्वतंत्र माणसे म्हणून जगाल,कारण जीवनाच्या पित्याच्या ज्ञानातून वहात येणारा जीवनाचा उद्देश मी तुम्हाला स्पष्ट केला आहे. अपघाताने निवडली म्हणून नाही,तर माझी शिकवण हेच फक्त सत्य आहे ज्याच्यामुळे माणसे मुक्त केली जातील म्हणून तुम्ही ती स्वीकारली.

जगाची शिकवण आहे की माणसांनी एकमेकांशी वाईट वागावे.पण माझी शिकवण आहे की त्यांनी एकमेकांवर प्रेम करावे. म्हणून जग जसा माझा केला तसा तुमचा द्वेष करील. जगाला माझी शिकवण समजत नाही आणि म्हणून तुमचा छळ होईल आणि देवाची सेवा करतो असे समजून तुम्हाला इजा केली जाईल. त्याचे आश्चर्य वाटून घेऊ नका,पण ते तसेच असणार आहे हे समजून घ्या. जग खरा देव न समजल्याने,तुमचा छळच  करील,परंतु तुम्ही सत्यच जाहीर केले पाहिजे. त्यानी मला ठार मारल्यावर तुम्ही दु:खी व्हाल,परंतु त्यांनी मला सत्य जाहीर केले म्हणून ठार मारलेले असेल,आणि माझा मृत्यू सत्याच्या बळकटी साठी आवश्यक आहे. जेथे मी सत्यापासून मागे हटणार नाही,तो माझा मृत्यू तुम्हाला बळ देईल,आणि तुम्हाला सत्य काय आणि असत्य काय आणि असत्याच्या आणि सत्याच्या ज्ञानाचा परिणाम समजेल. तुम्हाला हे समजेल की आत्म्याच्या जीवनात न ठेवता आणि शारीरिक जीवनात माणसांनी विश्वास ठेवणे हा खोटेपणा आहे,आणि ते सत्य पित्याशी एकरूप होण्याचा भाग आहे ज्याचा परिणाम म्हणून आत्म्याचा शरीरावर विजय होतो. जेव्हा मी शारीरिक जीवनात  तुमच्यासह यापुढे नसेन तेव्हा,माझा आत्मा तुमच्यासह असेल;परंतु सर्व माणसांसारखे तुमच्यामध्ये आत्म्याचे बळ तुम्हाला नेहमीच जाणवणार नाही.काहीवेळा तुम्ही अशक्त व्हाल आणि आत्म्याचे बळ घालवून बसाल आणि मोहात पडाल,आणि काहीवेळा तुम्ही ख-या जीवनासाठी जागृत व्हाल. अनेक तासांची शरीराची गुलामगिरी तुमच्यावर येईल,परंतु काही काळापुरता;ज्याप्रमाणे बाळाच्या जन्माच्यावेळी एखादी स्त्री दुख सहन करते आणि एका माणसाला या जगात आणल्याचा तिला आनंद होतो त्याच प्रमाणे तुम्ही दुख सहन कराल आणि पुन्हा आत्म्यामध्ये पुनर्स्थापित व्हाल. हाच अनुभव तुम्हाला येईल जेव्हा शरीराने गुलाम बनवले असता तुम्ही आत्म्याने पुन्हा उठाल,आणि अशा आनंदाचा अनुभव घ्याल की तुम्हाला त्याच्यापेक्षा जास्त कशाचीही इच्छा होणार नाही. हे अगोदरच जाणून घ्या: छळ,आतला संघर्ष,आणि आत्म्याचे नैराश्य असूनही,आत्मा तुमच्यामध्ये जिवंत असतो आणि एक खरा देव म्हणजे मी उघड केलेले पित्याच्या इच्छेचे ज्ञान होय. आणि पिता,आत्मा याला संबोधून येशू म्हणाला: तू मला आज्ञा दिली होती ते मी केलेले आहे,आणि लोकांना उघड केले आहे की तू सर्व गोष्टींचा उगम आहेस,आणि त्यांना माझे समजले आहे. मी त्यांना शिकवले आहे की ते सर्व एका अनंत जीवनाच्या उगमांतून आलेले आहेत आणि म्हणून ते सर्व

एक आहेत,आणि जसा पिता माझ्यामध्ये आणि मी पित्यामध्ये आहे,तसेच ते सुद्धा माझ्याशी आणि पित्याशी एक आहेत. मी त्यांना हेही उघड केले आहे की तू जसे प्रेमाने त्यांना या जगात पाठवले आहेस,तशी त्यांनी सुद्धा या जगाची प्रेमाने सेवा करावी.

१२ जेव्हा येशूने त्याच्या शिष्यांशी बोलणे संपवले,तेव्हा तो उठला आणि,पळून जाणे किंवा स्वत:चा बचाव करण्या ऐवजी,ज्युदासाला भेटायला गेला जो त्याला पकडण्यासाठी सैनिकांना घेऊन येत होता. येशू त्याच्या जवळ गेला आणि तो का आलेला आहे म्हणून विचारले. परंतु ज्युदासाने उत्तर दिले नाही आणि सैनिकांचा एक जमाव त्याचा भोवती जमला. पीटर त्याचे रक्षण करायला धावला आणि,एक सुरा काढून,लढू लागला.पण येशूने त्याला थांबवले आणि जो सु-याने लढतो तो सु-यानेच नाश पावतो असे म्हणत त्याला सुरा टाकून द्यायला सांगितले.मग तो जे त्याला पकडण्यासाठी आले होते त्यांना म्हणाला: मी आता पर्यंत तुमच्यामध्ये एकटा निर्भयपणे वावरलो आहे,आणि आता मला भीती वाटत नाही,तुम्हाला जे बरे वाटेल ते करण्या साठी मी मला स्वत:ला तुमच्या हवाली करीत आहे. आणि त्याचे सर्व शिष्य पळून आणि त्याला सोडून गेले.नंतर सैनिकांच्या अधिका-याने येशूला बांधण्याचा आणि पूर्वीचा उच्च धर्मगुरू असलेल्या अनास कडे नेण्याचा हुकूम सोडला,जो त्यावर्षी उच्च धर्मगुरू होता आणि ज्याने येशूला ठार मारण्यासाठी खोटी सबब रचली होती त्या कैफासाच्याच घरात अनास रहात होता: ती सबब अशी की,जर त्याला ठार मारले नाही तर संपूर्ण राष्ट्र नाश पावेल. येशू,स्वत: पित्याच्या इच्छेत असल्याचे जाणवून,मृत्यूसाठी तयार होता आणि त्यानी त्याला पकडले तेव्हा त्याने विरोध केला नाही,आणि ते त्याला दूर नेत असताना भ्याला नाही;परंतु जो तोच पीटर ज्याने आताच येशूला खात्री दिली होती की तो त्याला नाकारण्या ऐवजी मरेल,तोच पीटर ज्याने येशूचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला होता,आता जेव्हा त्याने पाहिले की येशूला शिक्षा करण्यासाठी नेत आहेत तेव्हा आपल्यालाही शिक्षा करायला नेतील म्हणून घाबरला, आणि तो येशू बरोबर नव्हता का असे द्वारपालाने जेव्हा विचारले, तेव्हा त्याला नाकारले आणि त्याला सोडून गेला. फक्त नंतर जेव्हा कोंबडा आरवला, तेव्हा येशूने त्याला सांगितलेले सर्व त्याला समजले. त्याला समजले की शरीराचे दोन मोह आहेत- भीती आणि स्वार्थ-आणि जेव्हा बागेत प्रार्थना केली आणि शिष्यांना प्रार्थना करायला सांगितली तेव्हा त्यांना येशूने विरोध केला होता. आणि आता तो,पीटर,येशूने ज्या विरुद्ध त्याला धोक्याचा इशारा दिला होता त्या दोन मोहाला बळी पडला: त्याने वाईटाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला आणि सत्याचे रक्षण करण्यासाठी लढायला आणि तो स्वत: वाईट करायला तयार झाला होता;आणि आता शारीरिक दुख सहनाच्या भीतीने त्याच्या प्रभूला त्याने नाकारले होते. जेव्हा शिष्यांनी त्याच्या रक्षणासाठी दोन सुरे तयार ठेवले होते तेव्हा प्रथम जेरुसालेमात लोकांपुढे जेव्हा परधर्मीय त्याच्याशी बोलू इच्छित होते,आणि आता सैनिकांपुढे जेव्हा त्यांनी त्याला बांधले आणि फिर्याद चालवण्यासाठी नेले तेव्हा येशू लढण्याच्या मोहाला किंवा भीतीच्या मोहाला बळी पडला नाही. येशूला कायफास समोर आणण्यात आले, ज्याने त्याला त्याच्या शिकवणी विषयी प्रश्न विचारायला सुरुवात केली. परंतु कायफासाला येशूच्या शिकवणी विषयी काही शोध घ्यायचा नसून त्याला गुन्हेगार ठरवायचे आहे हे जाणून,येशूने त्याला उत्तर दिले नाही,पण म्हणाला: मी काही लपवलेले नाही आणि आता काहीही लपवणार नाही: जर तुला माझी शिकवण काय आहे ही जाणून घ्यायची इच्छा असेल, तर ज्यांनी ती ऐकलेली आहे आणि समजून घेतली आहे त्यांना विचार. या उत्तरावर उच्च धर्मगुरुच्या सेवकाने त्याच्या थोबाडात मारली. येशूने त्याला विचारले त्याने त्याला का मारले,पण त्या माणसाने त्याला उत्तर दिले नाही आणि त्या उच्च धर्मगुरुने सुनावणी चालू ठेवली. येशू ज्यूंची श्रद्धा नष्ट करण्याची बढाई मारीत होता असे पुरावे देणारे साक्षीदार आणण्यात आले. आणि उच्च धर्मगुरुने येशूला प्रश्न विचारले,पण ते काही शिकण्यासाठी विचारीत नाहीत, पण फक्त हे दाखवण्यासाठी की ती न्याय सुनावणी आहे हे पाहून,त्याने काहीच उत्तर दिले नाही. मग त्या उच्च धर्मगुरुने त्याला विचारले: मला सांग,तू देवाचा पुत्र,ख्रिस्त आहेस का?येशू म्हणाला: होय मी ख्रिस्त आहे,एक देवाचा पुत्र;आणि माझा छळ करतांना आता तुम्ही पाहाल मानवाचा पुत्र कसा देवासारखा आहे. उच्च धर्मगुरुला हे शब्द ऐकताना आनंद झाला आणि तो दुस-या न्यायमूर्तींना म्हणाला: त्याला दोषी ठरवण्यास हे शब्द पुरेसे नाहीत काय?आणि ते न्यायमूर्ती म्हणाले: ते पुरेसे आहेत: आम्ही त्याला मृत्युदंड देत आहोत. आणि जेव्हा ते असे म्हणाले तेव्हा,लोक येशूवर तुटून पडले आणि त्याला मारायला,त्याच्या तोंडावर थुंकायला,आणि त्याचा अपमान करायला त्यांनी सुरुवात केली. तो शांत राहिला.

त्यावेळी कोणालाही ठार मारण्याचा ज्यूंना अधिकार नव्हता: त्यासाठी त्यांना रोमन राजपालाकडून परवानगी घेण्याची गरज होती. म्हणून येशूला त्यांच्या न्यायालयात दोषी ठरवून आणि त्याची बदनामी करून,त्यांनी त्याला रोमन राजपाल पिलाताकडे अशासाठी नेले की त्याने त्याला मृत्युदंडाची शिक्षा करण्याची आज्ञा द्यावी.पिलाताने विचारले की ते येशूला का ठार मारू इच्छितात,आणि त्यांनी उत्तर दिले की तो एक गुन्हेगार आहे.पिलात म्हणाला जर असे असेल तर,त्यांनी त्यांच्या स्वत:च्या कायद्या प्रमाणे त्याचा न्याय करावा. ते म्हणाले: आम्हाला असे पाहिजे की तुम्ही त्याला मृत्युची शिक्षा द्यावी,कारण तो रोमन सीझर पुढे दोषी आहे: तो देशद्रोही आहे,तो लोकांना भडकावतो,त्यांना सिझरचे कर द्यायला मना करतो,आणि स्वत:ला ज्यूंचा राजा संबोधतो.पिलाताने येशूला त्याच्या समोर बोलावले,आणि म्हणाला: याचा अर्थ काय-तू ज्यूंचा राजा आहेस काय? येशू म्हणाला: तुम्हाला माझे राज्य काय आहे ते खरोखर जाणून घ्यायची इच्छा आहे, की तुम्ही फक्त उपचार म्हणून विचारता? पिलाताने उत्तर दिले: मी ज्यू नाही,आणि तू स्वत:ला ज्यूंचा राजा म्हणवतोस की नाही ह्या मुळे मला काही फरक पडत नाही,परंतु मी तुला विचारतो तू कोण आहेस आणि ते तुला राजा का म्हणतात?येशूने उत्तर दिले: ते खरे सांगतात की मी स्वत:ला राजा संबोधतो.मी खरोखरच एक राजा आहे,पण माझे राज्य पृथ्वीवरचे नाही,ते स्वर्गीय आहे. पृथ्वीवरच्या राज्यांकडे सैन्य असते आणि ते युध्दावर जातात आणि लढतात,परंतु तुम्ही पाहता आहात त्यांनी मला बांधले आहे आणि मारले आहे आणि मी विरोध केला नाही. मी एक स्वर्गीय राजा आहे आणि माझे सामर्थ्य आत्म्यात आहे.

पिलात म्हणाला: म्हणजे हे खरे आहे की तू स्वत:ला राजा समजतोस? येशूने उत्तर दिले: तुम्हाला स्वत:ला ते माहीत आहे. प्रत्येकजण जो आत्म्याने जगतो तो स्वतंत्र असतो. मी त्यानेच फक्त जगतो,आणि जर आत्म्याने जगले तर ते स्वतंत्र आहेत फक्त हे सत्य दाखवण्यासाठी मी लोकांना शिकवतो. पिलात म्हणाला: तू सत्य शिकवतोस,पण सत्य काय आहे ते कोणालाही माहीत नाही. प्रत्येकाचे त्याचे स्वत:चे सत्य असते. आणि हे म्हटल्या नंतर तो येशुपासून दूर वळला आणि पुन्हा परत ज्युंकडे गेला,आणि म्हणाला: मला या माणसात काहीही गुन्हेगारी सापडली नाही. मी त्याला मृत्युदंड द्यावा अशी तुमची इच्छा का आहे?प्रमुख धर्मगुरू म्हणाले: त्याला शिक्षा झाली पाहिजे कारण तो लोकांत अशांतता निर्माण करतो. मग पिलाताने प्रमुख धर्मगुरू समोर त्याची चौकशी सुरु केली,पण हे सर्व उपचारा साठी आहे हे पाहून,येशूने काहीही उत्तर दिले नाही. मग पिलात म्हणाला: मी एकटा त्याला दोषी ठरवू शकत नाही. त्याला हेरोदाकडे न्या.

हेरोदासमोरच्या सुनावणीत,येशूने पुन्हा प्रमुख धर्मगुरुंच्या आरोपांना उत्तर दिले नाही,आणि हेरोदाने येशू एक निरर्थक माणूस ठरवून उपहासाने त्याला लाल झगा घालायचा हुकूम सोडला आणि परत पिलाताकडे पाठवले.पिलाताला येशूची द्या आली आणि त्याला फक्त सणानिमित्त क्षमा करण्यासाठी तो मुख्य धर्मगुरूंचे मन वळवू लागला.पण ते त्यांच्या मागणीवर ठाम राहिले,आणि ते सर्व,आणि त्यांच्या बरोबर असलेले लोक,येशूला ख्रुसावर खिळण्यासाठी ओरडले.पिलाताने पुन्हा येशूला सोडून देण्यासाठी त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला,पण धर्मगुरू आणि लोक ओरडले की त्याला शिक्षा झालीच पाहिजे. ते म्हणाले: तो स्वत:ला देवाचा पुत्र म्हणवण्याचा अपराधी आहे.पिलाताने येशूला पुन्हा त्याच्याकडे बोलावले,आणि विचारले: तू स्वत:ला देवाचा पुत्र म्हणवतोस त्याचा अर्थ काय?तू कोण आहेस?येशूने काहीच उत्तर दिले नाही. तेव्हा पिलात म्हणाला: तुला शिक्षा करण्याचा किंवा सोडून देण्याचा अधिकार मला असताना तू मला उत्तर देत नाहीस हे कसे काय?येशूने उत्तर दिले: तुम्हाला माझ्यावर कोणताच अधिकार नाही. सर्व अधिकार वरून आहे. आणि पिलाताने तिस-यांदा येशूला मोकळे सोडण्यासाठी ज्यूंचे मन वळविण्याचा प्रयत्न केला,पण ते त्याला म्हणाले: जर ज्याला आम्ही सीझर विरुद्ध बंडखोर म्हणून दोषी ठरवले आहे,या माणसाला तुम्ही शिक्षा केली नाही तर तुम्ही सिझरचे मित्र नसून शत्रू आहात. आणि हे शब्द ऐकल्यावर पिलाताने माघार घेतली आणि येशूला शिक्षा करण्याची आज्ञा दिली. परंतु त्यांनी प्रथम त्याचे कपडे फाडले आणि त्याला झोडपले,आणि नंतर पुन्हा त्याला लाल झगा घातला.आणि त्यांनी त्याला मारले आणि त्याचा अपमान केला आणि त्याचा उपहास केला. नंतर त्यांनी त्याला त्याच्या शिक्षेच्या जागे पर्यंत एक क्रूस वाहून नेण्यासाठी दिला,आणि तेथे त्यांनी त्याला ख्रुसावर खिळले,आणि तो ख्रुसावर टांगलेला असतांना त्यांनी त्याचा उपहास केला. आणि या उपहासाला येशूने उत्तर दिले: पित्या,त्यांना यासाठी शिक्षा करू नकोस,ते काय करतात हे त्यांना समजत नाही. आणि नंतर,जेव्हा तो अगोदरच मृत्युच्या जवळ होता,तो म्हणाला: माझ्या पित्या! माझा आत्मा मी तुझ्या जबाबदारीवर सोपवतो. आणि त्याने आपले शीर झुकवून शेवटचा श्वास सोडला.

# रिटायर्डमेंट २०२५

**--- सायमन रॉड्रिग्ज, आगाशी**

सुनील माव शाळीपासुनसो खूप जवळ सो मित्र…चांगलो ब्यांकेत कामाला हाय… आन त्यायी बायकू सुनिता झेड पी शाळीत टीचर हाय. सुनील शी भोटी पोरी पिंकी आय. टी. इंजिनियरिंग शा शेवट शा वहरा हाय… आन लानो वारू पप्पू आय. टी. इंजिनियरिंग शा फर्स्ट ईयर ला. सुनील ने नवीन दुमजली बंगलो बांदिले… आय २० कार घेटले… दर वहरा फ्यामिली कडेन कडे फिरयादो जात्यात. शार पैशे बाळगोन हात. एकंदरीत सुखी चौकोनी कुटुंब.

कॉलेज क्याम्पस मीने इन्फोसिस कंपनी मीने पिंकी आ सिलेक्शन जाला आन ई बातमी हांगताना पिंकी घारा बोयली, "मॉम, ड्याड, माला इन्फोसिस जॉयीन करयासा नाय… माला U S मीने जावोन M S करयासा हाय. म्ये त्या गेट एग्झाम शी तयारी सुरु केले."

खरा मनजे सुनिता मत होता कि पिंकी ने B SC, B. Ed. करोन टीचर व्हावा… पन पिंकी ला इंगीनीयर होयासा होता.आन मग तीआ इच्छेप्रमाणे तिला इंगीनियरिंग ला घायला. आते बेसकाशी इन्फोसिस शी नोकरी होडोन २५ लाख खर्च करोन पिंकी ला U S मीने M S करया जादो सुनील आन सुनिताव विरोध होतो. कारण एकुस…. "एकदा U S मीने M S करया गेलेले पोरे तडशी लायीफ स्टायील बगोन आपल्या अडे परत येत नात. आन एकदा ई गेली गा मांगोमाग पप्पू पन जायदे … मंग आमे अडे कुनादरी रयाशे?"

सुनील आन सुनिता समोर शी केस प्रातिनिधिक हाय. आपुन आपल्या पोरांना चांगला शिक्षण देत्याव सेटल करत्याव पण बदल्यात आपुन त्या दरणे भविष्यामिने त्यायी आपल्याला बगीला पाय अही आशा धरत्याव. आज आपुन जिगाळा पोरे आपल्या आयबाबा ला बगीत नाय तिगाळा सहज टीका करत्याव. आपल्याला आपल्या म्हातारपनी आपला का? ई चिंता लागलेली अहाते. आन त्यामुळे आपुन नकळतपणे कायिक गोष्टी पोरोर लादित्याव…

मुळात पोरे बायार जावोन सेटल होवो गा अडे रेवो… त्या स्वतः आहा एक अस्तित्व हाय आन त्या स्वतः आहा एक जीवन हाय. त्यांना आवशक तोडा शिक्षण दिला स्वतः पायोर ऊबी रया हिकविला गा… त्या त्यांना त्या पद्धतीने जगोन दे ना… पुडे जा कय कर्यासा हाय…ता त्यांना स्वतः हिमतीवर करुंदे …आपुन कहे आपल्या स्वतः हिमतीवर आन मेहनतीवर ओडे भोटे जाले आन यशस्वी जाले…. आपल्याला कडे कुने आयता करोन ठोईलता? आपल्या ला आपल्या बयबाबाने चांगला शिक्षण दिला आन चांगले संस्कार दिले मनून आपुन ओडे पुडे येवू शकले…. अर्थात आपल्या बयबाबाने त्या दरी होता नोता ता आपल्या करतान दिला आन आते त्यांदरी कय रेला नाय, त्यामुळे आपला कर्तव्य बनाते कि आपल्याला त्यांना बगीला पाय. आन ई पन तोडास खरा हाय कि आपुन आपली रिटायरमेंट शी तजवीज आतेपासुनुस करोन ठोयली पाय. …पोरीला / पोराला … M. S. कर्यासा हाय… २५ लाख पात… बँक लोन देते… त्यांना लोन काडोन द्या… त्यांना जबाबदारी जाणीव होऊंदे… पोरे एकदा बायार गेले गा सहसा परात याशे नात ई गृहीतूस धरा…

२०२५ शा रिटायरमेंट शी तयारी केली …. पोरांना चांगला शिक्षण द्या . त्यांना त्यांशा पायोर उबी रयाडो मदत करा. जहे आपुन स्वकर्तुत्वाने आपल्या पायोर उबी रेले, ताहा त्यांना पण उबी रयाडो द्या. त्यांसा लगीन त्यांनास करो द्या (अडे लग्नाव खर्च अभिप्रेत हाय) … आन विशेष मनजे त्यांसा लायीफ त्यांना त्यांशा मर्जी प्रमाणे जगो द्या…. आन आपुन… आपुन डोकरे वेगळेस रयाशे एकमेकांना हाम्बाळोन… पोरायी बोलविला ग गेले, नातवंडे खेळविले, परत आले…. तर आत्तेपासुनुस रिटायरमेंट शी तयारी करा …मनायी आन पैशायी पन….

# ऑनलाईन "विकास " कधी ?

**चिन्मय गवाणकर,**

**सचिव-जागरूक नागरिक संस्था आणि न्यू इंग्लिश स्कूल माजी विद्यार्थी महासंघ**

हल्ली "विकास" हा शब्द प्रत्येक राजकारणी माणसाकडून सारखा वापरला जातो. पण विकासाची व्याख्या नक्की कोणीच काही करीत नाही. पण फक्त मेट्रो रेल्वे/चकाचक विमानतळ उद्घाटन केले/फ्री वे बांधले म्हणजे राज्याचा विकास झाला का ? विकास म्हणजे बेसुमार बिल्डींग बांधून सिमेंटचे जंगल बनविणे की माणसांना जगायला आवश्यक पाणी आणि विजेचा तुटवडा असताना फ्री वायफायचे ढोल बडवणे म्हणजे विकास ? कुठेतरी आता आपल्याला प्राधान्यक्रम ठरवायला लागेल. लोकशाही मध्ये सर्वसामान्य नागरिक राजा असतो आणि सरकार त्याचे सेवक असते हा दृष्टीकोन जेव्हा रुजेल तेव्हा खऱ्या अर्थाने विकास विकास म्हणतात तो झाला एकदाचा असे म्हणावे लागेल. आपण महाराष्ट्राचे उदाहरण घेऊ.

सरकार बदलले पण बाबूशाही गेली का ? सामान्य माणसाला आज सरकारी कार्यालयात मिळणारी वाईट वागणूक आणि पदोपदी असणारा भ्रष्टाचार याचे काय? अजूनही सातबारा उतारा घ्यायला शेतकऱ्याला तलाठ्याला पाचशेची पत्ती द्यावी लागते आणि आपल्या हक्काची शिष्यवृत्ती मिळवायला गरीब विद्यार्थ्याला तहसीलदार कार्यालयामध्ये टक्केवारी द्यावी लागते. मग यांचे "अच्छे दिन " कधी येणार?

महाराष्ट्रामधील सरकारी कारभार सुमार असण्याचे मुख्य कारण म्हणजे पारदर्शकतेचा अभाव आणि तो दूर करण्यासाठी सरकारने गेल्या १० वर्षामध्ये कधीही न केलेले प्रयत्न! एकही पक्ष भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी खरोखर ई-गव्हर्नन्स राबवू इच्छित नाही. जात, धर्म, वर्ग, भाषा असली घाणेरडी राजकारणे करणाऱ्या राजकीय पक्षांना सामान्य माणसाचे काही देणे घेणे नाही हेच यावरून सिद्ध होते. शेवटी सामान्य नागरिकाचे आपल्या सरकारविषयी काय मत आहे हे महत्वाचे. नुसती आकडेवारी फेकून आम्हीच कसे गुजरातपेक्षा पुढे सांगून मते मिळणार नाहीत.

माहिती तंत्रद्यान क्षेत्रामध्ये असल्यामुळे मी त्याकाळी (२००५ ते २००८) नोकरी करीत असलेल्या या क्षेत्रातील एका आघाडीच्या कंपनीचा प्रतिनिधी म्हणून मंत्रालयाचा कारभार जवळून पाहिलेला आहे. इतर राज्ये ई -गव्हर्नन्सच्या वाटेवर खूप पुढे पोहोचली असताना आपण मात्र अजून तिकडेच अडकलो आहोत. गुजरातसारख्या राज्यात २००७पासून नवी कागदी फाईल बनली नाहीये, जो कागद आवक विभागात येतो तो तिकडेच स्कॅन करून त्याची एक डिजिटल फाईल बनवली जाते आणि नोटिंग /मान्यता वगैरे ऑनलाईन होतात. एव्हढे तरी क्रेडीट मोदींना दिले पाहिजे. आपण मात्र २०१२मध्ये सुद्धा मंत्रालयाला आग लागली म्हणून फायली जळाल्या म्हणून शिमगा करतो. आपल्या मंत्रालयात फक्त DJMS (Document Journey Management System) द्वारे एखादी फाईल कुठे आहे एव्हढेच समजते . ‘‘काम’’ मात्र कागदी फाईल वरच चालते !

आपण आपल्या सेतू सारख्या "नागरिक सुविधा केंद्रांचा" जो फुकटचा गवगवा केलाय तो अगदी फोल आहे. कारण ही केंद्रे फक्त अर्ज आणि कागदपत्रे स्वीकार करतात पण शेवटी प्रमाणपत्र/ दाखले वगैरे तहसीलदार/जिल्हाधिकारी कार्यालयातले बाबू लोकच देतात आणि त्यांच्या सही शिक्क्याची योग्य "किंमत" दिल्याशिवाय जनतेला हे दाखले कधीच मिळत नाहीत मग कसला आलाय ई -गव्हर्नन्स? मी मंत्रालयात ई -गव्हर्नन्स प्रकल्प आखणी वर काम करत असताना (२००७) हा मुद्दा एका वरिष्ठ पातळीवरच्या चर्चेला आला होता . तेव्हा मी असे सुचवले होते कि जर सरकारला खरोखर

ऑनलाईन कारभार करायचा असेल आणि जनतेला सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचारापासून मुक्त करायचे असेल तर सेतू द्वारा घेतलेले दाखले विशिष्ठ मुदतीत ऑनलाईन PDF करून द्यावेत, जे प्रिंट करून वापरता येतील म्हणजे अधिकाऱ्याना "भेटा" हे प्रकरण बंद होईल. त्याही वेळी बार कोडींगसारख्या सुविधा उपलब्ध होत्या ज्याद्वारे असे दाखले सही शिक्या शिवाय कायदेशीर बाबींसाठी वापरता येतील आणि ज्याला या दाखल्यांची सत्यता पडताळून पहायची असेल तो सरकारकडे ऑनलाईन "सर्च" करून सत्यता पडताळून पाहू शकेल. (जसे आज विमानाचे तिकीट/ऑन लाईन रेल्वे तिकीट हे एक नुसता प्रिंट असते आणि तुमच्या PNR अथवा बार कोडचा रेकॉर्ड मूळ विमान कंपनी अथवा रेल्वेकडे असतो). पण सर्व वरिष्ठ IAS बाबू लोकांनी आणि मंत्री महोदयांनी त्यास कडाडून विरोध केला. सही शिक्क्याची गरज नसेल तर आमच्या कार्यालयात येणार कोण आणि आमची "सोय" करणार कोण ? असा "उदात्त" विचार त्यामागे असावा ! त्यामुळे अजूनही महाराष्ट्रातील जनतेला  बाबू  लोकांचे पाय धरण्यास लागतात .

सातबाराची माहिती दाखवणारी वेबसाईट तर आहे महाराष्ट्रामध्ये पण वेबसाईट वर "सदर  वेबसाईट वरील माहिती कायदेशीर बाबीमध्ये वापरता येऊ शकणार नाही  "असा एक अडाणी शेरा सुद्धा आहे ! म्हणजे परत "कायदेशीर" सातबाराची प्रत घेण्यासाठी तलाठ्याचे खिसे भरा ! रेशनकार्ड संगणकिकृत करण्याचे टेंडर २००७ डिसेम्बरमध्ये निघाले होते. अजूनही जुनी  रेशनकार्ड आहेत तशीच आहेत आणि रोज नवीन बोगस कार्डे बनतच  आहेत ! वीज कनेक्शन/मीटर नावावर करणे वगैरे कामासाठी लागणारे अर्ज वीज कार्यालयात नाहीत तर बाजूच्या झेरोक्सवाल्याकडे १० पट पैसे देऊन मिळतात (१ रुपयाचा फॉर्म १० रुपये वर त्याच झेरोक्सवाल्याकडून टायपिंग वगैरे करून घेण्याची सक्ती ! ) दस्तऐवज नोंदणी करण्यासाठी रजिस्ट्रार ऑफिसमध्ये जाताना आपली वेळ राखून ठेवण्याची टोकन सुद्धा एजंट लोक देणार ! राज्यात मुद्रांक शुल्क ओन्लाईन भरायचा खूप गाजावाजा या सरकारने केला ,पण जास्तीत जास्त जनतेला नियमित व्यवहार/प्रतिज्ञा पत्रे वगैरे साठी लागणारे १००/५० रुपये वगैरे stamp पेपर यात मिळत नाहीत. किमान ५००० रुपये मुद्रांक शुल्क असेल तरच ही प्रणाली वापरता येते ! हिमाचल प्रदेश,कर्नाटक आदी राज्यामध्ये मात्र स्टोक होल्डिंग कोर्पोरेशनच्या संकेत स्थळाद्वारा कमी किमतीचे मुद्रांक सुद्धा उपलब्ध होतात. RTO कार्यालयाबद्दल तर बोलायलाच नको ! ही कार्यालये राज्याचा परिवहन विभाग चालवतो कि दलाल यावर एक संशोधन झाले पाहिजे. मध्ये महेश झगडे परिवहन आयुक्त असताना त्यांनी दलाल लोकांना बंद करण्याची धमक दाखवली होती पण त्यांची सरकार ने लगेच बदली केली .

राज्यातील सर्व प्रवेश तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण आणि संगणकीकरण करण्याचे टेंडरसुद्धा २००७ मध्येच निघाले होते. काही नाक्यांचा अपवाद वगळता अजून तो प्रकल्प रडत खडत चालू आहे. कुठलाही प्रकल्प राबवताना खुली निविदा प्रक्रिया राबविण्याचे बंधन असताना राज्यातील नगरपालिका आणि महापालिकांनी एका विशिष्ठ वादग्रस्त कंपनीचेच सोफ्टवेअर घ्यावे म्हणून या राज्यात चक्क एक GR निघाला आहे !अश्याही करामती या सरकारने करून दाखवल्या आहेत !

हे सगळे ई गव्हर्नन्स चे प्रकल्प का रखडले याचे एकदा जनतेला उत्तर मुख्यमंत्र्यांनी द्यावे किव्वा एक श्वेतपत्रिका काढावी. बरेच घोटाळे त्यातून बाहेर येतील ! असा अपारदर्शक कारभार असलेल्या सरकारकडून  आदर्श /चिक्की सारखे घोटाळे होतच राहणार हे नक्की ! विरोधी पक्षांनी सुद्धा खोट्या अस्मिता/जातीयवादी विचार/आरोप प्रत्यारोप सोडून राज्याचे ई-गव्हर्नन्स धोरण काय असेल हे जरा जनतेला सांगावे .

ज्या दिवशी गोर गरीब जनतेला एक पैसा न देता आपल्या हक्काच्या सरकारी सेवा मिळतील तो दिवस खरा !

# तो देवाच्या उजवीकडे बसला आहे !

=> **सॅबी परेरा, नानभाट**

येशू ख्रिस्त पुनरुत्थित झाल्यानंतर स्वर्गात गेला आणि देवपित्याच्या उजवीकडे बसला आहे अशी आपली श्रध्दा आहे. ही श्रध्दा आपण वेळोवेळी प्रार्थनेद्वारे जाहीरही करीत असतो. देव आणि स्वर्ग आहे की नाही हा वादाचा विषय असला तरी प्रस्तुत लेखापुरते आपण धरून चालू की या दोनही गोष्टी अस्तित्वात आहेत. मी कुणी बायबलचा तज्ज्ञ किंवा अभ्यासक नाही तर केवळ माझी विवेकवादी बुध्दी आणि त्यावर लिओ टॉलस्टॉयच्या Gospel in brief या पुस्तकाचा असलेला प्रभाव ह्याच्या आधारे "तो देवाच्या उजवीकडे बसला आहे" या बायबल वचनाबाबत माझ्या मनात उठलेल्या विचार-तरंगाचं जाहिर चिंतन करू इच्छितो.

एक गोष्ट आपणां सगळ्यांनाच माहिती आणि मान्य आहे की देवाला कुणीच पाहिलं नाही. तरीही देवाचं रुप, रंग, पेहराव हे सारं काही माणसाने आपल्या कल्पनेप्रमाणे तयार केलेलं आहे. देवाचं हे रूप रेखाटताना माणसाच्या नजरेसमोर त्याने पाहिलेला राजा किंवा सम्राट होता. म्हणूनच सगळ्या तसबिरी आणि मुर्तीमधे आपण देवाला एखाद्या राजासारखं रुप, रंग, पेहराव दिला. त्याला बसण्यासाठी सिंहासन दिलं, डोक्यावर सोन्याचा मुकुट दिला आणि एवढं करून आपलं समाधान झालं नाही म्हणून आपण देवाला राजासारखे राग-लोभ, मान-मरातब, समज-गैरसमज चिकटवले. राजाच्या उजव्या हाताशी बसण्याचा मान ज्याप्रमाणे राजानंतर दुस-या क्रमांकाच्या महत्वाच्या व्यक्तीला (सरसेनापती किंवा प्रधान) मिळतो तद्वतच येशू ख्रिस्त ही देवबापानंतर दुस-या क्रमांकाची महत्वाची व्यक्ती (हे देखील आपल्या आपणच परस्पर ठरवलेलं) असल्याने त्यालाही आपण देवाच्या उजवीकडे बसवून मोकळे झालो.

येशू ख्रिस्ताप्रमाणेच आपण सारेजणदेखील जर एकाच प्रेमळ देवबापाची लेकरे असू तर तो देवबापा आपल्या लेकरांमधे उजवं-डावं का करील बरे? मुळात उजवी बाजू श्रेष्ठ आणि डावी बाजू कनिष्ठ हे कोणी ठरवलं ? तेव्हा येशू ख्रिस्ताला देवाच्या उजव्या हाताला देवाने नव्हे तर आपण माणसांनीच बसवलेलं असण्याची शक्यताच जास्त आहे.

'तो देवाच्या उजवीकडे बसला आहे' ह्या वाक्यातील मुळात 'तो' म्हणजे कोण ? येशू ख्रिस्त का? मला नाही वाटत ! 'माझा शेजारी कोण?' ह्या प्रश्नाला येशूने दिलेल्या उत्तराला धरून असे म्हणता येईल की की जो माझ्या स्वर्गातील पित्याच्या आज्ञेप्रमाणे वागतो 'तो' देवाच्या उजवीकडे बसला आहे. हा 'तो' म्हणजे येशू ख्रिस्तच असायला हवा असे नाही, तो तुमच्या-आमच्यापैकी सदाचरण करणारा कुणीही असू शकतो.

ओशोंना कुणीतरी विचारले तुम्ही स्वत:ला भगवान कसे काय समजता? ओशोंनी त्यांना म्हटले की केवळ मीच नव्हे तर तुम्हीदेखील भगवान आहात, तुम्हीदेखील देव आहात. आपल्या प्रत्येकामधे देव आहे. मी स्वत:तला देव ओळखला आहे म्हणून मी स्वत:ला भगवान म्हणतो.जेव्हा तुम्ही स्वत:तल्या देवाला ओळखाल तेव्हा तुम्ही ख-या अर्थाने देव व्हाल, ख-या अर्थाने भक्त व्हाल. जोवर मी वेगळा आणि देव वेगळा अशी तुमची धारणा आहे तोवर तुम्ही देवाचे भक्त नव्हे तर देवापासून विभक्त आहात !

मला असं वाटते की बायबलमधील 'मी' किंवा 'तो' संबंधात जी काही वचने आहेत ती येशूपेक्षा आपल्याला उद्देशून असावीत. बायबलमधे वर्णन केलेला 'तो' किंवा 'मी' हा दुसरातिसरा कुणी नसून (सद्सदविवेक जागृत झालेले) आपण

स्वत:च आहोत ही जाणिव (self realization) जेव्हा आपल्याला होईल तेव्हा, बायबलमधील "मी जगाचा प्रकाश आहे, जो मला अनुसरतो तो अंधारात चालणारच नाही" किंवा "मार्ग, सत्य व जीवन मीच आहे" किंवा "मी जीवनाची भाकर आहे" ह्या वचनांचा खरा मतितार्थ आपल्याला कळू शकेल.

आपला सद्सद्-विवेक, आपली सारासार विचारशक्ती हाच खरा देव. एखादं पापकृत्य केल्यानंतरही ज्याला सद्सद्-विवेकबुध्दीची टोचणी लागत नाही त्याचा देव मेला असे समजावे. यास्तव जोवर आपली कृत्ये सद्सद्-विवेकबुध्दीला धरून आहेत तोवर आपण देवाच्या (म्हणचे स्वत:च्याच) उजवीकडे आहोत.

उजवीकडे म्हणजे उजव्या हाताकडे असे नसून उजव्या म्हणजे Right किंवा योग्य बाजूला असे मला वाटते. म्हणूनच कदाचित पश्चातापी चोराला आपण येशूच्या उजव्या हातावर खिळले असावे. त्या चोराला आपल्या पापकृत्याची जाणीव होते आणि तो क्रुसावर खिळलेल्या अवस्थेत आपल्या पापाची कबुली देतो हेच self realization आहे म्हणूनच येशू त्याला म्हणतो आज (या क्षणी) तू माझ्याबरोबर सुखलोकात (स्वर्गात) आहेस. म्हणूनच जे जे विचार आपल्या मनात येतात, जे काही आपण बोलतो आणि आपण जी कृत्ये करतो ती विवेकाच्या कसोटीवर उतरत असतील तर त्या व्यक्तीहून देव वेगळा नाही आणि त्या अवस्थेहून स्वर्ग वेगळा नाही.

# साहित्य अकादमी आणि नशनल बुक ट्रस्ट च्या व्यासपीठावरून मांडलेली भूमिका आणि एक कविता

**--- फेलिक्स डिसोजा, भुईगाव**

भूमिका काय?  “हा प्रश्न मला क्यो भाई आपका पोलिटिक्स क्या है?” विचारला जातो अगदी तसाच वाटतो. अरुण काळे आपल्या एका कवितेत म्हणाले होते, "की कोणी अक्षर सुधारण्यासाठी कविता लिहित नाही." ते नेमकं आणि  खरंही आहे.

तर का लिहितो कवी कविता ? मी का लिहितो कविता? आणि मी ज्यासाठी लिहितोय त्या भूमिकेला सुसंगत होईल अशा आजवर मी कोणत्या आणि किती कविता लिहिल्या आहेत ? मी या मताशी सहमत आहे की कविता लिहितो म्हणजे त्यामागे कवीची म्हणजेच माझीही काहीएक भूमिका आहेच आहे.

तशी ती माझी एक माणूस म्हणूनही आहे, म्हणजे मी जगतो तर का जगतो? तर हा प्रश्न मला मी कवी का आहे? या पेक्षा अधिक जवळचा आणि महत्त्वाचा वाटतो. कारण माझ्या असण्या संदर्भात मी माणूस असणे हे पहिलं आहे आणि नंतर मी कवी आहे, कारण माणूस नसलेला कवी मी कधी पाहिलेला नाही.

कवी लेखक कलावंत म्हणून सध्याच्या असहीष्णू आणि मानवतेला मारक ठरत असलेल्या वातावरणात आपल्या नेमक्या भूमिकेचे भान असणे गरजेचे आहे असे मला वाटते आणि कवितेसंदर्भात मी माझी भूमिका मांडताना मला एक नागरिक म्हणून आतापर्यंत घेतलेल्या भूमिकेची उजळणी करावी लागेल, अशी भूमिका मी कधी घेतली? घेतली का ? तर मला वसईतील पर्यावरणाची चळवळ आठवते.. त्यावेळी "युवा विकास संस्थे"तर्फे "गावाचं अस्तित्व सिडकोच्या नियोजन आराखड्यापासून वाचवण्यासाठी, वसईतल्या हिरव्या पट्ट्यात स्थानिकांना विचारात न घेता बळजबरीनं लादलं गेलेलं शहर या विरोधात जनजागृतीसाठी गावोगाव पथनाट्य करणे, आंदोलनासाठी लोकांनी सहभागी होण्यासाठी दारोदारी पत्रके वाटणे, प्रशासकीय कार्यालयात विरोधाचं निवेदन देणे असले उद्योग आपण करीत होतो. आणि या मागे आपली एक भूमिका होती, अजूनही आंदोलन न संपल्याने ती आहेही, हा काळ तसा १२ वर्षापूर्वीचा आहे आणि त्यावेळी आजच्या वयापेक्षा अधिक तरुण असल्याने तेव्हाचा भूमिकेचा निकष थेट रस्त्यावर उतरण्यापर्यंत होता म्हणून १२ वर्षाअगोदर आतापेक्षा अधिक तरूण असण्याच्या वयात केवळ निषेध नोंदवणाऱ्याविषयी माझ्या मनात राग होता तो त्यावेळी कवितेतून असा व्यक्त झाला होता वय लहान होतं तसा हा विचार लहान होता... कवितेचं नाव आहे निषेध...

*त्यांनी झोपड्या जाळल्या*
*सामुहिक बलात्कार केले*
*गर्भाला आगीत टाकले*
*आणि तुमच्या छातीवर*
*बंदूक ठेवून म्हटले खबरदार*

*तेव्हा तुम्ही भीत भीत घरात बसून उच्च प्रतीचा*
*निषेध नोंदवलास*

*अन्यायाविरुद्ध रस्त्यावर उतरणाऱ्यात*
*तुम्ही कधी नव्हता*
*तेव्हा निषेध तरी का नोंदवायचा?*
*उगाच रिस्क कशाला ?*

तेव्हा मला असं वाटायचं... आणि गम्मत म्हणजे तेव्हा मी लहान होतो आणि आता थोडा वयाने मोठा झाल्यावर निषेध व्यक्त केला नाही तर किती रिस्क असते हे कळू लागलंय... तेव्हा लढ्याचं चळवळीचं वातावरण सगळीकडे सारखं होतं... एकीकडे वसईचा पर्यावरणाचा लढा रस्त्यावर चालू होता, बाजूला उत्तनला डंपिग ग्राउंड विरोधात, पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नासंदर्भात स्थानिक रस्त्यावर उतरले होते, रायगडला रिलायन्सच्या सेझ विरोधात भूमिपुत्र रस्त्यावर उतरला होता... ठिकठिकाणाहून संघटीत सूर ऐकू येत होता... एकीकडे नैसर्गिक सुबत्ता लाभलेली गावे हे सगळं वाचाविण्याठी लढत होती, तर दुसरीकडे निसर्गाकडे सुबत्तेचं दान मागत करुणा भाकणारी गावे होती.

आपल्या मुळावर उठणाऱ्या विरोधात लढण्याचं वैचारिक आणि सामुहिक बळ समाज बाळगून होता. आपल्या गावात बोलल्या जाणाऱ्या बोलीचा त्याला अभिमान होता. आपल्या वाडवडिलांपासून मिळणाऱ्या सांस्कृतिक संचिताच त्याला अप्रूप वाटत होतं, परंपरेतील सत्व जपण्यासाठी तो झटत होता.

आणि अचानक या आंदोलनाचं काय झालं ? हाती यश येतंय असं वाटण्याच्या वेळी ही आंदोलनं पद्धतशीरपणे चिरडली गेली... प्रचंड दडपशाही वापरून ह्या चळवळी नष्ट करण्यात आल्या किंवा युक्त्या वापरून लोकांना सांगण्यात आलं की हा आहे विकास आणि असं आहे तुमचं चकचकीत जगणं... हे शहर आणि हा झगमगाट म्हणजे शहराच्या पाठीवर उगवलेलं टवटवीत गुलाब... आणि तेव्हा आपण आपल्या अंगणात दरवळणारा मोगरा कापून टाकला आणि तोवर कळू लागलं जे दाखवलं गेलं उगवलेलं गुलाब ती तर जखम आहे शहराच्या पाठीवर उमटलेली.

आनंद साजरा करणारी, उपभोगू देणारी इतकी साधने आपल्या हातात देण्यात आली, कि आपण विसरलो आपल्या काय हवे आहे, दुय्यम तिय्यम दर्जाच्या कलाकृती पाहून आपलं सांस्कृतिक संचित आपल्याला अडगळ वाटू लागली आणि कुणी काहीही विरोध न करता गावाचा कशाकशासाठी असलेला विरोध संपला... असं म्हणतात भूमी नसलेला माणूस भूमिका घेऊ शकत नाही, तर हे सगळं असं आहे ... या सर्वामध्ये माझ्या बारक्या जीवाने फार मेहनतीने आणि स्वत:ला वेळोवेळी बजावत भूमिका घेतली आहे आणि ज्या ज्या वेळी थकलो आहे, निराश झालो आहे तेव्हा मी कलेकडे धावलो आहे. मग ते नाटक असो किंवा कविता. मला नाचता येत नाही, गाण्यासारखा माझा सूर नाही, रेषा रंग यात मला गती नाही. बोलण्यासाठी माझ्यापुरते उरते ते नाटक आणि कविता. एकट्याने करण्यासारखी गोष्ट उरते ती म्हणजे कविता... आणि ती मी लिहितोय. गावाचं शहर होतंय. आपण इतकी वर्षे काय वाचवत होतो शेती, ज्या भाषेत आपण प्रेम करायला शिकलो ती भाषा, आपल्याला भूमिका घेता यावी म्हणून आपली भूमी... आपण काय वाचवलं... मित्रानो सुबत्ता आली, शेणामातीची घरं हरवलेली, जातं हरवलं, ओटा आणि ओट्यावरील १०-२० लोक मावतील असा असणारा हिंदोळा हरवला या बदल्यात आपल्याला काय मिळाल? एकटेपणाचा शाप... आपलं गाव सोडून शहरात होणाऱ्या विस्थापन जितकं भयानक आहे त्याहीपेक्षा घरातल्या घरात विस्थापित व्हावं लागणं अधिक भयानक आहे. आज संवादाची अनेक माध्यमं उपलब्ध असताना आपण टाइपनारी आवाज नसलेली गिचमिड बडबड फक्त करू शकतो हे मला भयानक वाटते. कवी लेखकांना भूमिका घेऊ न देणं आणि भीती जिवंत राहावी म्हणून थेट गोळ्या घालून मारणं आणि हुबेहूब भीती पसरत राहणं हे मला फार अस्वस्थ करतं. चंगळ करणं आणि त्यासाठी साधने उपलब्ध असणे हाच खरा विकास आहे असा पक्का झालेला समझ, उत्सवातून इतका आवाज वाढला आहे की कुठलाच आवाज आपल्याला ऐकू न येणे, एकाच वेळी आपल्या नकळत आपण मानसिक गुलामगिरी स्वीकारलेली असणं, कुठलीही

बळजबरी न करता आता ते आपल्यावर, आपल्या झाडांवर, भूमीवर ताबा मिळवत आहेत आणि आपण इतकी चंगळ करू लागलो आहोत की निसर्गासाठी लढण्याचं नैतिक बळच हरवून बसलो आहोत... सगळीकडून एकसारखाच आनंद साजरा केला जातोय... त्यात बेभान होणं आहे आणि बेफिकीर होणं बळावत आहे या सगळ्यात दु:खाचा आवाज कुठेच नाही का? तर तो आहे.... आणि तो कवीचा आहे. तो नसेल तर तसा तो असायला हवा.

हे सगळं माझ्या भवतालात घडत आहे आणि मी कविता लिहित आहे, म्हणजे काय करीत आहे ? हे पाहण्यासाठी मला माझ्या कवितेकडे वळावे लागेल....

***बाजार***

*मी घरातून*
*बाजारात गेलो आणि*
*बाजार घेऊन घरात आलो*

*एका चिंचोळ्या दारातून मी वस्तूंची*
*यादी घेऊन जेव्हा घर सोडलं*
*तेव्हा माझ्या मेंदूच्या यादीत मावतील आणि*
*दारातून सहज आत शिरतील इतकी छोटी होती*
*वस्तूंची यादी*

*मी शिरतो मंत्राशिवाय*
*आपोआप उघडणाऱ्या दारातून*
*अलीबाबाच्या गुहेत*
*ज्यात हजार-लाख-किंवा त्याहीपेक्षा जास्त*
*वस्तूंची मांडामांड पाहून आपल्या हातातील चुरगललेल्या*
*वस्तूंची यादी पुसट होऊ लागते*
*वस्तूंच्या ओळीमधून चालता चालता वाटू लागतं*
*कधीही कोसळतील या वस्तू आणि आपण गाडले जाऊ*
*या वस्तूंच्या ढिगाऱ्याखाली*

*आपण  लुटू  शकत नाही ही गुहा*
*पळून जावं येथून*
*यादीसकट पळून जावं गावात*
*पोपटमामाच्या दुकानात*

*जे आता फक्त आठवणीत शिल्लक आहे*

*जेथे यादीतल्या सगळ्याच वस्तू नेहमी मिळायच्याच असं आही*
*पण महिन्याचं सामान भरलं  म्हणून  पोपटमामा*

*खुपसायचा बोटात*
*बोटासारखीच पाच फ़ोफ़िसं आम्हा*
*मुलांच्या बोटात आणि आम्ही लांब झालेली बोटं नाचवत*
*परतायचो घरी यादीत असलेलं सामान घेऊन*

*आताही मी परतलोय*
*बाजार घेऊन घरात*
*तर मी सरकवतो पुढे लांबलचक बायकोने न दिलेली यादी*
*तिने दिलेल्या फाटक्या मळक्या झोळ्या ऐवजी*
*सरकवतो वस्तूने तुडूंब भरलेल्या चकचकीत नव्याकोऱ्या*
*पिशव्या*
*बायको धुंडाळते एक एक पिशवी*
*ज्यात नसतात तिच्या यादीत असलेल्या  वस्तू*
*ती विचारते पुन्हा पुन्हा*
*कुठे आहे मीठ*
*मी दाखवतो तिला मीठासारखीच खारट असणारी वस्तू*
*ती विचारते*
*कुठे आहे साखर*
*मी दाखवतो तिला साखरेसारखीच गोड असणारी वस्तू*
*हिरमुसते बायको पण लगेच म्हणते कौतुकाने*
*तू  माझ्या संसाराला चार चांद लावले आज*
*आणि सांगते इतकी मोठी लांबलचक*
*वस्तूंची यादी कशी शिरणार आत या चिंचोळ्या दारातून*

*समजून घेतो मी तिला अन बदलू लागतो*
*घराचा चेहरा मोहरा*
*उभारतो रुंद दरवाजा आणि आणतो मोठे कुलूप*
*बनवून घेतो घरातल्या माणसाच्या संख्येएवढ्या किल्ला*
*म्हणजे घरात नसल्यावर कुणी*
*कुणाला ताटकळत एकट्याने वाट पहावी लागणार नाही*
*बंद दारासमोर*
*घरातच घालवता येईल एकांत*

*अशा प्रकारे मी रचत गेलो*
*सगळ्या वस्तू ओळीओळीने*
*शक्य तेवढ्या अडगळीच्या वस्तू काढल्या बाहेर*
*जसं की कंदिल ,घासलेटचा दिवा ज्या नेहमी*

*घरातला अंधार घालवण्यासाठी आल्या होता उपयोगात*
*काढुन टाकलं आज्जीचं गाणारं जातं ,सुंभाने विणलेली खाट*
*ज्याच्या भोवती  आज्जीच्या गोष्टीतील  कितीतरी पात्रे*
*पसरलेली असायची मनात करुणा घेउन*

*एक एक करून बाजार शिरत राहिला घरात*
*स्टेडर्ड ऑफ लीविंगने सुखावलो मनभर क्षणभर*

*एकच वस्तू  अनुभवू शकलो नाही पुन्हा पुन्हा*
*वाढत गेला निरोपयोगी वस्तूंचा ढीग*
*ज्या आपल्या आवडत्या वस्तूच्या बदल्यात आल्या*
*होत्या घरात*

*ज्या वस्तू बाहेर काढल्या त्या आपल्या आत राहिल्या*
*नव्या वस्तू आत आल्या*
*त्या आपल्या बाहेर तिष्ठत  राहिल्या*
*होऊ शकल्या नाहीत त्या आपल्या*
*त्यानं होऊ  शकलो नाहीत आपण सुखी*
*करत राहिलो व्यभिचार पुन्हा पुन्हा सुखावण्यासाठी*
*अशा प्रकारे आपण प्रेम करू शकत नाही*

# “नाताळ”

**--- राकेश परेरा, आगाशी**

आता ब्लू हाऊसचे संघनायक प्रफुल्ल आणि सरिता विजेता चषक घेण्यासाठी मंचावर येतील… ह्या सुचनेबर वादळी वाऱ्याने खुल्या मैदानात धुडगूस घालून धुळीचा झंझावात यावा तसा टाळयांच्या गजराने शाळेच्या मैदानाचा ताबा घेतला. ह्या टाळयावर जितका जिंकलेल्या संघाचा हक्क होता त्यापेक्षा कित्येक पटीने प्रफुल्ल आणि सरिता ह्यांचा वैयक्तिक हक्क होता. शाळेच्या वार्षिक क्रीडा संमेलनात दरवर्षी हे दोघे अग्रेसर असत पण ह्यावर्षी दोघांनी आपल्या कामगिरीने आपल्या संघाला देखील विजेत्याच्या पंगतीत बसवून साऱ्या शाळेचे मन जिंकून घेतले. योगायोग असा कि बाल सवंगडी असलेले प्रफुल्ल आणि सरिता हायस्कूलमध्ये प्रवेश केल्यापासून एकमेकांच्या विरोधात खेळत असत, पण दहावीच्या शेवटच्या अन महत्वाच्या वर्षात प्रवेश करताना एकाच गटासाठी निवड होताना ह्या दोघांनी मनोमन एक दुसऱ्याची निवड केलेली अन आज दोघेही आपल्या संघासाठी विजेता चषक उचलण्यासाठी एकत्रितरित्या मंचावर आलेले. आपल्या प्रेमाला हा दैवाने दिलेला कौल असावा का ह्या बालसवंगड्यांच्या मनात तरळलेल्या सुखद विचाराने ह्या दोन्ही प्रेमीमनाला ह्या सगळ्या गदारोळातून एका शांत निर्जन ठिकाणी नेऊन ठेवलेले.

दहावी उत्तम गुणांनी उत्तीर्ण झालेल्या ह्या दोन्ही प्रेमिकांनी आपल्या भावी शिक्षणाचा मार्ग निवडताना, आपले प्रेम हे आपले उद्दिष्ट आणि एकत्रित सुखी वैवाहिक जीवन हे आपले ध्येय ठरवून आपल्या भविष्याची अन आपल्या करियरची मार्गक्रमणा ठरवली. आपले पुढचे शिक्षण आणि आपले ठरवलेले ध्येय ह्यात ह्या दोघांनी कधीही गफलत होऊ दिली नाही. सात वर्षाचा काळ कसा झर्रकन निघून गेला. ह्या काळात प्रत्यक्षात कमी भेटणे झाले तरी प्रफुल्ल आणि सरिता वेगवेगळ्या संपर्कांच्या मार्गाने एकमेकांच्या सान्निध्यात राहत असत. नुसते एकमेकांचे प्रेमी न बनता हे अडचणीच्या वेळी एकमेकांचे मार्गदर्शक तर निराशेच्या प्रसंगी एकमेकांचे प्रेरणास्थान बनून दोघांनी आपले भविष्य एक सुरक्षित मार्गावर आणून ठेवले. वयाच्या तेविसाव्या वर्षी प्रफुल्ल आणि सरिताने, ज्यादिवशी आपल्या भावना एकमेकांना खुल्या केलेल्या तो दिवस शुभमुहुर्त मानून आपआपल्या प्रेमाचा आपल्या आईवडिलांना खुलासा केला. आजवरच्या आयुष्यात आपल्या आज्ञेत, आपल्या शब्दात असलेली आपली मुलांचा, बालपणापासून तारुण्याच्या मोहमयी दुनियेत प्रवेश करेपर्यंत साध्या एका शब्दाची तक्रार कानावर न येऊ देणाऱ्या आपल्या मुलांचा दोन्ही पालकांना अभिमान होता. ह्या अभिमानाचा मान ठेवून दोन्ही पालकांनी आपल्या मुलांना मोठ्या मनाने होकार दिला. प्रफुल्लच्या जन्मदिवशी दोघांचा साखरपुडा मोठ्या थाटात साजरा केला, आणखी दोन वर्षांनी दोघांच्या लग्नाचा बार उडवून द्यायचा मनसुबा रचून आजपर्यंत मित्र म्हणून वावरणारी दोन्ही कुटुंबे नात्यात बांधली गेली.

आजवर प्रफुल्ल आणि सरिता जे काही करत ते ठरवून, त्यामुळे वयाची पंचविशी आणि पंचवीस डिसेंबर हा सरिताचा वाढदिवस, नाताळचा शुभमुहुर्त मानून हे दोन्ही प्रेमी दांपत्यरूपी नव्या नात्यात शिरले. आयुष्याच्या बागेत मनाच्या सुपीक तुकड्यावर पडलेले प्रेमाचे नाजूक बी, आजवरच्या काळजी, ओढ, आस्था ह्या पोषक गुणाने सिंचलेले बी आज विवाहरुपी वृक्षात रूपांतरित झालेले पाहून प्रफुल्ल आणि सरिता फार खूष होते. मनाने वरलेला साथीदार आज जीवनसाथी म्हणून लाभला ह्यापुढे स्वर्गसुख देखील कवडीमोल वाटत होते. आईवडिलांनी लग्नाला दिलेली परवानगी ही भेट कमी ठरावी कि काय म्हणून दोन्ही कुटुंबांनी प्रफुल्ल आणि सरिताला 2 आठवड्याची युरोप हनिमून टूर लग्नाची भेट म्हणून दिली. हे सर्व पदरात पडलेले सुख म्हणजे पौर्णिमेच्या पूर्ण चंद्र राती, आवडत्या साथीदारासमवेत कोवळ्या गवतात अनवाणी पावलाने

चालत असता अचानक आकाशातून तारा समोर पडावा असेच काही विलोभनीय आणि अविश्वसनीय होते.

युरोपचे शांत, ढगाळ वातावरण, बर्फ़ाच्छादित हिमशिखरे, हिरवा निसर्ग, ह्यात फिरता फिरता पंधरा दिवस कसे निघून गेले हे दोघांना कळलेही नाही. परत येताना सरिताचे मन थोडेसे खट्टू होते पण, सोबत असलेल्या ह्या पंधरा दिवसांच्या आठवणीने दोघांच्या मनाचे पोते गच्च भरलेले, त्यातच प्रफुल्लने, मेणबत्तीच्या मंद प्रकाशात हॉटेलच्या रूफ टॉप रेस्टॉरंटमध्ये जेवताना रोमियो स्टाइलमध्ये म्हटलेले, "आपण पूर्ण आयुष्य हनिमून म्हणून जगायचे." हे आश्वासक शब्द सरिताला ढगावर झोके घेत असल्याचा भास देत होते. " तू हाताची मेहेंदी उतरेपर्यंत कामाला जावू नकोस" ह्या प्रफुल्लच्या लबाड वक्तव्यावर, चालेल पण तो पर्यंत मी माहेरी राहीन, ह्या उत्तराने प्रफुल्ल थोडासा उडाला, " ते कसे काय शक्य आहे?" हा प्रश्न विचारताच," मी झोपली असता तू फिक्कट झालेली मेहेंदी पुन्हा रंगवून ठेवशील ह्याची मला पुरेपूर खात्री आहे." ह्या सरिताच्या उत्तराने प्रफुल्ल पुरेपूर उमजून गेला कि सरिताला आपली लबाडी खरोखर कळली आहे. आपल्या चेहऱ्यावर थोडीशी नाराजी दाखविणारा प्रफुल्ल, सरिता आपल्या खरोखर ओळखते ह्या सुखद भावनेने मनातून फार उल्हासित झालेला. दिवसामागून दिवस जात असताना, एकेदिवशी भल्या पहाटे बाथरूम मधून येणाऱ्या उल्टीच्या आवाजाने प्रफुल्लला रोजच्या वेळेअगोदर जाग आली. आपल्या पत्नीला होत असलेला त्रास पाहून सहजसुलभ काळजीच्या स्वरात प्रफुल्ल सरितावर रागावत म्हणाला, " किती वेळा सांगितले आहे जास्त तिखट काही खाऊ नकोस, ऍसिडीटी होईल." ह्यावर काहीच न बोलता सरिता मंद पावलाने आपल्या खोलीत परतून आपल्या बिछान्यात येऊन पहुडली. "नुसती झोपतेस काय? ही गोळी घे, बरे वाटेल." प्रफुल्लच्या ह्या काळजीयुक्त स्वरावर मंद हसत सरिता हळूच बोलली," आता नऊ महिने हा गोड त्रास सहन करावा लागणार!" "अगं एवढी गोळी घे, कसले नऊ महिने आणि कसला गोड त्रास!" असे उदगारलेला प्रफुल्ल, नऊ महिने अन गोड त्रास ह्या शब्दावर परत क्षणभर विचार करताच एकदम आनंदून गेला.

आयुष्य कसे स्वप्नवत सरतंय ह्या विचाराने दोघेही देवाचे आणि दैवाचे मनोमन भरपूर आभार मानत होते. आपल्या येणाऱ्या अपत्याला सर्वांगसुंदर आयुष्य द्यायच्या अनेक योजना प्रफुल्ल आणि सरिता दोघेही आखत होते. व्यवस्थित खानपान, वेळोवेळी केल्या जाणाऱ्या तपासण्या, योग्य औषधोपचार ह्यामुळे सरिता आणि तिच्या गर्भातील बाळ दोघेही सुखरूप अन निरोगी वाढत होते. पण एकेदिवशी, स्कूटरवरून घरी परतणाऱ्या सरिताला समोरून येणाऱ्या कारने धडक दिल्याने त्वरित हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. क्षणाचाही विलंब जरी झाला नसला तरी डॉक्टरांनी निदान करताना, सरिता पोटावर पडल्याने गर्भाला जबर इजा झाली असून त्वरित शस्त्रक्रिया करून हा गर्भ काढावा लागेल असे सुचविले. हे ऐकताच दोन्ही कुटुंबे, विशेषतः प्रफुल्ल आणि सरिता ह्या दोघांसाठी हा फार मोठा आघात होता. हा सहा महिन्याचा गर्भ नव्हे तर आपल्या आयुष्याचे स्वप्न आहे, अन आपले स्वप्न असे अर्ध्यावाटेत सोडणे दोघांनाही मान्य नव्हते परंतु आजपर्यंत दैवाने दिलेली फुले हसत हसत स्वीकारली तर नशिबात आलेला हा काटा देखील तितक्याच विनातक्रार स्वीकारण्याची तयारी प्रफुल्ल आणि विशेषतः सरिताने दाखवली. शस्त्रक्रियेनंतर घरी आलेली सरिता आपला गर्भ नव्हे तर आपले हृदय काढून घेतले असावे अशा भावनेने जगत होती. पण सरिताला माहीत नव्हते कि दैवाने आजवर दिलेल्या सुखाची परतफेड इतक्या स्वस्त दुःखाने केली नव्हती कारण सगळ्यात मोठी आणि दुःखदायक बातमी प्रफुल्ल आणि दोन्ही कुटुंबाने सरितापासून लपवून ठेवलेली. सरिताची शस्त्रक्रिया करण्याअगोदर डॉक्टरांनी प्रफुल्ल आणि दोन्ही कुटुंबाला विश्वासात घेताना सांगितले की हा गर्भ काढून घेणे सरिताच्या सुखरूपतेसाठी फार महत्वाचे आहेच पण त्याहीपेक्षा तिचे गर्भाशय काढणे फार महत्वाचे आहे अन ह्याची परिणीती म्हणजे सरिता ह्यापुढे कधीही आई बनू शकत नाही. दोन्ही कुटुंबासाठी जरी ही अतिशय दुःखद अन अस्वीकारणीय बाब असली तरी सरिताच्या आयुष्याचा विचार करता ही बाब मामुली दुःख म्हणून त्यांनी स्वीकारली.

प्रफुल्ल आणि तिच्या सासू सासऱ्यांना व आईवडिलांना जरी वाटत असले कि आपण सरितापासून हे रहस्य लपवून ठेवले आहे तरी सरिताला स्वताच्या शरीरात झालेला बदल जाणवत होता. आपण आई बनू शकत नाही ह्यापेक्षा आपल्यापासून प्रफुल्लला पितृसुख मिळू शकत नाही हा विचार तिला जास्त पोखरत होता. तर सरिता आई बनू शकणार नाही

हि चिंता जितकी प्रफुल्लला जाळत होती तितकाच दाह आयुष्यभर आपल्याला निपुत्रिक जगावे लागणार ह्या विचाराने होत होता.

एकेकाळी एकमेकांची सावली असलेले, सरिता फुल तर तिच्या अवतीभोवती फुलपाखरा सारखा भिरभिरणारा प्रफुल्ल, आपल्या पाकळयात ज्याप्रमाणे कमळाने भ्रमराला लपवावे त्याप्रमाणे सरिताला जपणारा प्रफुल्ल, रात्र रात्र उशिरा येणे, कंपनीच्या कामानिमित्ते दौऱ्यावर जाणे, शनिवार रविवार मित्राला भेटायला घराबाहेर जाणे असे  एक न अनेक बहाणे शोधू लागला. सिगारेट दारूच्या वासापासून दूर पळणारा प्रफुल्ल आता रोजचा दारू पिऊन येऊ लागला. एकेकाळी घरात खिडक्यांचे पडदे बदलताना एकमेकांचे मत जाणून घेणारे प्रफुल्ल सरिता, आठवडा आठवडा एकमेकांशी अबोल्यात राहू लागले. दोन्ही कुटुंबाने विशेषतः सरिताने खूप वेळा पुढाकार घेऊन प्रफुल्लचे मन जाणण्याचा प्रयत्न केला पण सारे निरर्थक ठरले. एकेदिवशी मध्यरात्री सरिताला प्रफुल्ल अगदी हळुवारपणे रडत असल्याचा आवाज आला. कुशीवर वळून सरिताने प्रफुल्लच्या डोळयांना स्पर्श करताच तिला त्याचे डोळे आसवाने भरलेले जाणवले. सरिताचा स्पर्श होताच तिच्या दिशेने कुशीवर वळत, तिला आपल्या वेंगेत घेत प्रफुल्ल हमसून हमसून हुंदके देऊ लागला, विशेष म्हणजे प्रफुल्ल आज प्यायलेला नव्हता. हा अनुभव सरितासाठी नवा अन तितकाच सुखद होता. रडता रडता सरिताच्या गालावर मुके घेत प्रफुल्ल काहीतरी सांगत होता, पण त्या हुंदक्यांनी त्याच्या आवाजाला दाबून ठेवलेले. प्रफुल्लच्या केसात हळुवार हात फिरवत सरिताने त्याला प्रथम शांत केले, पण ते करत असताना सरितादेखील त्या अश्रुसुरात प्रफुल्लसोबत अश्रू गाळू लागली.

प्रफुल्ल शांत झाल्यावर त्याचे डोके आपल्या मांडीवर घेत तिने प्रफुल्ल काय सांगू इच्छितो ह्याकडे ध्यान दिले असता, सरिताला आपला हरवलेला प्रफुल्ल परत मिळाल्याची जाणीव झाली. प्रफुल्लच्या शब्दांनी त्या मध्यरात्री सरिताला आपल्या आयुष्यात आनंदाची पहाट होत असल्याची सुखद जाणीव झाली. ," सरिता मला माफ कर, माझ्या दुःखात मी तुला पूर्णपणे विसरून गेलो ग, तू दिलेल्या आजवरच्या प्रेमाची मी चुकीची परतफेड केली. मला माफ कर, मी तुझा गुन्हेगार आहे. " प्रफुल्लच्या ह्या शब्दाने आजवर झालेल्या जख्मेच्या खपला निघून त्यावर जुन्या नात्याची नवी कातडी झरझर चढत होती. प्रफुल्लच्या पुढच्या वाक्याने तर सरिताला एकदम आकाश ठेंगणे करून सोडले," सरिता आपण बाळ दत्तक घेवू या!" प्रफुल्लचे शब्द नक्की आपण ऐकले तेच आहेत ना म्हणून तिने त्याला तेच वाक्य परत उच्चारण्याची विनंती केली. " सरिता तू तयार असशील तर आपण बाळ दत्तक घेवू!" त्याचे हे शब्द ऐकताच सरिताने प्रफुल्लला गच्च आलिंगन दिले. त्याच्या गालावर, डोक्यावर चुंबनाचा वर्षाव करत तिने प्रफुल्लचे मनापासून आभार मानले. तिची चुंबने म्हणजे तिचा होकार आहे हे कळायला प्रफुल्लला क्षण देखील लागला नाही. सरिताला शांत करत तिला आपल्या बाहुत घेत कितीतरी महिन्यांनी आज दोघे परत एकदेह अन परत एकदा एक मन झाले. दुसऱ्यादिवशी दोघांनीही रजा घेतली. आपल्या कुटुंबाला आपला इच्छा कळवून त्यांची परवानगी घेऊन आपली इच्छा निर्णयात रूपांतरित करून दोघे सरळ , 'नवी पहाट' ह्या अनाथ आश्रमात गेले.

सगळी कायदेशीर कारवाई पूर्ण करून परत एकदा सरिताचा वाढदिवस मुहूर्त ठरवून, चोवीस डिसेंबरला मध्यरात्री त्या दीड वर्षाच्या बाळाला, नव्हे आपल्या बाळाला त्यांनी आपल्या घरी आणले. बरोबर बाराच्या ठोक्याला त्या बाळाबरोबर आपल्या दाराच्या चौकटी आत प्रवेश करताना, प्रफुल्लने सरिता आणि आपल्या बाळाला आपल्या बाहुत घेतले अन म्हणाला, " Merry Christmas सरिता,Merry Christmas क्रिस. आज त्या दोघांना घरी बनवलेल्या येशूबाळाच्या गोठ्यातील ते बाळ आनंदाने हसत असल्यासारखे दिसत होते अन आपल्या  बाळाच्या रुपाने आपल्या आयुष्यात "खरा नाताळ"  आल्याचे जाणवत होते.

# लहान मुलांची निरीक्षणशक्ती - काही अनुभव

**--- डॅनिअल मस्करणीस, मर्देस, वाघोली.**

लहान मुलं खरंच जन्मतःच उत्तम विद्यार्थी असतात. त्यांच्या सूक्ष्म आणि अचूक निरीक्षणाने ते आपल्याला विस्मयचकित करीत असतात. आपण कितीही , 'मी माझ्या मुलांना हे शिकवीन, ते शिकवीन' म्हटले तरी, बहुतेक वेळेला तेच आपल्याला काही तरी नवीन शिकवित असतात. ह्या मागचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे, कोणताही पूर्वग्रहदुषितपणा नसलेला, व निखळ विवेकी असलेला, असा त्यांचा अवतीभवती पाहण्याचा दृष्टीकोन. आणि ह्यातूनच ते विविध भंडावून टाकणाऱ्या प्रश्नांचा आपल्यावर मारा करतात. आपणही बहुतेक वेळा कंटाळून त्यांच्या शंका डावलतो. परंतु मुलांच्या प्रश्न विचारण्याच्या वृत्तीला आपण प्रोत्साहन दिलं पाहिजे. कित्येकदा त्यांना उत्तरं देत असताना आपल्यालाच बऱ्याच गोष्टी नव्याने कळतात. फक्त निरीक्षण करणे एवढेच नव्हे, तर ते निरीक्षण/माहिती योग्य जागी apply करणे हेही ह्या लहान मुलांना नैसर्गिकरित्या अवगत असते. आणि ते ज्या प्रकारे त्यांना नव्याने अवगत झालेली माहिती वापरतात ते पाहणे हा एक आनंद असतो आणि प्रत्येक सुजाण पालकाने त्याचा अनुभव घेतला पाहिजे.

माझा मुलगा, तेव्हा दोन-अडीच वर्षाचा असेल,  नुकताच तो मोबाईल कॅमेरा हाताळू लागला होता. मी त्याला, एके दिवशी सहजच "कॅमेरा क्लिक करायच्या अगोदर 'smile plz' म्हणायचे, बरं का ?" असे शिकवले. आणि तो ते पटकन शिकलाही. फोटो क्लिक करायच्या अगोदर, गोड आवाजात 'smile plz' असं पुढच्या व्यक्तीला म्हणून मगच तो कॅमेरयाची कळ दाबायचा. ह्याला काही दिवस झाले आणि एका रात्री, झोपायच्या वेळी मुलाने नेहमीप्रमाणे 'दही-हंडी' करायचा दंगा लावला होता. ह्या 'दही हंडी' मागेही एक किस्सा आहे. श्रीकृष्ण जयंतीच्या दिवशी, 'मुलावर सर्वधर्मसमभाव संस्कार व्हावे, त्याने वेगवेगळे उत्सव अनुभवावेत. त्या मागची लोकभावना समजून घ्यावी' असा 'उदात्त' हेतू ठेवून मी मुलाला 'दही हंडी'चा सोहळा पाहण्यास नेले. तर कुठला उत्सव आणि कुठली लोकभावना, एकमेकाच्या अंगाखांद्यावर चढून खाली 'धपकन' उडी मारायची हेच फक्त त्याने त्या दृश्यातून उचलले. त्या नंतर रोज रात्री झोपताना आमच्या बेडमध्ये 'दही-हंडी' करण्याचा सोहळा जो सुरु झाला तो आजतागायत सुरू आहे. तर अश्याच एका रात्री त्याला 'दही-हंडी' करायची होती. मी दिवसभरातल्या कामामुळे खूप थकलो होतो. त्यामुळे काहीसा चीड-चिडा होऊन मी त्याला 'आता दंगा पुरे. झोप पाहू' असे दटावले. माझा तो वैतागलेला चेहरा पाहून लगेच तो माझ्या कानाजवळ येऊन मला म्हणाला 'smile plz'. मला आश्चर्य वाटले. त्याला तर ते मी फक्त कॅमेरा क्लिक करायच्या वेळेलाच बोलायला शिकवलं होतं. पण त्याने तो धडा फक्त  कॅमेरा-पुरता मर्यादित ठेवला नव्हता. त्याने तो धडा जीवनाच्या इतर अंगात सहज वापरला होता.

आणखिन एक किस्सा. मुलगा वर्षभराचा असतानाच मी त्याला 'Thank You', 'Sorry' कधी बोलायचे हे शिकवण्यास घेतले होते. आणि त्या प्रमाणे तो चटकन शिकलाही. या गोष्टीला दीड वर्ष उलटून गेले होते. कोणाकडून एखादी वस्तू घेताना तो Thank you बोलत असे. पण एके दिवशी पेट्रोल पंपावर मी गाडीत पेट्रोल भरल्यावर त्याने त्या पेट्रोल भरणाऱ्या मुलाला जसे सहज Thank you म्हटले ते बघून तो पेट्रोलवाला मुलगाच काय मी पण चकित झालो. पेट्रोलवाल्या माणसाने आपल्या गाडीत पेट्रोल भरून आपल्याला service दिलेली आहे आणि म्हणून त्याला thank you बोलणे उचित आहे हे त्या अडीच वर्षाच्या चिमुकल्याला उमगले. खरंच शहाणपणाविषयी लहान मुलांना कधीच कमी लेखू नये. ऑस्कर वाईल्डने म्हटल्याप्रमाणे, 'Wisdom doesn't necessarily come with an age'.

कधीकधी लहान मुलांचे निरीक्षण आपल्याला एखाद्या समस्येचा उलगडा करायलाही मदत करते. आमच्या घरी काही कार्यक्रम असला की, घरातील आणि आसपास राहावयास गेलेल्या कुटुंबियांबरोबर, माझ्या चुलत बहिणी, आणि त्यांची मुलं असा गोतावळा जमायचा. त्यात सर्व ७-८ वर्षाखालील लहान मुले होती. एकदा अश्याच एका कार्यक्रमाच्या वेळी, त्या मुलांतील एक लहानगा, झोपाळ्यातून खाली पडला. त्याला खूप लागले. आम्हाला लवकर धावपळ करून त्याला डॉक्टरांकडे घेऊन जावे लागले. मलमपट्टी करून त्याला घरी घेऊन येईपर्यंत खूप उशीर झाला. दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी अशी धावपळ करावी लागल्या कारणाने सगळ्यांचा मूड-ऑफ झाला होता. हॉलमध्ये एका कोपऱ्यात सर्व बच्चे कंपनी बसून होती. त्यातील एकीने सहज म्हटले, 'नेहमी आपल्या घरी काही कार्यक्रम असला कि आपल्यातील कोणाला ना कोणाला काहीतरी अपघात होतोच'. मी क्षणभर तिच्या वाक्यावर विचार केला. ती अगदी खरे बोलली होती. सहा महिन्याअगोदरही लग्नकार्यात ह्या बच्चेकंपनीतील एकीला असाच घरी किरकोळ अपघात झाला होता. गेल्या वर्षीही नाताळ सणाच्या वेळी सगळे एकत्र आलेले असताना ह्यातील एका लहानग्याला इजा झाली होती. काय कारण असावे बरे ह्या विचित्र योगायोगामागे ? आणि चटकन डोक्यात लख्ख उजेड पडला. ह्या प्रश्नाचे उत्तर हे त्या चिमुरडीच्या निरीक्षणातच लपले होते. घरी काही कार्यक्रम असला, म्हणजे सगळी मोठी माणसे विविध कामात गुरफटून जातात, आणि ह्या चिमुरड्यांवर सगळ्या मोठ्यांचे दुर्लक्ष होते आणि म्हणून हे किरकोळ व गंभीर पडण्याचे घरगुती अपघात होतात. आमच्या घरी प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी होणाऱ्या लहान मुलांच्या घरगुती अपघातामागचे गूढ उलगडले होते. आणि ते शक्य झाले त्यांच्याचपैकी एका लहानगीने केलेल्या अचूक निरीक्षणामुळे !

आणि हो, हे निरीक्षण त्या लहानग्यांनी त्यांच्या परीने जे काही थोडे अनुभवले आहे किंवा वाचले आहे त्यावर आधारित असते. त्याचे एक गमतीदार उदाहरण म्हणजे, माझ्या मुलगा आता ABCD ह्या आद्याक्षरांची ओळख करून देण्यासाठी असलेली पुस्तके वाचतो. ही सर्व पुस्तके, A फॉर Apple, B फॉर Ball, अश्या टिपिकल चित्रस्वरूपात आहेत. आम्ही एका एअरपोर्टला होतो, तिथे विविध कंपन्यांचे जाहिरातींचे बोर्ड लागलेले होते. अश्याच एका ING च्या बोर्ड वर, 'ING' हे त्या कंपनीचे नाव, व त्या नावातीलच, G ह्या letterला लागूनच त्या कंपनीचा लोगो, सिंह(Lion) ह्याचे चित्र होते. माझ्या मुलाने लगेचच त्याची शंका उपस्थित केली, "G फॉर Goat असायला हवे, Lion कसे?". त्याने जे ABCD चे पुस्तक वाचून जे काही ज्ञान मिळविले आहे, त्या ज्ञानाच्या पार्श्वभूमीवर त्याची ती शंका अगदी बरोबर होती. त्याचबरोबर, मुलाच्या ह्या शंकेने "आपलं ज्ञान हे आपण जे काही लिमिटेड वाचलेलं आहे तेवढंच लिमिटेड असतं" अश्या आशयाचा आरसाही आम्हा मोठ्यांना दाखवला.

# ब्लॅकमेल

**--- सिमसन परसावकर**

"मी मि. रमेशशी बोलतोय का ?" रमेशला सकाळी सकाळी एक निनावी कॉल आला. "होय, मी रमेशच बोलतोय. आपण कोण आणि काय काम आहे ?" असा रमेशने प्रतिसवाल केला. "हाहाहाहा ! मी कोण व काम काय आहे ? अहो, ते सोडून द्या. दाम काय आहे ते सांगा ?" समोरचा विकट हसत गहन भाषेत बोलला.

दाम ? कशाचा दाम ? काय बोलतोय हा ? सकाळी सकाळी ही काय नवीन झंझट? आता मात्र रमेशला राहवेना. "हे बघा, जे काही असेल ना ते स्पष्ट व सरळ शब्दांत बोला. असे गुळमुळीत बोलून माझा महत्त्वाचा वेळ वाया घालवू नका." रमेशने आता आवाज जरा चढविला.

"मि. रमेश, अहो दाम हो ! काही व्हिडीयो असू शकतात, काही ई मेल असू शकतात, काही फोटोज, फेसबुकी मेसेज किंवा ध्वनीमुद्रण केलेले तुमचे संभाषणही होवू शकते. त्यांचा दाम हो !" समोरचा अगदी शांतपणे उत्तरला. ते ऐकले आणि रमेश अजून गोंधळून गेला. आपण तसे कुणाच्या अध्यात नाही की मध्यात ? आपले कुणा बाईशी लफडेही नाही. कामाच्या व्यवहारात आपण प्रामाणिक असतो. मग ह्या व्यक्तीकडे माझ्याविरूद्ध असा काय ऐवज आहे की ही व्यक्ती मला अशी ब्लॅकमेल करतेय ? रमेश भूतकाळात गढला. पण त्याने केलेले अनैतिक वा अप्रामाणिकपणे केलेले असे एकही काम त्याला काही केल्या आठवत नव्हते.

"मि. रमेश ! काय विचार करतायेत ? माझ्यावर विश्वास नाहीये का?.... हम्म्म ! ठीक आहे. तुमचे फेसबुकवर ५००० मित्र व असंख्य फोलोअर्स आहेत. बरोबर ना ?" कसायाने थंड डोक्याने जितक्या सहजतेने बकरीच्या गळ्यावर सुरी फिरवावी, तितक्याच सहजतेने तो रमेशच्या मनावर आघात करीत होता. त्याचे हे वाक्य ऐकले आणि रमेशने घाबरून जाऊन, "नको नको, फेसबुकवर टाकू नका. माझी बदनामी होईल. मला आजचा अवधी द्या. आपण उद्या सकाळी तुम्ही सांगाल तिथे भेटू." असे काकुळतीला येऊन त्याला विनविले. मग त्यानेही रमेशची विनंती तात्काळ मान्य केली. "ठीक आहे मि. रमेश ! उद्या सकाळी आपण भेटू. पण लक्षात ठेवा..! नोट मिळवा नाहीतर बोट दाबा हे माझे तत्व आहे" असे बोलून त्याने फोन कट केला.

रमेशने सोफ्यावर बसकनच मारली. त्याच्या डोक्यात कोणीतरी हातोडा हाणतोय असे वाटावे इतके त्याचे डोके ठणकावू लागले होते. विचारांच्या खोल गर्तेत बुडी मारूनही त्याला गतकाळाचा काही केल्या थांगपत्ता लागत नव्हता. कोण असेल तो ? आणि आपल्या विषयी इतकी माहिती त्याच्याजवळ कशी काय आहे ? आपल्या एका पोलीस तक्रारीमुळे तो खूप मोठ्या गोत्यात येऊ शकतो, हे त्याला माहित असतानाही तो मला असा सरळसरळ सोशल साईट्सवर ब्लॅकमेल करण्याची धमकी देण्याईतपत कशी काय मजल मारू शकतो ?

खूप वेळ गेल्यावर त्याला काहीतरी आठवले. साधारणतः आठ महिन्यांपूर्वी त्यांच्या कार्यालयीन सहका-यांची एका 'अबक' फार्म हाऊसवर सहल गेलेली होत . त्यात काही स्त्री कामगार सहकारीही होते. दुपारच्या जेवणानंतर त्याला गाढ झोप लागली होती, हे त्याला आठवले. झोपेतून उठल्यावर आपले डोके कुठलेही मद्यप्राशन न करता अकारण भणभणत

होते. त्याच वेळेत असा काही अनुचित प्रकार आपल्या हातून घडवला गेला असेल काय, या विचाराने त्याच्या काळजाचा ठोकाच चुकला. तीच एक शक्यता होती. आता जास्त वेळ दडवण्यात अर्थ नव्हता, हे त्याने ताडले. त्याने ताबडतोब त्या सहलीला उपस्थित असलेल्या आपल्या सर्व स्त्री सहका-यांना फोन केला व त्यांची सहज विचारपूस केली.

सर्वजणी त्याच्याशी मनमोकळेपणाने बोलल्या पण एकीच्या बोलण्यातून त्याला तिच्यावरील तणाव जाणवला." तुझ्याकडून काय मागणी केली आहे त्याने ?" त्याने सरळ सरळ तिला हा प्रश्न विचारताच तीही भांबावली." कोणी? कशाबद्दल मागणी ?" तिने त्याच्यापासून लपविण्याचा किरकोळ प्रयत्न केला पण जेव्हा त्याने काही वेळापूर्वी घडलेल्या घटनेचा तपशील तिला दिला तेव्हा तिला ते मान्य करावेच लागले. खूप विचाराअंती मग त्यां दोघांनी एक महत्त्वाचा निर्णय घेतला. त्या निर्णयानुसार, दोन्ही कुटुंबे त्या संध्याकाळी एकमेकांना भेटली. त्यांनी पोलीसांकडे न जाता आपल्या जीवन साथीदारावरील अफाट विश्वासाच्या ताकदीवर त्या संकटाशी आपणाहूनच सामना करायचे ठरविले. विविध शक्यतांचा विचार केला गेला व सरतेशेवटी सार्वमताने एक योजना आखली गेली.

दुस-या दिवशी सकाळी ठरल्याप्रमाणे त्या माणसाने रमेशला कॉल केला. तो फोन रमेशच्या बायकोने उचलला. "मि. रमेश, घरी आहेत का ?" त्याने तिला विचारले. "नाही हो, ते बाहेर बॅंकेत गेलेत. तिथून आम्ही एकाला पैसे देण्यासाठी 'अबक' फार्मवर जाणार आहोत." तिने त्या फार्मचे नाव घेताच तो हडबडला. "म्हणजे तुम्हाला सर्व कल्पना आहे तर ?" आवंढा गिळत तो कसाबसा उद्गारला. "अहो मलाच काय, आमच्या सर्व कुटुंबियांना, त्या स्त्रीच्या कुटुंबियांना, इतकेच नव्हे तर त्या दोघांच्या ऑफिस मधल्या 'काही' खास सहका-यांनाही याची कल्पना आहे." तिचे हे वाक्य ऐकताच त्याने फोन खाडदिशी खाली ठेवला.

ज्या लोकांचा वापर करून रमेशला ब्लॅकमेल करायचे होते, त्यांना याची अगोदरच कल्पना असल्याने त्याचा प्लॅन पूर्णपणे चौपट झाला होता. सगेसोयरे एकत्र आल्याने रमेशचे आपण काहीच वाकडं करू शकत नाही ह्याची त्याला कल्पना आली होती. त्याने रमेशच्या स्त्री सहकारणीला फोन लावला. तो तिच्या नव-याने उचलला. रमेशच्या बायकोसारखे त्यानेही त्याला तेच उत्तर देताच त्याच्या रागाचा एकदम भडका ऊडाला. आपले दोन्हीही 'कस्टमर' आपल्या हातातून निसटले आहेत याची त्याला खात्री पटली. तिथे त्या दोन्ही कुटुंबियांनी हसतखेळत, तणावमुक्त दिवस व्यतीत केला .

# पेरणी...

**--- ॲलेक्स मच्याडो, 7208161213**

सेल्समनने बिलींगचे सगळे सोपस्कार पूर्ण केले आणि लॅपटॉप सचिनच्या हातात दिला. लॅपटॉप हातात धरताना सचिनचा चेहरा आनंदाने ऊजळून निघाला होता. स्वतःचा लॅपटॉप ही कल्पनाच किती सुखद वाटत होती.

'काँग्रेट्स सचिन'. त्याच्या चेहेऱ्यावरचा आनंद टिपत अनिल म्हणाला. अनिल सचिनचा अगदी जिवलग मित्र. कोठेही जाताना दोघंही एकत्र असत. सचिन मनापासून हसला. खरंच खूप खूष होता तो आज.

सचिन एका गरीब कुटुंबातला मुलगा. अतिशय हुशार. बाबा एका छोट्या कंपनीत कामाला. तुटपुंजा पगार. तीन माणसांचं कुटुंब. आई सुध्दा पडेल ते काम करून त्यांना थोडासा हातभार लावायची. मुलाच्या शिक्षणासाठी मात्र ते काही कमी पडू देत नव्हते. आपल्या ह्या हुशार मुलाचा त्यांना मोठा अभिमान वाटे. माझा मुलगा इंजिनियरिंग करतोय हे किती अभिमानाने सांगत ते लोकांना. सचिनला देखील ह्या सर्व गोष्टींची कल्पना होती. तो देखील अनावश्यक खर्च टाळत असे. बऱ्याच वेळेला तो मित्रांची आणि लायब्ररीची पुस्तकं वाचूनच अभ्यास करी. त्यामूळेच जेव्हा कॉलेजमध्ये सरांनी सगळ्यांना स्वत:चा स्वतंत्र लॅपटॉप आणायला सांगीतलं तेव्हा तो खूप अस्वस्थ झाला. एवढे पैसे आपल्या आवाक्याबाहेरचे आहेत हे त्याला ठाऊक होते. कुणाचा तरी वापरलेला लॅपटॉप मिळाला कमी किंमतीत तर बघू या असं त्याने मनात ठरवलं.

संध्याकाळी तिघांचं जेवण चाललं होतं. पण त्याचं लक्ष जेवणाकडे नव्हतं. आईबाबांना लॅपटॉपविषयी कसं सांगावं हाच विचार घोळत होता त्याच्या मनात .

'सचिन काय झालंय? कॉलेजमध्ये काही घडलंय का?'

त्याच्या मनातली बेचैनी नेमकी ओळखून बाबांनी त्याला विचारलं. आई सुध्दा त्याच्याकडेच पाहात होती .

'काही नाही बाबा...तसं विशेष काही नाही.'

थोडं थांबून तो पुढे म्हणाला

'आम्हाला स्वत:चा स्वतंत्र लॅपटॉप आणायला सांगीतलं आहे कॉलेजने.'

'मग?' आईच्या बोलण्यात काळजी आणि असहाय्यता जाणवत होती.

'काही नाही गं. मी चौकशी करतो. सिनीअर्सकडून मिळेल मला सेकंडहँड. कमी किंमतीत.'

बाबा ऐकत होते.

'सचिन चांगल्या कंपनीचा नवीन लॅपटॉप कितीला मिळतो?'

'खूप महाग असतो बाबा. नाही परवडणार आपल्याला. मला चालेल वापरलेला. करेन मी त्याच्यावर अभ्यास...'

'तरी पण...'

'बाबा चांगल्या ब्रँडेड कंपनीचा लॅपटॉप चाळीस हजाराच्यावर...'

'अरे बापरे...' आईची पुन्हा असहायता...

बाबा डोळे मिटून बसले. जणू कसला तरी हिशोब चालला होता त्यांचा मनातल्या मनात.

'सचिन एक काम कर.' थोड्या वेळाने डोळे ऊघडून ते म्हणाले 'चांगल्या लॅपटॉपची किंमत काढ. बघू या आपण.'

'अहो पण'.....'

'बाबा खरंच मी...'

'हे बघ, तुझ्या शिक्षणाच्या बाबतीत कसलीही तडजोड नाही.'

संध्याकाळी सचिनने अनिलला सोबत घेतलं. दोन तीन ठिकाणी चौकशी केली. शेवटी एका दुकानातून त्यांनी कोटेशन घेतलं. चाळीस हजार तीनशे पन्नास रूपयांचं. हे आपल्यासाठी अशक्यच ह्याची त्याला कल्पना होती. बाबा कामावरून आल्यानंतर सचिनकडून कोटेशन घेतलं, बघीतलं. काहीच न बोलता सचिनच्या पाठीवर थोपटल्यासारखं केलं आणि खोलीत निघून गेले.

दुसऱ्या दिवशी बाबा कामावर न जाता घरीच थांबले. सकाळी ते बाहेर जाऊन दुपारी जेवायच्या वेळेस परतले. संध्याकाळी पुन्हा ते बाहेर निघाले तेव्हा आईने त्यांना विचारण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यानी हातांनीच 'नंतर सांगतो' असा इशारा केला आणि गडबडीतच घराबाहेर पडले.

संध्याकाळी उशीरा सचिन घरात पोहोचला तेव्हा बाबा जणू त्याची वाट पहात असल्यासारखे ओटीवरच ऊभे होते. सचिनला बाबांना पाहून बरं वाटलं. एवढ्या लवकर बाबा कधी दिसायचे नाहीत घरी. त्यांच्याकडे हसून पाहात सचिन आत गेला. बाबा देखील आले त्याच्या पाठोपाठ. बाबांनी टेबलावरचं एक पाकिट उचललं आणि त्याच्यासमोर धरलं. सचिनला कळेना हे काय चाललंय.

‘उघडून बघ.' बाबा म्हणाले.

एव्हाना आई सुध्दा येऊन ऊभी राहिली होती त्याच्या बाजूला. सचिनने मोठ्या उत्सुकतेने ते पाकिट ऊघडलं. आतमध्ये त्याने काल आणलेलं लॅपटॉपचं कोटेशन आणि त्यालाच पिनने जोडलेली बँकेची पे ऑर्डर होती चाळीस हजार तीनशे पन्नास रूपयाची,त्या डीलरच्या नावाची.

‘थँक्स बाबा, थँक यू व्हेरी मच' सचिनचे डोळे पाणावले होते.

‘चल सचिन.निघायचं ना?' अनिलच्या शब्दांनी तो भानावर आला.

बोलत बोलतच ते जवळच असलेल्या सनील ऑटोमध्ये पोहोचले. अनिलला नवीन ॲक्टीव्हा घ्यायची होती.

'व्हाईट कलर मध्ये मिळेल का?' जुजबी चौकशी केल्यानंतर अनिलने मालकाला विचारले.

'खरं म्हणजे व्हाईट कलर लगेच नाही मिळत. पण तुमचं नशीब चांगलं आहे. कालच एक बुकींग कँसल झालं. ती गाडी तुम्हाला मिळेल.' असं म्हणत त्यांनी पुढ्यातलं रजिस्टर उघडलं आणि एका ठिकाणी बोट ठेवून म्हणाले ' हे बुकींग कँसल झालं'

सचिनने सहजच ते नाव वाचलं..

‘विनायक पाटील’

त्याने परत परत ते वाचलं.

‘विनायक पाटील’

बाबा?

लॅपटॉपच्या बिलावरचं त्याचं नाव त्याच्या डोळ्यासमोर दिसू लागलं...

सचिन विनायक पाटील

बाबांनी बुक केली होती ही गाडी? किती महीने अगोदर केली असेल? पांढरा रंग बाबांचा खूप आवडता..

सचिनला गहिवरल्यासारखं झालं. त्याला आठवलं गेल्या दोन रविवारी बाबा त्यांच्या मित्राच्या गाडीवर बसून समुद्राच्या दिशेने गेले होते. आईने विचारलं तेव्हा लहान मुलासारखा, आहे आमची एक गम्मत, असा चेहरा करून निघून गेले. टिव्हीवर स्कुटरची जाहिरात लागली की अलिकडे ती मन लावून पहाणारे बाबा त्याला आठवले, वर्तमानपत्रातल्या गुळगुळीत पानावरील स्कुटरच्या जाहिरातीचं पान बाबांच्या बेडवर पाहील्याचं त्याला आठवलं.

बाबा कामाला जाण्यासाठी सायकलचाच वापर करीत. कधी कधी संध्याकाळी त्यांचा शर्ट घामाने भिजून गेलेला असे, दमल्यासारखे वाटत ते. किती वर्षांपासूनचं त्यांचं स्वप्न असेल स्कुटर घेण्याचं....

आपल्या मित्रांच्या बायका मोटरगाडीतून फिरताना पाहून आपल्या बायकोची पायपीट आपण थांबवू शकत नाही ही खंत त्यांचं मन खात असेल का? मित्राबरोबर प्रॅक्टीसला जाताना घरी अचानक सरप्राईज देण्याचं स्वप्न त्यांनी रंगवलं असेल?

किती छोटं स्वप्न....

किती वर्षाचं स्वप्न....पुन्हा एकदा दाबून टाकलं त्यांनी...माझ्यासाठी...त्यांच्या मुलाच्या भवितव्यासाठी....

सचिनचा ऊर भरून आला आपल्या बाबांविषयीच्या अभिमानाने आणि डोळे ओले झाले त्यांच्या त्यागामूळे...

हातात धरलेल्या लॅपटॉपवर नकळत त्याची बोटं आवळली गेली. जणू तो बाबांचा हात घट्ट पकडून त्यांना सांगत होता...

बाबा मी करेन पूर्ण तुमचं स्वप्न. हे माझं वचन आहे तुम्हाला ...

# "तणाव-मंद मारक"

**--- डॉ. सिबल डिब्रीटो, उमराळे**

आपण किती वेळा 'तणाव' (stress) हा शब्द वापरतो? आजकाल हरएक व्यक्ती तणावाखाली वावरत असल्याचे जाणवते, मग तो गॅरेज मधील कामगार असुदे किंवा बहुदेशीय उद्योग संस्थेचा मालक असुदे, तणावग्रस्त होण्यापासून कोणीही वाचलेला नाही, परंतू आपल्याला याबद्दल विशेष कल्पना नसते की हा दैनंदिन जीवनातील तणाव दीर्घकाळच्या मुदतीत आपल्या आरोग्यावर कसा परिणाम करीत असतो.

अंतरजालावर (internet) माझ्या नजरेत आलेली एक पाहाणी, हे पाहण्यासाठी केलेली होती की, आपली भाषा व शब्दसंपदा प्रगतीशील वर्षात कशी उत्क्रांत होत गेली आहे. ज्या गोष्टीने माझे विशेष लक्ष वेधले ती म्हणजे आजच्या युगात जास्तीत जास्त वापरात असलेल्या शब्दांची यादी. मी खरोखर विचारात पडते कारण, त्या यादीतील शब्द काही अश्या प्रकारे होते - तणाव(stress), विफलता(frustration), चिंता(tension). हे सत्य आहे. कदाचित पन्नास वर्षांपूर्वी तणाव(stress) हा फार क्वचित वापरला जाणारा शब्द होता. पण आज शाळकरी मुलांपासून मोठ्या माणसापर्यंत प्रत्येकजण तणावाखाली असलेला जाणवतो.

गॅरेज मधील कामगार चिंतेत असतो तसाच बहुदेशीय उद्योगसंस्थेचा मालक देखील असतो. तणावापासून कोणीही बचावलेला नाही, परंतू हा तणाव दीर्घकालीन मुदतीत आपल्या आरोग्यावर कसा परिणाम करतो ह्याबद्दल आपल्याला खूपच थोडकी माहिती असते. तणाव ही एक मानसिक स्थिती असते जी विशिष्ट बाह्य परिस्थितीच्या नकारात्मक आंतरीक परिणामांमुळे उद्भवते. ह्याचा परिणाम मनावरच नाही तर शरीराच्या प्रत्येक भागांवर होतो. औद्योगिक क्रांतीच्या कालखंडात तणाव(stress) हा सामान्य गोष्ट बनला, जेव्हा माणसाने यंत्रांसोबत काम करण्यास सुरुवात केली व हातांचा वापर कमी कमी होत गेला, उत्पादन वाढले व त्याचबरोबर आक्रमक बाजारपेठीय क्लुप्त्या व त्यासोबत आली स्पर्धा.

माणसाने आपले जीवन सुखकर करण्यासाठी नाविन्यपूर्ण व गतीशील साधने विकसीत केली, परंतू नंतर तो हे विसरून गेला की, ती सर्व त्याचे जीवन निकृष्ट करण्यासाठी नसून ते अधिक उत्कृष्ट करण्यासाठी होती. आपण एक उदाहरण पाहूया - एका तरुण माणसाने इतरांच्या सुखसोईंनी संपन्न जीवनाकडे पाहीले. त्याने पैसे कमविण्यासाठी खूप कष्ट व मेहनत करण्यास सुरुवात केली. दिवसांगणीत काम वाढत गेले त्याचसोबत सुखसोई देखील वाढल्या. परंतू बेमालूमपणे एक विचित्र गोष्ट घडली; चांगले भोजन घेण्याऐवजी त्याला भोजन घेण्यासाठी सवड मिळेनाशी झाली. कामाच्या दाबाने त्याला स्वत:च्या शरीराकडे दुर्लक्ष करायला लावले. अन् ह्याचा परिणाम असा झाला की, त्याचे आरोग्य खालावत गेले. तो आपल्या कुटुबासोबतही वेळ घालवू शकत नव्हता.

गावामध्ये आपल्या मित्रांसोबत खेळणे, ह्या सारख्या त्याला आनंद देणाऱ्या गोष्टी त्याने मागे सोडल्या व तो काम आणि कामच करीत राहिला. तो निसर्गासोबत काही क्षण विश्रांतीसाठी देखील सवड काढू शकला नाही. शेवटी त्याला विश्रांती घेण्यास व आपल्या आयुष्याचे अवलोकन करण्यास सवड मिळाली; परंतू दुर्दैवाने तो त्यावेळी हृदयरोगाच्या उपचारांसाठी रुग्णालयाच्या अतिदक्षता कक्षात(I.C.U.) दाखल झालेला होता. तेव्हाच त्याला जाणीव झाली की, इतक्या सरलेल्या वर्षांत तो किती झिजून गेला होता. ह्या गोष्टीमध्ये कुठे तरी तुम्ही स्वत:ला पाहत आहात का? असे कधी

घडले आहे का की, तुम्ही आपल्या प्रिय व्यक्तीवर रागवलात व नंतर तुम्हाला त्याची जाणीव झाली? तुम्ही डोकेदुखी, अस्वस्थता, पाठदूखी अश्याप्रकारच्या अनाकलनीय लक्षणानी ग्रस्त आहात का? तुम्ही सकाळी उठता तेव्हा तुम्हाला ताजेतवाने व प्रसन्न वाटते, किंवा मग तुमची सकाळची पहिली प्रतिक्रिया नकारार्थी असते? जर तुमच्याकडे वरील प्रश्नांसाठी उत्तरे असतील तर तुम्हाला कृती करण्याची गरज आहे. तुम्ही रुग्णालयात जाऊन पोहोचण्यापूर्वी कृती करा. तणाव कसा हाताळावा, हे जाणून घेण्यापूर्वी तणाव म्हणजे काय, तो आपल्यावर कसा परिणाम करतो हे आपण समजून घेतले पाहिजे.

आपण अनेक कारणांमुळे तणावग्रस्त असतो; आपल्या नोकरीधंद्यामुळे, नातेसबंधामुळे व आपल्या हाताबाहेर असलेल्या परिस्थितीमुळे. आपल्याला माहीत आहे की, वेगवेगळ्या व्यक्ती वेगवेगळ्या परिस्थितीत वेगवेगळ्या प्रकारे प्रतिसाद देतात. त्याचप्रमाणे काही व्यक्तींचा मूळ स्वभाव तणावात राहण्याचा असतो. ते सतत सांसारिक विवंचनांबद्दल विचार करीत राहतात, व तणावग्रस्त होतात.

ह्या व्यक्ती 'प्रकार-अ'(Type-A) ह्या व्यक्तिमत्व प्रकारात मोडतात. तणावाशी निगडीत व्याधी जडण्याची शक्यता त्यांच्यात अधिक असते. काही तणाव निर्माण करणाऱ्या गोष्टी पुढीलप्रमाणे आहेत - असुरक्षिततेची भावना, परिस्थिती आटोक्यात ठेवण्यातील असमर्थता, पुर्वग्रहदुषीत स्वभाव, अपुऱ्या राहिलेल्या अपेक्षा, भावना व्यक्त करण्यातील असमर्थता, धक्कादायक परिस्थिती, स्वकेंद्रीत स्वभाव. तणाव, जी एक मानसिक स्थिती आहे, ती शारीरिक स्थितीवर तुलनात्मक परिणाम करते. शास्त्रीय तणावग्रस्त परिस्थितीमध्ये आपल्या शरीरात विशिष्ट प्रकारची 'तणाव संप्रेरके'(stress hormones) उत्पन्न होतात. ज्यामुळे हृदयाच्या ठोक्याची गती वाढणे, घाम येणे, अस्वस्थता, लघुशंका ह्या गोष्टी होतात. जठराचे कार्य अनियमित होणे, मज्जारज्जेवर दुष्परिणाम ही देखील तणावाची प्राथमिक लक्षणे आहेत.

# शोध, हरवलेल्या हाकेचा...

**--- फ्रँक मिरांडा, उमराळे, जोसघर**

नाताळ अगदी काही दिवसांवर ठेपला होता. नेहमीप्रमाणे माझ्या आवडत्या ठिकाणी माझी गाडी पोहचली. धर्मभगिनींना शुभेच्छा देत मी वृद्धाश्रमाच्या आवारात प्रवेश केला. मिणमिणत्या केविलवाण्या लोचनात शक्य तितका परिसर न्याहाळताना वटवृक्षाच्या पायथ्याशी बसलेल्या वृध्देला पाहताच उन्हाने लटपटणारे माझे डोळे समांतर दिशेने तिच्यावर स्थिरावले.
निखळलेले दात, सफेद केस साधारण सत्तरीतील एक आजी माझ्यावर एकटक पाहत होती. तिच्या दीनदयाळ चेहऱ्यावर पाहून माझे नाजुक हृदय फार कळवळले. क्षणाचाही विलंब न करता माझी पाऊले तिच्या दिशेने चालू लागली.

"आई कशा आहात"?

विचारलेल्या प्रश्नावर अपेक्षित उत्तराऐवजी त्या आजीच्या ओथरलेल्या आणि काठोकाठ भरलेल्या नयनातील खाऱ्या पाण्याने वाट अनपेक्षितपणे मोकळी केली.
पिडीत जीवाच्या विवंचनांमध्ये भर घालण्याचे टाळून मी मायेने तिला कवेत घेतले. मागील १३ वर्षे 'आई ' ह्या शब्दासाठी ती व्याकुळलेली होती, अधिर होती. तिचे थरथरते ओठ बोलत होते, ‘आज मी धन्य झाले. १३ वर्षापासून एकाकी जीवन जगताना पोटचा मुलगा असूनही मला पाहण्यासाठी क्वचितही फिरकला नाही. नाताळ सणाला माझ्यासाठी पैसे पाठवतो परंतु मला दोन मिनिटे देण्याची तसदी मात्र तो घेत नाही. आजीचे एक-एक शब्द ऐकताना नकळत चटकन माझ्याही डोळ्यात अश्रु तरळले.
"स्वामी तिन्ही जगाचा, आई विना भिकारी" हा थोर विचार सद्यपरिस्थितीत निबंधापुरताच मर्यादित राहिला, कालांतराने हीच पिढी आई-वडीलांना वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवत आहे.
९ महीने गर्भात वाढवून, हालअपेष्टा सहन करून जन्माला घातलेले मुल २५-३० वर्षापर्यंत वाढवणाऱ्या आईला ते कधीच ओझं नसते परंतु, तीच आई म्हातारपणी आजच्या पिढीसाठी ओझं बनत आहे.
हा शिक्षणाचा अभाव म्हणावा की अतिशिक्षणाचा प्रभाव..??
सुशिक्षित, गर्भश्रीमंत आणि आरामात वावरणारी आजची पिढी स्वत:च्या आईवडीलांना मात्र परक्याप्रमाणे वागणूक देते.

स्वत:चा मुलगा असूनही मागील १३ वर्षे आई ह्या हाकेसाठी व्याकुळलेल्या एका मातेची " व्यथा " मी समजू शकलो. आपल्या सहवासाने आणि मायेने जर इतरांच्या जीवनात आनंदाची सर येत असेल तर यापेक्षा मोठा नाताळ सण साजरा करावा तो कसा???
भाग्यवान समजतो मी स्वत:ला जेथे मिळाली मला संधी एका निस्तेज आजीच्या चेहऱ्यावर 'आई' पुकारून स्मितहास्य निर्माण करण्याची.

# ऋणानुबंध

**--- ख्रिस्तोफर रिबेलो**

लोकल ट्रेन नालासोपारा स्टेशनात पोहोचली, सिझर ट्रेनमधून उतरून मधल्या एक्झिटमधून बाहेर एस. टी. डेपोत आला. डेपोत असलेल्या बाइक पार्किंगच्या दिशेने चालू लागला. आज तो एक ट्रेन अगोदर आला होता. त्याची नजर सहजच डाव्या बाजूला वळली,

“अरे, हा तर तिचा नवरा”… तो बाईकवर कोणी तरी येण्याची वाट बघत बसलेला होता.

“हम्म… तो तिच्यासाठीच तर थांबला नसेल?” सिझरच्या चेहऱ्यावर स्मित झळकले, म्हणजे आज तिचे दर्शन होणार!

एरवी डेपोतील पार्किंगमधून बाइक बाहेर काढायची घाई करणाऱ्या ह्याच्या आज हालचाली मंदावल्या होत्या, बाइक बाहेर काढत असताना ती ह्याला त्याच्या मागे बसलेली पाठमोरी दिसली. थोडासा हिरमुसला हा, तिचा चेहरा दिसलाच नाही, कितीतरी वर्षानी आज ती दिसली होती पण.......

आपल्या बाईकला किक मारून सिझर निघाला.. थोड्याच अंतरावर त्याने त्यांना गाठले.. एक बाईक आणि ऑटोनंतर हा होता.. तिचा नवरा नॉर्मल स्पीडमध्ये बाईक चालवत होता.. तिचा चेहरा बघण्यास हा आतुर झाला होता.. “पलट.. पलट.. एकदा तरी मागे बघ ग..” तिच्या मागे बघण्याच्या अपेक्षेने हा पुटपुटत होता..

समोरून एक तरुण स्पोर्ट्स बाईकवर वाऱ्याशी स्पर्धा करत भरधाव येत होता.. त्याने एक्सरलेटर रेझ केल्याचा आवाज दुरूनसुद्धा ऐकू येत होता..

“साली आजकालची ही टिनएजर्स पोरं म्हणजे ना.. सुपरसॉनिक बाईकबरोबर जणू सुपरमॅन झाल्यासारखे सुसाटलेत… साला… काय ही वेगाची नशा.. अरे जा ना निर्जन रस्त्यावर, करा तिकडे वाऱ्याशी स्पर्धा, घ्या त्या नशेचा आनंद… इथे मेन रोडवर कशाला शर्यत खेळताय?, नॉनसेन्स रॅश ड्रायविंग?” सिझर विचार करत मनातल्या मनात चरफडत होता..

एका मोठ्या आवाजाने तो विचारांच्या तंद्रीतून बाहेर आला, समोर त्या तरुणाचा त्याच्या बाईकवरील ताबा सुटला होता आणि ती सुपरसॉनिक स्पोर्ट्स बाईक नेमकी त्यांच्या बाईकवर येवून आदळली होती. काही कळायच्या आत ते दोघे जमिनीवर आपटले होते, तिचा नवरा… त्याच्या डाव्या पायाचा तळवा सांध्यातून निखळला होता, त्याने पाय हातात धरला होता आणि तो तळवा लीटरली पेंडुलमसारखा लोंबकळत होता.

सिझरचे लक्ष तिच्याकडे गेले, पडताना डाव्या मनगटावर पूर्ण शरीराचा भार पडल्यामुळे तिचा डावा हात फ्रॅक्चर झाला होता, डावे मनगट सुजले होते आणि त्याचा आकार कर्वशेपसारखा झाला होता,. बाईक बाजूला पार्क करत सिझर त्या दोघांकडे धावला, समोरून येणाऱ्या एका रिक्षावाल्याला थांबवून त्याच्या मदतीने प्रथम तिच्या नवऱ्याला उचलून त्याने रिक्षात बसविले आणि नंतर तो तिच्याकडे आला, ती वेदनांनी कळवळत होती, प्रथम तिला स्पर्श करायला सिझर संकोचला परंतू परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्याने तिच्या खांद्यावरची ओढणी घेवून तिच्या मानेभोवती गुंडाळली, पटकन तिचा हात त्या ओढणीत अडकवला, तिच्या चेहऱ्यावरून त्याच्या ह्या कृतीमुळे तिला थोडे रीलॅक्स वाटत असल्याचे त्याला जाणवले, बाजूला उभ्या असलेल्या एका स्त्रीला मदतीसाठी बोलवून त्याने तिलाही अलगद रिक्षात

बसवले, तिचा स्पर्श होताच त्याला त्याच्या शरीराची थरथर स्पष्ट जाणवली... त्यांच्या बाजूला बसत त्याने रिक्षावाल्याला रिक्षा सरळ हॉस्पिटलला घ्यायला सांगितली.

"अरे भाई, रिक्षा सीधा मेन एंट्रेन्स डोअरके सामने लेना..." हॉस्पिटलच्या आवारात शिरताच सिझरने रिक्षावाल्याला सूचित केले आणि मग त्याच्याच मदतीने कॅज्यूअल्टी विभागामध्ये दोघांना अॅडमिट करून घेतले. रिक्षात असतानाच त्याने तिच्या नवऱ्याकडून घरचा फोन नंबर घेऊन घरी अॅक्सिडेंट झाल्याचे आणि सिटी हॉस्पिटलमध्ये घेवून जात असल्याचे कळवले होते

"एक्सक्यूज मी, अॅक्सिडेंटवाल्या त्या दोन पेशंटना इथे अॅडमिट करणारे तुम्हीच का?", कॅज्यूअल्टीबाहेर डॉक्टरांची वाट पाहत उभ्या असलेल्या सिझरला पाठीमागून आवाज आला.

एक नर्स त्याला शोधत आली होती. "तुम्ही यांचे नातेवाईक आहात का?, त्याच्या पायाच्या घोट्याचे आणि तिच्या मनगटाचे ताबडतोब ऑपरेशन करावे लागेल, तुम्हाला इमिडियटली १००००/- रुपये डिपॉजिट भरावे लागतील, ह्या कनसेंट फॉर्मवर सही करा. आणि हो… हॉस्पिटलने अपघातग्रस्त रुग्ण म्हणून MLC (मेडिको लिगल केस) केलेली आहे. कॉन्स्टेबल आले आहेत त्यांना भेटा"

"सिस्टर, मी ह्यांच्या घरी फोन करून कळवले आहे, घरची मंडळी थोड्याच वेळात येतील, मी डिपॉजिट भरतो, बाकी सोपस्कार ते आले की करतील, तुम्ही ऑपरेशनची तयारी करा." सिझर एटीएममधून पैशे काढण्यासाठी हॉस्पिटलबाहेर आला.

"कॉन्स्टेबलसाहेब, त्या मुलाला जरा दम देवून सोडून द्या, उगाच त्याच्या आयुष्याला पोलिसी खाक्याचा डाग लागू देऊ नका आणि ह्या दोघांनाही अजिबात त्रास न होईल ह्याची कृपया काळजी घ्या" सिझरने अॅक्सिडेंटचे डिटेल्स हवालदाराला सांगत जरा कडक शब्दात विनवणी केली.

तिचा दीर आणि भाऊ एव्हाना हॉस्पिटलमध्ये आले होतेआणि त्यांनी डिपॉजिटचे १००००/- रुपये भरलेही होते. सिझरला अचानक आठवण झाली, आपण इथे आल्याचे आपल्या घरी अजूनही आपण सांगितलेले नाही, त्याने खिशातून मोबाइल काढला, त्याची बायको, स्वीडलचे पाच मिस्ड कॉल्स होते आणि व्हॉटसअपवर ३-४ मेसेजेससुद्धा आले होते. मुलीच्या फर्स्ट होली कम्युनियनच्या ड्रेसचे आज मेजरमेंट द्यायचे होते, त्या दोघींना घेऊन टेलरकडे जायचे ठरले होते. त्याने तिचा नंबर डायल केला, सुरूवातीला तिची बोलणी खाऊन पण नंतर अपघाताची माहिती देत थोड्याच वेळात घरी येत असल्याचे त्याने सांगितले.

बऱ्याच प्रतिक्षेनंतर दोघांचेही ऑपरेशन यशस्वी झाल्याचे ऑपरेशन थिएटरबाहेर आलेल्या डॉक्टरांनी सांगितले आणि वेळेवर दोन्ही पेशंट्सना हॉस्पिटलमध्ये आणणाऱ्या सिझरचे खास कौतुक केले. डॉक्टरांनी विचारले, "तुमचे रिलेटीव्ह का?

"अं... हो... दूरच्या नात्यात आहे" सिझर क्षणभर गडबडला पण पटकन म्हणाला. त्याने घड्याळात पाहिले, बराच उशीर झाला होता, त्याला घरी जायचे होते.. "डॉक्टर, आम्ही पेशंट्सना भेटू शकतो का?" त्याने डॉक्टरांकडे आत जायची परवानगी मागितली.. "जरूर, पण जास्त वेळ नाही"

आजूबाजूच्याच कॉटवर दोघांना ठेवण्यात आले होते. तिच्या नवऱ्याची ग्लानीमुळे झोप लागली होती. पण ती जागी होती. दोघांची नजरानजर झाली. तिच्या डोळ्यात कृतज्ञतेबरोबर काही विशिष्ट भाव दिसत होते. क्षणभर तोही त्यात

गुंतला गेला, त्याने मंद स्मित करत तो जात असल्याचे सांगत तिने आराम करावा असे खुणेनेच सूचित केले आणि तो हॉस्पिटलमधून घरी येण्यास निघाला. बाईकला किक मारल्याबरोबर तो आठवणींच्या दुनियेत शिरला..

सिझर त्यावेळी अकरावीला होता. वसईला कॉलेजला जाण्यासाठी नाक्यावरून तो इतर कॉलेजियन्सप्रमाणे सकाळची “कॉलेज स्पेशल” बस पकडत असे, घरून पायी चालत यायचं–जायचं असं रोजचं रुटीन झालं होतं. आणि एक दिवस सकाळी कॉलेजला जात असताना ती त्याला समोरून येताना दिसली. ती दहावीला होती आणि सकाळच्या एकस्ट्रा क्लाससाठी ती लवकर शाळेत जात होती. उजाडण्याअगोदरच्या त्या काळोखात तिच्या घाऱ्या डोळ्यातील तेजाने तो दिपून गेला. आणि मग रोजचा नजरेचा खेळ सुरू झाला.. कधी सिझर तर कधी ती... एकमेकांच्या कडे पाहणे आणि मग पटकन दुसरीकडे नजर फिरविणे… पण तितकेच..

पावसाळ्यातील एक दिवस, सिझर घरून कॉलेजला जाण्यासाठी निघाला, अर्ध्या रस्त्यात असताना पाऊस सुरू झाला, छत्रीबाबत वेंधळा असलेला तो आज परत छत्री घ्यायला विसरला होता, पाऊस धो-धो कोसळू लागला होता, कोणी आल्यास त्याच्या छत्रीतून निदान स्टॉपवर जाता येईल असा विचार करत तो एका झाडाखाली थांबला, ती समोरून येत होती, तिने सीझरला भिजत झाडाखाली उभे असलेले पाहिले. त्याला क्रॉस करून ती पुढे गेली पण अचानक मागे वळून त्याच्या जवळ आली.

“मे तुला स्टॉपवर होडते सल, मग मे जायने” आजपर्यंत मुकी ओळख असलेल्या दोघांच्या संभाषणाला तिने सुरुवात केली होती. पाऊस एवढा जोराचा पडत होता की समोरचे काही दिसत नव्हते. सीझरने होकारार्थी मान हलवली आणि तो तिच्या छत्रीखाली आला. दोघांना एकमेकांचा स्पर्श होत होता आणि दोघेही मग अंग चोरत होते. स्टॉपवर पोहोचेपर्यंत दोघांच्या तोंडून एकही शब्द निघाला नाही. पोहोचल्यावर तो तिला “थॅंक्यू” म्हणाला आणि ती परत वळली.

पुढच्या वर्षी दहावी झाल्यावर तीही त्याच कॉलेजमध्ये आणि सेम रुटीनने येवू लागली, मग घरून लवकर निघणे, बसमध्ये गर्दीत पकडलेली जागा तिला देवून उभा राहणे हे रोज होवू लागले. पण त्यापलीकडे त्यांची ही “लवस्टोरी” मुकीच राहिली होती.

कॉलेज पूर्ण होवून सीझरला जॉबला जाऊ लागला. चर्चच्या युवा संघटनेचा “ॲक्टिव” सदस्य असलेल्या सीझरने या वर्षी “युवा उत्सवाची” अभिनव कल्पना मांडली होती आणि ती सर्वांनी उचलून धरत त्याला संघटनेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी दिली होती. युवक-युवतींच्या सर्वांगीण कलागुणांना वाव मिळावा म्हणून स्पोर्ट्स, नाट्य, गायन, लेखन आदी वेगवेगळ्या स्पर्धा, त्यात नावीन्यपूर्ण प्रकारांचा समावेश आणि त्याचबरोबर उत्तम वक्ते बोलावून व्यक्तिमत्व विकास, करियर गायडन्स, तरुण मुलांतर्फे चर्च पातळीवर प्रथमच स्मरणिकेचे प्रकाशन आणि त्यातही “innovative ideas” असलेले लेख, माहिती यासारख्या अनेक कार्यक्रमांची भट्टी त्याने जमवून एक हाती संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करून युवा संघटनेला एक नवीन झळाळी आणली होती, संपूर्ण पॅरिशभर त्याच्या नावाची चर्चा होत होती. आणि... हाच तो काळ, ज्यावेळी तिच्या मनाने सीझरच्या नावावर शिक्कामोर्तब केले होते.

पण...... पुण्याला राहणारी तिची थोरली बहीण घरी आली आणि तिच्या लग्नाची बोलणी सुरू झाली. पटापट काही हालचाली झाल्या, आणि अचानक ती आता सीझरची नजर चुकवू लागली, महिन्याभरात तिचे एंगेजमेंट आणि त्याच वर्षाअखेर लग्नही झाले. सीझरला खुप वाईट वाटले. पण वेळीच सगळे विसरत त्याने स्वत:ला सावरले. दोघांची कॉमन मैत्रीण असलेल्या प्रियाने त्याला नंतर माहिती दिली होती, घरच्या गरीब परिस्थितीमुळे आलेल्या ‘निरोपा’ला होकार देऊन तिला मार्गी लावले म्हणजे बहिणीची जबाबदारी संपणार होती, मग शाळेत असलेल्या लहान भावाचे नंतर बघता येईल अशी त्यांची योजना होती. त्या प्रमाणे ती मार्गी लागली होती, प्रियाला ती म्हणालीही, तो माझ्या जीवनाचा

मी योजिलेला राजकुमार होता पण त्याने कधी आपल्या भावना व्यक्त केल्या नाहीत अन मी वाट पाहत राहिले आणि शेवटी परिस्थितीला शरण गेले.

तीन भावंडांतील ती मधली, मुंबईला माल घेऊन जाणाऱ्या वडिलांचे काविळीचे निमित्त होऊन ती १० वर्षाची असतानाच अकाली निधन झाले होते, बहीण त्यावेळी कॉलेजला होती, आई घरची शेती करत मुलांना वाढवत होती, ओढाताणीचे ते दिवस होते, त्यामुळे बहिणीने कॉलेज संपल्याबरोबर नोकरी धरली होती आणि लहान दोन्ही भावंडांची जबाबदारी स्वत:च्या खांद्यावर घेतली होती. तिनेही बारावी झाल्यानंतर डी. एड. करून शिक्षिकेची नोकरी पत्करली होती. बहिणीचे यजमान नोकरीनिमित्त पुण्याला असल्यामुळे हे कुटुंब स्थिरस्थावर करून जाणे तिला गरजेचे वाटले होते आणि जवळ येऊ पाहणारे दोन जीव नियतीच्या उलट्या फेऱ्यामुळे त्यावेळी दूर केले गेले होते.

पण आज परत एकदा दोघांची गाठ पडली होती.. प्रसंग वेगळा होता, आयुष्ये चाकोरीत अडकलेली होती. आज इतक्या दिवसांनंतर आलेला पाऊस... सीझरला त्या दिवसाची आठवण देत होता.. कदाचित कधीच व्यक्त न झालेलं प्रेम ह्या पावसाला ठाऊक असावे का?... पण आज नवीन ऋणानुबंध जुळले होते. तिच्या डोळ्यातील ते भाव त्याची साक्ष होते...

**कविता / चारोळया :-**

# तुझ्या येण्याची तयारी

**--- स्व. सी. बी. दोडती, निर्मळ**

वाट पहाता पहाता
किती शिणलो भागलो
महिमा येता जवळीक
सज्ज स्वागता जाहलो

काय कथू राया सांग
मनी दाटला आनंद
तुजसाठी रे निर्मिला
पर्णकुटीचा प्रासाद.

शेणामातीचा मिळोनी
दिला तयावरी साज
गोठा गाईचा तुझा रे
फिका तया पुढे ताज !

चंद्रकराचा तयार
तुजसाठी रे पाळणा
मऊ गवताचे आसन
व्यर्थ तुला नजराणा

हंबरूनिया गातील
गाई वासरे अंगाई
तुला देती पांघरूण
घन मेघांची पडछाई

वेळू बांबूंच्या निर्मिल्या
भव्य कमानी झालरी
नच उरे दुजे काही
तुझ्या येण्याची तयारी

# मी ठेका घेतलाय काय ?

### --- सायमन मार्टिन,भुईगाव

गरज असेल तेव्हाच तोंड उघड
शक्यतो मौनच ठेव
मौनाने सर्व प्रश्न सुटतात
आपली इभ्रत वाटते
शत्रू वाढत नाहीत
मनशांती हरवत नाही

० ० ०

सडलेला, ओवाळून टाकलेला
भेटलाच वाटेवर
तर तोंड फिरूवू नकोस
खोटं खोटं हसायला शिक
हसण्याने डायबेटीस, ब्लडप्रेशर वाढत नाही
तब्येत बरी राहते

० ० ०

पायातली वाहण काढून
थोबाड फोडायला वाटते
असे अनेक जण
दिवसभरात भेटतात
ते भेटणारच...
ते भेटू नये म्हणून तू घरात
बसून राहू शकत नाही
रागाचा निचरा होण्यासाठी
मनातल्या मनात
चार दोन शिव्या हासड
मात्र चेहऱ्यावरचं हसू हरवू नकोस
नागाच्या शेपटीवर शक्यतो
पाय ठेवू नये
आपल्या येथे सरकारी दवाखाने
आणि स्मशानं यात फरक नाही

० ० ०

ज्यांना पाहून
रस्ता बदलावासा वाटतो
असे संत महंत

भल्या सकाळीच भेटतात
तू कदापी वाट वाकडी
करू नकोस
त्यांना बरोबर कळते
मनातल्या मनात देवाचं नाव घे
पांडुरंग भेटला असे समज
त्याला नमस्कार कर
रस्ते असेच सज्जनांनी भरून
वाहत आहेत
आपण कोणाकोणाला चुकवत राहणार

० ० ०

दररोज देवळात जात जा
देवळात गेल्याने
चालण्याचा व्यायाम होतो
लोक आपल्याला धार्मिक समजतात
बारमध्ये बसणाऱ्याला एक न्याय
देवळात जाणाऱ्याला दुसरा न्याय असतो
खरं पाहिलं तर
बारमध्ये बसणाराच देवच्या
अधिक जवळ असतो

० ० ०

नवीन काही लिहिलं का?
असं विचारल्यावर
वाण सामानाची यादी दाखव
कविता, कथा, लेख
कोणीही वाचत नाही
त्याऐवजी घरावर, दारावर, पाटीवर
असलीच तर गाडीवर
लेखक म्हणून बोर्ड लाव
वाचता येणारा चार दोन
शिव्या हासडेल
पण वाचता न येणाऱ्यांची संख्या
बेसुमार असते
त्यांना काहीच न समजल्यामुळे
भर रस्त्यात कुर्निसात घालतील

० ० ०

कुणीही, कुठेही
भाषणाला बोलावलं तर

नाही बोलू नकोस
पण भाषणात चुकूनही खरं बोलू नकोस
उद्या महापूर येणार आहे
परवा जगबुडी होणार आहे
तेरवा पृथ्वीचं वाळवंट होणार आहे
वृद्धाश्रमांची संख्या वाढणार आहे
मुलींची गर्भातच हत्या होणार आहे
शंभरात नव्याण्णव दलाल असणार आहेत
घरांचा,देवळांचा, शाळेचा,
माणसांचा बाजार होणार आहे
सौदा आत्म्याचा होणार आहे
असं बोलणं बंद कर
त्यामुळे समाजाचं पर्यावरण बिघडते

o o o

भाषणामध्ये चार दोन शेर
त्यावर प्रेम कवितेची फोडणी
दोनचार गोष्टी ऐकवल्या की
आपलं भाषण म्हणजे प्रवचन होते
त्यात संतांशी सलगी असली की
टाळ्यांच्या संख्येत वाढ होते
हातात चाबूक घेऊन
भर बाजारात
कपडे उतरवणाऱ्याला लोक
सुळावर चढवतात हे विसरू नकोस

o o o

एवढं सगळं झाल्यावरती
तू रस्त्यातून जाताना
एखादं मुकं जनावर
तुझ्याकडे बघून म्हणेल
तुला बोलायचं वरदान दिलेलं
तुला लिहायचं दान दिलेलं
तर तू मुका,आंधळा,
बहिरा का झालास ?
राग अनावर होऊन तो तुला
हिजडा म्हणेल
यावर तू तोंड वर करून सांग
बोलायचा आणि लिहायचा मीच
ठेका घेतलाय का?

# "सी.सी.टी.वी."

**---- कु. सबिना फोस (गास- वसई)**

हे सी.सी.टी.वी. कॅमेऱ्या,

काय ही तुझी किमया!

सगळंच ना पाहतोस तू?

मग अर्धंच कसं बरं सांगतोस?

पाहूनही डोळेझाक तू

अशी कशी बरे करतोस?

पाहीलंस त्या दिवशी आगगाडी

कशी गेली पुढे स्थानक सोडून!

कशी छान तू टिपलीस

डोळ्यांत तुझ्या!

अन् वॉट्सअप,फेसबूकवरून

दाखवलीही आम्हा सगळ्यांना

इतकी क्लिअर बरं,

तुझी पिक्चर क्वालिटी!

मग मला एक गोष्ट सांग भाऊ,

पुण्यातल्या त्या भल्या सकाळी

त्या नरेंद्राचा बळी घेणारा

तुला अजून कसा बरे नीट दिसला नाही

मग कसा आणि का ठेवायचा

आता तुझ्यावर भरवसा आम्ही?

शेवटी तूही झालास म्हणायचा

आंधळा धनाच्या लोभाने

काय म्हणावा तरी तुझा नेम;

उद्या तू म्हणशील पटकन

जो मारला गेला तोही

दाभोळकर नव्हताच मुळी!

२.) "भाग्य"

~~~~~~~~~

एकेकाचं भाग्य

कुठे कसे उजळेल

काही बाई नेम नाही

ऐकावी ती नवलकथाच!

फुटपाथवरचे ते आत्मे

काल कुजबूजत होते स्वप्नात

'दोन वेळच्या जेवणासाठी

मर मर मरणारे आम्ही

एवढ्या मोठ्या माणसांच्या

मोठ्या गाडीखाली मरण्याचे भाग्य

आम्हाला कोठून?'

गाडीवाले गेले जेल मध्ये

आणि मग गेले बेल मध्ये

शासन झाले फेल

फुटपाथवरचे आयुष्य म्हणजे

जणू फक्त एक डोंबाऱ्याचा खेळ
~~~~~~~~~

# बोलत मात्र कुणीच नाही

**--- एडवर्ड डिसोजा, सोज आळी, वाघोली**

तिला समजतं

त्यालाही जाणवतं

एकमेकांना स्पेस देण्यात

दोघांतील स्पेस वाढत चाललाय तो

तरी कुणीच काही बोलत नाही

संवादाची बदललेली साधने फसलियेत

टचस्क्रीन दलदलीत

अन नातेसंबंध जडावलेत

सोशल मिडियाच्या आभासी मृगजळात

इरेज करण्या नात्यातील वायरस

फेस टू फेस बसायची गरजयं

पण

बसून बोलण्याऐवजी

नेटवर्कच्या गिचमिडिला गिचमिडीच्या नेटवर्कला

कनेक्टटुन वाचतायेत दोघे एकमेकांना

हाताऐवजी गुंफले जातात हात स्मार्टफोनशी

गुंतले जातात डोळे स्क्रिनवर

चढविले जातात हार इयरफोनचे

ओठांची सुरू असते बडबड स्वत:शीच

लॉग आउट झालेलो असतो आपण बंधातून

डिजिटल दुनियेच्या डिजिटल युगात

स्लीप मोडवर जावे काही काळ

नात्याच् कनेक्शन डिस्कनेक्ट होण्याआधी

विश्वासाला लॉगाउटचं ऑप्शन सापडण्याधी

त्याला तिला दोघांनाही ते पटलेलास्त

पण बोलत मात्र कुणीच नाही.

# माझा हरवलेला गाव !!

**--- सचिन मेंडिस, बोळींज**

सुखवस्तू झालेल्या माझ्या गावामधे,
मी शोधतोय माझा हरवलेला गाव,
काळाच्या पडद्या आड गेलेला....!!
शोधतोय मी माझ जुन कौलाच घर.,
नव्या टूमदार बंगल्याच्या पायाखाली गाडून गेलेलं,
शोधतोय मी माझी आजी मला हिंदोळ्यात घेऊन,
'येला तू गाये' गाणारी,
मागे पडलंय माझे जुने घर, ती विशाल मनाची माणसे,
लांब विस्तीर्ण असलेल्या ओट्या सारखी,
आता सगळं खुजं खुजं, मनही ८ बाय १० च्या
ओट्यासारखं, आकुंचन पावलेलं..!!
उगाच मी प्रयत्न करतोय, मार्बलच्या लाद्यात
शेणाचा हरवलेला सुगंध शोधण्याचा,
पण त्या आहेत गंधहीन,
आपुलकी नसलेल्या सुंदर चेहरयासारख्या….!!
घराच्या मागे असलेली विहीर बुजून गेलीय,
आता तिथे गावातील बायका जमत नाही,
सुखं-दु:खं धुतली जात नाही तिथे,
आता प्रत्येकाची एक स्वतंत्र विहीर आहे.,
अन सुख-दु:खे धुवायला प्रायवेट वाशिंग मशीन ,
सुख-दुखःचे खाजगीकरण.......!!
आता विहिरीच्या जागेवर उभे आहे गावाचं कम्युनिटी सेंटर,
जिथे लोक जमत नाही,
असतो तर तिथे भकास उजाड शुकशुकाट,
रहाट गाण्याला मृत करणारा…!!
अंगणातल्या गाईचा गोठा आज सापडत नाही,
त्याची जागा पार्किंगने घेतली आहे,
गाईच्या जागेवर आता चकचकीत कार उभी असते,
शाळेतून येताना गाय जसी हंबरायाची तशी कार बोलत नाही,
गाय मेल्याने जितके मन रिते झाले,
तितके कार आल्याने भरले नाही…!!
मी शोधतोय माझा गाव इतिहासमधे जमा झालेला,
काळाच्या मागे सरलेला,

माझा शोध व्यर्थ आहे, बुद्धीला पटते,
पण मनाला पटत नाही,
समजवायाचेही नाही मला माझ्या मनाला,
शोधू दे त्याला त्याचा गाव, त्याची माणसे, त्याच्या आठवणी…!!

# गाव…..

एक चिंचेचं झाड गावातलं
आज आपल्यात नाही
मायेची सावली अंगणात नाही
गांवभर ऊन !

एक बावखल
कचरापेटी बनलेलं
असून आपल्यात नाही
विहिरीला स्वछ पाणी नाही
गावभर दुर्गंधी !

एक चिमणीचं घरट
ओट्यावरील फोटोमागे नाही
चिमणी हरवलेली
गावात चिवचिवाट नाही
गावभर शांतता !

एक लाल लुगड्यातील बय
ओटीवर नाही
मार्बलच्या ओट्याला
बयचा सुगंध नाही
गावभर पोकळी !

# नाताळ

**--- एमेल आल्मेडा ९२७०४१६१२३**

चमचमणारा अनोखा तारा
व्यापून टाकी आसमंत सारा
देत असे संदेश नवा
परत मजला जन्म हवा

युगानुयुगे लेकरांसाठी
‘लेकरू’ बनून येतो मी
एका एका कोकरासाठी
जन्म पुन्हा घेतो मी

हृदयी असू द्या शांती, प्रीती
मनी वसू द्या सेवानिती
ख्रिस्तप्रकाशाने अंत:करण उजळा
करा साजरा नाताळ वेगळा

# गोचाळलेल्या गावा

## -- सुनिल बावतीस डिमेलो, नंदाखाल

काय रे ए...गोचाळलेल्या वगैरे गावा..
अरे दचकतोस काय असा...
मान वर करून इकडे बघ, वर. मी शहर बोलतोय..
हो रे मीच बोलतोय, माझ्या असंख्य इमारतींपैकी एका गगनचुंबी इमारतीच्या गच्चीवर
उभा राहून मी तुला न्याहाळतोय,
सगळीकडे हिरवा बुरखा पांघरलेला खेडूतच
दिसतोय रे मला...

मला शहरीकरण नको..
शहरं असतात बकाल अन् भयाण..
ती असतात गलिच्छ नी रोगराईने बरबटलेली..
त्यांना भस्म्या झालेला असतो, आजूबाजूची गावं गिळंकृत करतात शहरं..

अशी बोंब मारणारे तुझे ढोंगी गावकरी...
पोटात भाकरीचा तुकडा पडावा म्हणून राबत असतात दिवसभर शहरात,
पदवीधारक ते अर्धे-मुर्धे शिक्षण झालेले..
काही तर एक अक्षरही लिहिता-वाचता न येणारे...
सारेच धावत असतात माझ्याकडे..
इतकेच कशाला, गावात राहून शेती करणारा शेतकरीही राबत असतो माझ्याच
बाजारपेठेच्या जोरावर..
दूध, फुले, भाज्या काहीबाही वाहत असतो माझ्या चरणावर.

कधी अडवलंय मी कुणाला?
कधी भाकरी नाकारली आहे त्यांना?
नाही ना...
तरी पण मी वाईट, का?
सर्व फायदेच का हवेत तुम्हाला?
थोडा त्याग करायलाही शिका..
जास्त नाही मागत…
फ़क्त तो तुमच्या काळजाच्या कुपीत पूर्वजांपासून जीवापाड
जपलेला जमिनीचा तो तुकडा तेवढा द्या..
आईशप्पथ सांगतो घर भरून टाकेन तुमचं पैशाने..

घरात, बँकेत ठेवायला जागा उरणार नाही एवढा पैसा ओतेन मी तुमच्यावर..
मग निवांत मिरवत बसा तुम्ही तो पैसा अंगा-खांद्यावर,
वाटलं तर खुशाल रपेट मारा त्या पैशावर बसून...
काय? पटत नाही..
काहींना ते पटलयं, एन्जॉय करतायत ते..
आज नाही तर उद्या इतरांनाही पटेल..
नव्हे पटवून घ्यावच लागेल.
मग तेही करतील एन्जॉय... ....
तुझ्या मढ्यावर बसून..!

- हिरव्या बुरख्यातला मँगो मनुष्य

# चारोळ्या

**--- सुनिल सोकाळकर**

संसार म्हणजे जणू क्रिकेटचा सामना असतो
स्ट्राईक सतत रोटेट करत राहायचा असतो
विकेटच्या भीतीने डाव कधी आवरायचा नसतो
फ़ॉलो ऑन नंतरही 'सेकंड इनिंग'चा चान्स असतो…

नाती अशीच मिटून जातात का?
क्षणभर डोळे मिटावी तशी
बीजाचं अंकुरण्याआधी रुजणंच खुंटावं
अन सुकलेली पानं वाऱ्याने उडवावी तशी


शब्दांशी माझं कधी पटलंच नाही
ओठांवर असताना ते आगावु उगवायचे
बोटांतुन कागदावर उतरताना माझेच असायचे
मी गप्प असलो की डोळ्यांतुन बोलायचे..

तुझ्याशी बोलताना उगाच कोणीतरी
पाहत असल्याचा मला भास होतो.
तुझा हात हातात असताना माझंच मन मग
माझ्याशी फितूर व्हायला बघतं…

उमरसे बडा हो रहा था, पर मासूमियत छोटी होती गयी
दिमागसे बडा हो रहा था, पर दिल्लगी छोटी होती गयी
शोहरत से बडा होता गया, पर इन्सानियत छोटी होती गयी
ईन्सान मै छोटा होता गया और हवस बडी होती गयी…

# कलाकुसर :-


**ऑस्टिन डाबरे :-**






**राजेश शिंदे :-**







**रॉयल बॅप्तिस्ट रॉड्रिग्ज :-**







